रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक १५७ | पृष्ठे १० | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in



**निसर्ग हॉलिडेज्, अलिबाग**

थायलँड पटाया
१६/११/२५, २६/११/२५, ३०/११/२५
४ स्टार हॉटेल
४ रात्र/पाच दिवस
विजा फ्री
₹45000/-

दिल्ली, आग्रा, अमृतसर, वैष्णोदेवी
१८/१२/२५, २३/१/२०२६
वन साईट ट्रेन/ वन साईट प्लेन
थ्री स्टार हॉटेल,
८ रात्र/९ दिवस
₹19999/-

केरळ, कोचीन, मुन्नार, टेकडी, वडकला, देवेंद्र, कन्याकुमारी
२२/१/२६
दोन्ही साईट थ्री टाकर ट्रेन
एसी/थ्री स्टार हॉटेल
८ रात्र/९ दिवस
₹17999/-

बेंगलोर, म्हैसूर, उटी, कुन्नूर
१/१२/२०२५
दोन्ही साईट थ्री टायर ट्रेन
थ्री स्टार हॉटेल
६ रात्र/ ७ दिवस
₹13500/-

प्रभाकर पटेल : ९८८०२४१६६९
चंद्रकांत म्हात्रे : ९२६०७४५३२६/ अभिनव ठोंबर : ७७२१९२७४०४



# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹


## जादूटोण्याच्या संशयावरून महिलेला मारहाण

**म्हसळा** : तालुक्यातील कोळे गावात अंधश्रद्धेच्या संशयातून सात जणांनी एका महिलेला मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.या प्रकरणी म्हसळा पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल झाले असून घटनेचा तपास पोलिस निरीक्षक सुनील रोहिणकर करत आहेत. फिर्यादी महिला सध्या म्हसळ्यातील कुणबी समाज हॉल येथे वास्तव्यास आहेत.आरोपींनी 'तुझे पती मांत्रिकाकडे जाऊन जादूटोणा करतात' असा संशय व्यक्त करून फिर्यादीच्या घरात जबरदस्तीने प्रवेश केला.त्यांनी फिर्यादीस हाताने ढकलून शिवीगाळ केली. तसेच जीवेठार मारण्याची धमकी दिली. दुसऱ्या बाजूने परस्परविरोधी तक्रार दाखल करण्यात आली आहे.या तक्रारीनुसार फिर्यादी पान २ वर

## वेधक

### पिस्तुलासह जिवंत काडतुसे जप्त

**घाटकोपर** : दोन देशी बनावटीची पिस्तुले, चार जिवंत काडतुसे विक्रीसाठी परराज्यातून मुंबईत आलेल्या एका तरुणाला पंतनगर पोलिसांनी सापळा रचून अटक केली. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ ७ च्या पथकाने ही कारवाई केली. घाटकोपर बस आगारजवळ, अंधेरी-घाटकोपर लिंक रोडवर एक व्यक्ती विनापरवाना शस्त्रविक्रीसाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीची खातरजमा करण्यासाठी विशेष पथकाने सापळा रचत अजय कायताला (२४) ताब्यात घेतले. त्याच्याकडे १ लाख ९ हजार किमतीची दोन देशी बनावटीची पिस्तुले, चार जिवंत काडतुसे आढळली. पंतनगर पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### आता ईडी लागणार दहशतवाद्यांच्या मागे

**नवी दिल्ली** : दिल्ली लाल किल्ला परिसरात झालेल्या कार स्फोटाचा तपास सरकारने एनआयएकडे सापवलेला आहे. असे असतानाच आता या प्रकरणाच्या तपासात ईडीनेही उडी घेतली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी याबाबतचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानंतर आता दिल्ली स्फोटाप्रकरणी अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.या प्रकरणाचा तपास कुठपर्यंत आला आहे, याचा आढावा घेण्यासाठी अमित शाहा यांनी बैठक बोलावली होती. या बैठकीत त्यांनी दिल्ली स्फोटाचा तपास करण्यासाठी ईडीलाही काही अधिकार दिले आहेत. आता ईडी एनआयएसोबत तपासात उतरणार आहे. अल फलाह विद्यापीठाशी निगडित एका डॉक्टरच्या आर्थिक व्यवहाराची यात चौकशी केली जाणार आहे.

# 'अमृत-16'ला जलसमाधी

**| डहाणू | प्रतिनिधी |**

मुंबईच्या दारुखाना भागातून ८ नोव्हेंबर रोजी गस्तीसाठी निघालेली अमृत-१६ ही मदत-नौका वाढवण किनाऱ्यापासून अंदाजे १० सागरी मैल अंतरावर नांगर टाकून थांबली असताना, १२ नोव्हेंबर रोजी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास बोटीच्या काही भागात पाणी शिरल्याने बोट बुडाल्याची घटना घडली.

नौकेच्या अभियंता कक्षात (यंत्राच्या खोलीत) अचानक पाणी शिरू लागल्याचे अभियंत्याच्या लक्षात आले. पाण्याचा प्रवाह इतका मोठा होता की, काही क्षणांतच नौकेत पाणी साचू लागले. या संकटामुळे सहा कर्मचाऱ्यांपैकी (खलाशांपैकी) पाच जणांनी वेळीच बाहेर पडण्यात यश मिळवले, तर राहुलकुमार यादव (२३) हा कर्मचारी अद्याप बेपत्ता आहे.



- **वढवणजवळील घटना; तटरक्षक दलाची धाडसी ॲक्शन**
- **पाच खलाशी बचावले, एकाचा शोध युद्धपातळीवर**

बचावलेल्या कर्मचाऱ्यांनी तातडीने जवळ असलेल्या अन्नपूर्णा नावाच्या दुसऱ्या मदत नौकेकडून मदत घेतली. अन्नपूर्णा नौकेवरील कर्मचाऱ्यांनी तात्काळ प्रतिसाद देत पाचही जणांना सुरक्षितरीत्या आपल्या नौकेवर घेतले. त्यानंतर रात्री तीन वाजण्याच्या सुमारास सागरी बचाव समन्वय केंद्राला (मुंबई) अमृत-१६ बुडाल्याची माहिती मिळताच भारतीय तटरक्षक दल केंद्र डहाणू येथून कमांडर जितु आय. जोस यांच्या मार्गदर्शनाखाली तटरक्षक दलाची आयसी-११७ ही गस्ती नौका तत्काळ घटनास्थळी रवाना करण्यात आली.

सकाळी सातच्या सुमारास तटरक्षक दलाने या पाचही कर्मचाऱ्यांना ताब्यात घेतले आणि सकाळी नऊ वाजता त्यांना डहाणू किनाऱ्यावर आणण्यात आले.


पाचही बचावलेल्या कर्मचाऱ्यांना तातडीने डहाणू उपजिल्हा रुग्णालय, आगर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. पान २ वर

> "अमृत-१६ या मदत नौकेवरील आपत्कालीन संदेश मिळताच भारतीय तटरक्षक दल केंद्र डहाणू, चिखले कार्यालयाचे कमांडर जितु आय. जोस यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तात्काळ प्रतिसाद देत बचावकार्य सुरू केले. आयसी-११७ या गस्ती नौकेच्या वेळेवर आणि धाडसी कारवाईमुळे ५ कर्मचाऱ्यांचे जीव वाचवता आले. समुद्राच्या प्रतिकूल परिस्थितीतही जवानांनी धाडसाने सर्व पाच कर्मचाऱ्यांना सुरक्षित किनाऱ्यावर आणले. सध्या एक कर्मचारी बेपत्ता असून त्याचा शोध सुरू आहे. - यशवंत शिवडीकर, तटरक्षक दल"

## पुण्याच्या नवले पुलावर भीषण अपघात

# ७ मृत्यू; २० जखमी

**| पुणे | प्रतिनिधी |**



नवले पुलावर दोन ट्रकची समोरा समोर धडकी झाली, त्यानंतर या दोन ट्रकच्यामध्ये एक कार अडकल्याची घटना घडली आहे. अपघातानंतर दोन्ही ट्रकने पेट घेतला. साताऱ्याच्या दिशेकडून पुण्याकडे येणाऱ्या दोन ट्रकचा अपघात झाला आहे. या अपघातामध्ये दोन ट्रकच्यामध्ये एक चारचाकी वाहन अडकल्याची माहिती समोर येत आहे.

या अपघातानंतर या दोन्ही ट्रकला आग लागली, या घटनेत सात जणांचा मृत्यू झाला असून, मृतांची संख्या आणखी वाढू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे. या दुर्घटनेत २० जण जखमी झाल्याचे समजते, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून अग्निशमन दलाच्या गाड्याही नवले ब्रीजवर पोहोचल्या आहेत. अपघातातील जखमींना जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते.

शहरातील नवले ब्रीजवर सातत्याने अपघाताच्या घटना घडतात, आज पुन्हा एकदा येथे भीषण अपघाताची घटना घडली. ३ ते ४ गाड्यांची धडक बसल्याने हा अपघात झाला असून दोन कंटेनरच्यामध्ये एक कार जळत असल्याचं दिसून आलं.

या कारमधून एक कुटुंब प्रवास करत होते, अशीही प्राथमिक माहिती आहे. दरम्यान, अपघाताच्या घटनेनंतर अग्निशमन दल व पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. तर, काही काळासाठी नवले पुलासह रस्त्यावरची वाहतूक थांबवण्यात आली आहे. आगीवर नियंत्रण मिळवण्यात आलं असून सध्या मदत व बचाव कार्य सुरू आहे.

दरम्यान अपघात झाल्यामुळे हा रस्ता आता वाहतुकीसाठी बंद झाला आहे, त्यामुळे या परिसरात प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे, वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांचे हात सुरू आहेत. या अपघातामध्ये तीनही वाहनांचे प्रचंड नुकसान झालं आहे.

# काशिदच्या सरपंचासह उपसरपंच व सदस्याला दणका

- **शासकीय जागेत अतिक्रमण करून बांधकाम केल्याचा ठपका**
- **जिल्हाधिकारी यांनी पदे रद्द करण्याचे दिले आदेश**

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

शासकीय जागेत अतिक्रमण करून बांधकाम केल्याचा ठपका ठेवत काशीदमधील सरपंच, उपसरपंच व सदस्य असे तिघांची पदे रद्द करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत. अलिबागमधील त्यांच्या दालनात झालेल्या अंतिम सुनावणीत हा निर्णय घेण्यात आला. अर्जदार रोहन खोपकर यांच्या वतीने ॲड. परेश देशमुख यांनी काम पाहिले होते.

ॲड. परेश देशमुख यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, काशिद ग्रामपंचायतीचे संतोष जयराम राणे हे सरपंच आहेत. तसेच सुमित रमेश कासार हे उपसरपंच असून दिपेश दत्तात्रेय काते हे सदस्य आहेत. काशिद येथील सर्व्हे नंबर २८/२ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या नावे ८४ गुंठे जागा आहे. सरपंच राणे यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून या शासनाच्या जागेत अतिक्रमण करून दगड, विटा, मातीचे बांधकाम केले. १२१.२८ चौ. मीटर इतक्या क्षेत्रफळाचे घर आहे. या घराचा क्रमांक ५१७ आहे. शासनाची जागा असल्याचे माहित असतानादेखील २६ जून २०२० मध्ये ही मालमत्ता स्वतःच्या नावे करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे अर्ज केला होता. ही बाब काशिदमधील रोहन रमण खोपकर यांच्या लक्षात आली. त्यांनी याप्रकरणी ॲड. परेश देशमुख यांच्यामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयात अपिल दाखल केले. ॲड. परेश देशमुख यांनी खोपकर यांच्या बाजूने केलेला युक्तीवाद व पुरावे ग्राह्य धरून जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी यांनी संतोष राणे यांना दोषी मानत त्यांचे सरपंच पद रद्द करण्याचे आदेश दिले. तसेच उपसरपंच सुमित कासार व सदस्य दिपेस काते यांचेदेखील पद रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. अतिक्रमण व पान २ वर

# रस्ता एक, भूमीपूजन अनेक

## निवडणुकीच्या तोंडावर आमदारांकडून पुन्हा एकदा आश्वासनांची खैरात

**| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |**

अलिबाग-रोहा मार्गासाठी निधी मंजूर झाल्यानंतर आ. दळवींसह महायुतीतील अनेक नेत्यांनी आपापल्या स्टाईलने श्रेय लाटण्याचा प्रयत्न केला. गेल्या विधानसभा निवडणुकीच्या जाहिरनाम्यात या मार्गाचा उल्लेख करीत आमदारांनी रस्ता स्वतःच्या पैशातून करुन देण्याचे गाजरही मतदारांना दाखवले.

अलिकडेच या मार्गावरील वढावजवळील पूल कोसळल्याने पुन्हा एकदा अलिबाग-रोहा मार्ग चर्चेचा विषय ठरला. या मार्गावरुन प्रवास करणाऱ्या नागरिकांना रस्त्याच्या कामाची प्रतीक्षा असताना, आमदारांकडून पुन्हा एकदा त्याच रस्त्याचं भूमीपूजन करण्यात येत आहे. निवडणुकीचा माहोल तापू लागल्याने मतदारांना खुश करण्यासाठी दिली जात असलेली ही चिटर आश्वासनं आता लोकांच्या नाराजीचं कारण ठरत आहेत. रस्ता एक आणि भूमीपूजन अनेक अशी टीका नागरिकांकडून केली जात आहे. रस्त्याचे काम अद्याप पूर्ण झाले नसून प्रत्येक निवडणुकीच्या अगोदर भूमीपूजनाचं नाटक रचलं जातं, आणि आश्वासनांचा पाऊस पडतो. मात्र, रस्त्याचे काम केव्हा पूर्ण होणार हा प्रश्न जनतेसमोर अजूनही अनुत्तरित आहे.

आता निवडणुकांचे वारे वाहू लागले आहेत. येत्या २ डिसेंबरला नगरपालिका, नगरपरिषदांसाठी मतदान होणार आहे. येत्या काळात जिल्हा परिषदेसाठीही मतदान होणार आहे. याच पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा आ. दळवी यांनी रस्त्याच्या कामाचं नाटक सुरु केलं आहे. दरवेळी निवडणुका जवळ आल्या की त्याच रस्त्याचं पुन्हा एकदा भूमीपूजन करून काम लवकरच सुरू होईल असं आश्वासन पुन्हा एकदा नागरिकांना अनुभवता येणार आहे. मात्र प्रत्यक्षात हा मार्ग कधी पूर्ण होणार, याबाबत साशंकताच आहे. कारण यापूर्वीही आमदारांनी हाच रस्ता पक्का करण्याचं जाहीर आश्वासन दिलं होतं. भूमीपूजनाच्या कार्यक्रमात नारळ फोडून, पूजा करून, मोठमोठ्या घोषणा करण्यात आल्या. पण प्रत्यक्षात आजही या रस्त्याचे काम अपूर्णच आहे. या मार्गावरील वढाव गावाजवळील पूल कोसळल्यानंतर पान २ वर

### चिटर आश्वासन



दोन दिवसांपुर्वीच आ. महेंद्र दळवी यांनी ते स्वतः चिटर आमदार असल्याची कबुली दिली असल्याचा गौप्यस्फोट आ. अनिकेत तटकरे यांनी केला होता. त्यामुळे त्यांच्या वचनबद्धतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालं असून, वारंवार होणारं भूमीपूजन हे फक्त निवडणुकीपूर्वीचं चिटर आश्वासन असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# बांधांवरून होणारे वाद मिटणार

**| रायगड | प्रतिनिधी |**

शेतीच्या बांधांवरून, हद्दी-खुणांवरून होणारी दोघांमधील भांडणे आता लगेचच मिटणार आहेत. महसूल व वन विभागाच्या नव्या निर्णयानुसार आता खासगी भूमापकदेखील शेतजमिनींची मोजणी करून शकणार आहेत. त्यासाठी त्या भूमापकांना भूमिअभिलेख अधीक्षकांकडून परवाना घ्यावा लागणार आहे. यासाठी भूमापक स्थापत्य अभियांत्रिकी पदविका (डिप्लोमा इन सिव्हिल इंजिनिअरिंग) पूर्ण केलेला असणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील सरासरी ८०० शेतकरी जमिनीच्या मोजणीसाठी अर्ज करतात. त्यातील १५० हून अधिक शेतकऱ्यांना जमीन मोजणीसाठी पैसे भरून पोलीस बंदोबस्त घ्यावा लागतो. परंतु, भूमिअभिलेख कार्यालयाकडे मनुष्यबळ कमी असल्याने शेतकऱ्यांनी जमिनीच्या मोजणीसाठी अर्ज करूनही त्यांना दोन-तीन महिने वाट पहावी लागते. त्यामुळे दोन शेतकऱ्यांमधील वाद विकोपाला पोचतो आणि पोलिसांत गुन्हे दाखल होतात. या पार्श्वभूमीवर महसूल व वन विभागाने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. पान २ वर

### असे आहे शासनाचे परिपत्रक

महाराष्ट्र जमीन महसूल (हद्द व हद्दीखुणा) १९६९ मधील नियम १३(२) च्या तरतुदीनुसार एकत्र कुटुंबातील धारण जमिनीच्या हिश्शांची मोजणी फी निश्चित करण्यात आली आहे. एकत्र कुटुंबाच्या धारण जमिनीच्या नोंदणीकृत वाटणी पत्राद्वारे विभाजन व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ८५ नुसार विभाजन तथा प्रति पोटहिश्श्यासाठी मोजणी शुल्क २०० रुपये असणार आहे. महसूल व वन विभागाचा हा प्रस्ताव मान्य करण्यात आला असून त्यानुसार सर्व भूमिअभिलेख कार्यालयांनी ई- मोजणी व्हर्जिन ०.२ अंतर्गत कार्यवाही करावी, असे त्या पत्रात नमूद आहे.


# उद्यापासून वरसोली यात्रा

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**



आवास येथील यात्रेनंतर आता वरसोली यात्रा उद्यापासून सुरु होणार आहे. शनिवार(दि.१५) ते गुरुवार (दि.२०) पर्यंत सहा दिवस ही यात्रा असणार आहे. यात्रेच्या निमित्ताने वेगवेगळी दुकाने सजण्यास सुरुवात झाली आहे. यात्रेची तयारी अंतिम टप्प्यात आहे.

वरसोली येथील विठ्ठल रखुमाईच्या मंदिरात दर्शन घेण्यासाठी प्रचंड गर्दी होते.गेल्या अनेक वर्षाची परंपरा आजही जपली जाते. विठू माऊलीच्या दर्शनाबरोबरच वेगवेगळ्या वस्तू, खाद्य पदार्थ खरेदीची लुट मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे वरसोली येथील यात्रेचे आकर्षण कायमच असते. अलिबाग शहरासह परिसरातील ग्रामीण भागातील हजारो भाविक दर्शनासाठी येतात. यावर्षी १५ नोव्हेंबरपासून वरसोली यात्रा सुरु होणार आहे. यात्रेची तयारी आयोजकांमार्फत सुरु करण्यात आली आहे. ही तयारी अंतिम टप्प्यात आहे. अलिबाग जवळ असलेल्या वरसोली येथील आंग्रेकालीन विठ्ठल रखुमाई मंदिरात यात्रा भरणार आहे. ही यात्रा कार्तिक एकादशीपासून पान २ वर



## ग्रामीण भागातील आठवणी जाग्या झाल्या | जातं-रोबोट, डाल-माऊस, ग्रामोफोन-सीसीटिव्हीमध्ये लढत

# निवडणुक प्रचार रंगतदार होण्याची चिन्हे

**| रायगड | प्रतिनिधी |**

धान्य दळणारं जातं, शिंदीच्या डाली, सूप, खटारा, मुलांचा लाकडी चाकाचा गाडा या वस्तू तसेच त्यासोबत खेळणे आता तसे ग्रामीण जीवनातूनही हद्दपार झाले आहे. मात्र आता त्या शहरात दिसणार असून, ग्रामीण भागातील आठवणी जागवणार आहेत. जातं-रोबोट, डाल-माऊस, ग्रामोफोन-सीसीटिव्ही, अशा इतिहासजमा विरुद्ध तंत्रज्ञान युगातील वस्तूंची चिन्हं मिळालेली नगरपालिका निवडणूक किंवा त्यातला चिन्हंबोध प्रचार पाहणे रंजकदार ठरणार आहे. फणस विरुद्ध कणीस आणि ऊस व द्राक्षांमध्येही लढत दिसणार आहे.



स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नगरपालिका लढतीमध्ये मिळणाऱ्या चिन्हांची सूची निवडणूक परिशिष्ट ड मधून प्रसिद्ध झाली असून, त्यामध्ये सुमारे १६५ चिन्हांचा समावेश आहे. ग्रामीण जीवनासह आधुनिक काळात वापरल्या जाणाऱ्या वस्तुंचा यामध्ये समावेश असून, त्यामध्ये अनेक या कालौघात इतिहासजमा झालेल्या आहेत, तर तंत्रज्ञानाशी जोडलेल्या जीवनात आता जगण्याचा एक भाग झालेल्या आहेत. काही चिन्हे शेतकरी ते जेवणाच्या ताटातून पदार्थ बनून समोर येणारे आहेत. जेवणाच्या पदार्थांनी भरलेल्या तबकासोबतच मिरची, ढोबळी मिरची, लसूण, फुलकोबी, मका, सफरचंद, पेरू, अननस, नारळ, कलिंगड, असे फळ-भाज्यांचेही चिन्हे आहेत. अगदी पोळपाट, भाजणीपात्र , गॅस सिलिंडर, काटेरी चमचा, कढई, खलबत्ता, कपबशी, बिस्किट, ब्रेड, टोस्ट तयार करणारे यंत्र, टोस्टरसह असे जेवण, स्वयंपाकगृहाशी संबंधित येणाऱ्या वस्तुंची चिन्हे असून, त्यावरून एखाद्या लसूण चिन्हधारी उमेदवाराने आपल्याशिवाय तडक्याला अर्थ नाही किंवा मिरचीचे चिन्ह मिळालेल्या उमेदवाराने आपल्याशिवाय भाजीला झणझणीतपणा नाही, असे म्हणत प्रचार केला तर नवल वाटणार नाही. केस विंचरायचा कंगवा, टुथब्रश व दातांची पेस्ट, असेही चिन्हे असून, पेस्टशिवाय ब्रश अधुरा, कंगव्याशिवाय भांग पाडता येणार नाही, अशा अंगानेही प्रचारात रंग भरण्याची शक्यता आहे.

निवडणुकीच्या चिन्हांमध्ये क्रीडा क्षेत्रातील वस्तुंचे चिन्हे असून त्यामध्ये बुद्धिबळ पट, कॅरम, बॅडमिंटनमधील फूल, फुटबॉल, डंबेल्स, बॅटसह ट्रॅक्टर, हायवा, संगीत क्षेत्रातील बासरी, गिटार, हेडफोन व बांधकाम, संगणक, टाइपरायटर, अशा तंत्रज्ञानाशी संबंधित चिन्हांचा समावेश आहे.

# एज्युसिटी प्रकल्पाला सिडकोकडून गती

## ●११६ कोटींच्या रस्त्याची निविदा जाहीर

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून पाच किलोमीटर अंतरावर महाराष्ट्र सरकारचा आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण राज्यांतर्गत देण्याचा महत्त्वाकांक्षी एज्युसिटी प्रकल्प आता अंमलबजावणीच्या निर्णायक टप्प्यात पोहोचला आहे. या प्रकल्पासाठी सिडकोने सुमारे २५० एकर क्षेत्र राखीव ठेवले आहे. या प्रकल्पासाठी ८५ टक्के भूसंपादनाचे काम पूर्ण झाल्यानंतर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ बफ वरून या प्रकल्पापर्यंत पोहचण्यासाठी पोहोच रस्ते बांधणीच्या कामासाठी ११६ कोटी रुपयांची निविदा नुकतीच सिडकोने जाहीर केली.




पहिल्या टप्प्यात सिडको मंडळ एज्युसिटी प्रकल्पापर्यंत पोहोचण्यासाठी रस्ता बांधण्याचे काम हाती घेणार आहे. या निविदेमध्ये एनएच ४ बी महामार्गालगतच्या कुंडेवहाळ गावाजवळून थेट एज्युसिटी प्रकल्पासाठी पोहचण्यासाठी सुमारे १.१ किलोमीटर अंतरावर ४५ ते ३० मीटर रुंदीचा हा मार्ग बांधण्यासाठीची ही निविदा आहे. यासाठी सिडको ११६.५३ कोटी रुपये खर्च करणार आहे.

कुंडेवहाळ गावाजवळून पनवेलउरणजेएनपीटी महामार्ग (एनएच ४बी) येथून या रस्त्याची सुरुवात होणार आहे. विद्यापीठातील प्रत्येक विद्यार्थ्याला ३० चौरस मीटरची जागा हा आंतरराष्ट्रीय शिक्षणाचा निकष पाळत प्रत्येक विद्यापीठाला १० हेक्टर या निकषाप्रमाणे जागा देण्याचे नियोजित आहे. १० विद्यापीठांपैकी पहिल्या पाच विद्यापीठांना जागेचे वाटप करण्याचे नियोजित आहे. पोहोच रस्ता करण्यापूर्वी सिडकोला या परिसरातील लहान टेकड्यांमधील दगड काढून त्याचे सपाटीकरण हेच मुख्य आव्हान असणार आहे. एज्युसिटी प्रकल्प आणि त्यामधील सपाटीकरण तसेच इतर कामांसाठी सिडको ८९० कोटी रुपये खर्च करणार आहे.

यामुळे शैक्षणिक संकुलामुळे परदेशातील तुलनेत २५ ते ३० टक्के कमी खर्चात शिक्षणाची संधी देशभरातच विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल. हा उपक्रम राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने महाराष्ट्राला जागतिक शैक्षणिक केंद्र बनवण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल मानले जात आहे.

> **आंतरराष्ट्रीय एज्युसिटी हा देशामध्ये शैक्षणिक क्रांती घडवणारा प्रकल्प असून याद्वारे देशातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित शिक्षणतज्ज्ञांकडून शिकण्याची संधी उपलब्ध होणार आहे. नियोजित वेळेत हा प्रकल्प पूर्ण करण्यावर आमचा भर आहे**
> **विजय सिंघल, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

### पाच परदेशी विद्यापीठांसोबत करार

आतापर्यंत एज्युसिटी प्रकल्पात पाच परदेशी विद्यापीठांसोबत करार झाले आहेत. या विद्यापीठांमध्ये स्कॉटलंड, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, शिकागो-अमेरिका आणि इटली या देशांच्या विद्यापीठांचा समावेश आहे. या परदेशी संस्थांना त्यांच्या शैक्षणिक कार्यक्रम, शुल्क आणि अकादमिक सत्रांबाबत स्वायत्तता देण्यात आली आहे. त्यांच्या ऑफशोअर कॅम्पसद्वारे भारतीय विद्यार्थ्यांना थेट आंतरराष्ट्रीय पदवी शिक्षण मिळणार आहे.

# स्नेहल कांबळेना पीएचडी

। पेण । प्रतिनिधी।

पेण एज्युकेशन सोसायटी ही ११५ वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहे. प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत शिक्षणाची सोय या संस्थेचे पेण सारख्या ग्रामीण भागात उपलब्ध करुन दिली आहे. या संस्थेत भाउसाहेब नेने महाविद्यालय येथे प्राचार्य म्हणून कार्यरत असलेले प्राचार्य डॉ.सदानंद भास्कर धारप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. स्नेहल सुशील कांबळे यांनी मुंबई विद्यापीठाची रसायनशास्त्र विषयातील उच्चतम पदवी विद्यावाचस्पती मिळवली आहे. पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊ साहेब नेने महाविद्यायलय पेण येथे गेले दहा वर्षांपासून रसायनशास्त्र विषयातील संशोधन केंद्र सुरु आहे. याच विषयात पदव्युत्तर पदवीचे शिक्षणही मिळते. अशा ग्रामीण भागात संशोधन केंद्र सुरु असणे हे कौतुकास्पद आहे. संशोधन केंद्र हे तत्कालीन अध्यक्ष ॲड. बापुसाहेब नेने व त्यांचे सहकारी यांचे प्रेरणेने सुरु झाले. तसेच सध्याचे अध्यक्ष ॲड मंगेश नेने व त्यांचे कार्यकारिणीतील सहकारी यांच्या प्रोत्साहनामुळे प्रगती पथावर आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहेत, या मिळकतींचे मालक १. फरजाणा इब्राहीम पठाण २. राजेश रामस्वरूप सोनी, ३. जगदीश के गंगर ४. हसमुख तेजमल अग्रवाल, व ५. मंजुलिका हसमुख अग्रवाल यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर/भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २८/२१ | ००-३२-०० | ०-२० |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १४ नोव्हेंबर २०२५

**ॲड. शरद आर. सावंत**
बी. कॉम.एल.एल.बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ.हौ.सो.लि. कोतवालनगर कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५


## गतिमंद तरुणीवर अत्याचार

। नवी मुंबई । प्रतिनिधी।

गतिमंद मुलीच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेऊन लैंगिक अत्याचार केल्याची घटना तुर्भे परिसरात घडली. दोन दिवसांपूर्वी पीडितेने बाळाला जन्म दिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला असून, गुन्हेगाराच्या शोधासाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली. तुर्भे परिसरात भटकणाऱ्या गतिमंद तरुणीला एका महिलेने आसरा दिला. ही तरुणी दिवसभर भटकून सायंकाळी परत येत होती. याच दरम्यान तिच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेत कुणीतरी व्यक्तीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केले होते. त्यामुळे तरुणी गरोदर होती. तरुणीच्या पोटात दुखू लागल्यावर ही बाब लक्षात आली. दोन दिवसांपूर्वी तिने मुलीला जन्म दिला असून, डॉक्टरांना संशय आल्याने याबाबतची माहिती तुर्भे पोलिसांना देण्यात आली होती. गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी बाळाच्या डीएनए तपासणीची तयारी सुरू केली आहे. पुराव्याच्या आधारे आरोपीपर्यंत पोहोचण्यास मदत होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. गतिमंद तरुणीकडून माहिती मिळवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

# रायगडमध्ये अलर्ट

### दोन दिवस राबविणार सागरी सुरक्षा कवच



> **दिल्ली येथीले बॉम्बस्फोटानंतर हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. त्या पार्श्वभूमीवर सागरी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. लँडीग पॉईटसह चेकपोस्टची तपासणी केली जात आहे. जिल्ह्यातील सागरी सुरक्षा अधिक मजबुत ठेवण्यासाठी गस्त वाढवण्यात आली आहे.**
> **- आंचल दलाल, पोलीस अधिक्षक, रायगड**

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

दिल्ली येथील बॉम्बस्फोटानंतर देशभरात अलर्ट जारी करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यामध्ये या निमित्ताने कडेकोट बंदोबस्तासह, तपासणी सुरु करण्यात आली आहे. पोलिसांचा कडक पहारा ठेवण्यात आला आहे. जिल्ह्यातील सागरी सुरक्षा बळकट करण्यासाठी दोन दिवस सागरी सुरक्षा कवच अभियान रायगड पोलिसांच्या वतीने राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून संशयास्पद बोटींवरील हालचालीवर लक्ष ठेवण्याबरोबरच रस्ते, खाडी, नदी, समुद्रकिनाऱ्यावरील हालचालींवर नजर ठेवण्याचे काम केले जाणार आहे.

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ सोमवारी (दि.१०) एका उभ्या असलेल्या गाडीमध्ये स्फोट झाला. या स्फोटानंतर हाय अलर्ट जारी करण्यात आला. रायगडचे पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला. रायगड जिल्ह्याला भला मोठा समुद्रकिनारा लाभला आहे. या समुद्रकिनारी असलेल्या बोटींसह व्यापारी बोटींची तपासणी करण्यात आली. नाकाबंदी करून वेगवेगळ्या वाहनांची तपासणी सुरू केली आहे. जिल्ह्यात २८ पोलीस ठाणे आहेत. या पैकी १७ सागरी पोलीस ठाणे आहेत. त्यात खाडी लगतचे नऊ व सागरी आठ पोलिस ठाण्यांचा समावेश आहे. जिल्ह्यातील १३० लँडिग पॉईंटसह, नदी, नाले, समुद्रकिनारे तसेच संशयीत बोटी उतरण्याची शक्यता असलेल्या ठिकाणाची तपासणी व पाहणी करण्याचे काम रायगड पोलीसांमार्फत सुरू करण्यात आले आहे. जिल्ह्यात काही संशयीत हालचाली दिसून आल्यास पोलिसांना माहिती देण्याचे आवाहनही पोलिसांमार्फत करण्यात आले आहे. सागरी सुरक्षेसह रस्त्याच्या मार्गावरील सुरक्षादेखील मजबूत ठेवण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली आहे. तसेच येत्या १९ नोव्हेंबरपासून जिल्ह्यामध्य दोन दिवस सागरी सुरक्षा कवच अभियान सागरी सुरक्षा विभागाच्या माध्यमातून राबविला जाणार आहे. किनाऱ्यांवरील संशयास्पद बोटीवर लक्ष ठेवण्याबरोबरच वेगवेगळ्या उपाययोजना या कालावधीत राबविण्यात येणार असल्याची माहिती रायगड पोलिसांकडून देण्यात आली आहे.

## खांदेश्वर पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्याच्या वागणुकीबद्दल तक्रार

। पनवेल । प्रतिनिधी ।

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय हे महाराष्ट्र पोलिसांच्या ब्रिद वाक्याला गालबोट लागेल अशी घटना पनवेल तालुक्यातील माजी नगरसेवक संतोष हिरामण उरणकर यांनी निवेदन तक्रार अर्जात केली.

संतोष उरणकर यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीचे कौतुक करून तेथील शिपाई सलीम तडवी अपवाद असल्याचे सांगत बेजबाबदारपणे कसलीही भीती न बाळगता ते पासपोर्ट चौकशीच्या कामात बेडरपणे पैशाची मागणी करत नागरिकांना त्रास देतात असे उल्लेखले गेले आहे. या गंभीर घटनेची तक्रार त्यांनी पोलीस आयुक्तांकडे अर्जाद्वारे केली असून शिपाई सलीम तडवी यांची या विषयी चौकशी लावण्यात यावी तसेच त्यांची बदली करण्यात यावी अशी मागणी केली आहे. या तक्रारीमुळे पोलीस प्रशासन व सामान्य नागरिकांमधील अविश्वास व तणावाचा प्रश्न ऐरणीवर येत आहे. या गंभीर विषयाप्रकरणी पोलीस अधिकारी कोणती कारवाई करतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.


### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की श्री. गणेश तुकाराम बाजी यांचेकडून आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची जिरायत जमिन मिळकत विकत घेण्याचे ठरविले असून त्याबाबत बोलणी चालू आहे.

**मिळकतीचे वर्णन -:**

| मौजे | जमिन | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|
| देवघर ता.अलिबाग, जि.रायगड | जिरायत | २१८/१ | ०-४६-४० पो.ख.०-२०-४० एकूण ०-६६-८० | ९.७४ |

सदर मिळकतींपैकी श्री.गणेश तुकाराम बाजी यांच्या नावे असणारे ०-२८-८० हे. आर इतके क्षेत्र. हा या नोटीसचा विषय आहे.

तरी वरील जिरायत जमिन मिळकतीबद्दल कुणाचाही ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, बोजा अथवा लिज इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवासांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, इतर कोणाचाही कायदेशीर हक्क व हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची या नोटीसद्वारे नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. सौ.गौरी गिरीश म्हात्रे**
अलिबाग — डी-२ हिराबाग मोदकम हॉटेलच्या वर जिल्हा न्यायालयासमोर
दि.१४/११/२०२५ — अलिबाग-रायगड मो नं.९२७१७७५२७७



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे सुगवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक १) श्री. शशिकांत बाबूराव मुंढे २) सौ. विमल शशिकांत मुंढे ३) श्री. राहूल प्रकाश कोठारी यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे-आर-पॉ) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| ५८ | १ अ | ८-००-० | ५-६४ |
| ५८ | १ ब | ६-०२-० | २-६४ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : १४/११/२०२५

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९४०३६४७९५३



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, १. श्री. नरेश महादेव कोळी २. संतोष महादेव कोळी ३. नुतन विनायक कोळी हे सर्व रा. मु. पो. करंजा ता. उरण, जि.रायगड यांच्या मालकीची ता.पेण जि. रायगड नगरपालिका हद्दीमधील सर्व्हे नं.३४अ, हिस्सा नं.२, भुमापन क्रमांक ६९, क्षेत्र १३.११ चौ.मी. ही मिळकत भुमी कॉम्प्लेक्समधील मगझीन मजला, गाळा नं.१७, नवीन कोळीवाडा येथे आहे. सदरची मिळकत मी स्वतः श्री. संतोष लक्ष्मण पाटील रा.पाटणोली, ता. पेण, जि.रायगड विकत घेण्याचे ठरविले आहे

तरी वर वर्णन केलेली मिळकत मी स्वता: कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०५ (पाच) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
१४/११/२०२५

**संतोष लक्ष्मण पाटील**
रा.पाटणोली,पो.कोप्रोली ता.पेण, जि.रायगड
पिनकोड : ४०२१०७
मो नंबर ९२२६८७१२६२



अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण अलिबाग यांचे न्यायालयात
कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ याचे कलम ३२ ग अन्वये
पोट-कलम (१) या अन्वये द्यावयाची
नोटीस — दावा क्रमांक ११/२०२५

१. अरविंद विठ्ठल निर्गुण (मयत) १. ज्योती दिपक विचारे
रा. देवा भरवाड चाळ, एस.पी.रोड,शितल हॉटेलजवळ, धारवाडी,
दहिसर पूर्व, मुंबई ४०००६८.
१/२. भारती संदिप महाबळे रा. दत्तगुरु उत्कर्ष संघ,
गिराजापती कंपाऊंड,शंकरा मंदिराजवळ, धारवाडी,
दहिसर - पूर्व, मुंबई ४०० ०६८.
१/३. लिना अमित पडवळ रा. देवा भरवाड चाळ, एस.पी.रोड,
शितल हॉटेलजवळ, धारवाडी, दहिसर पूर्व, मुंबई ४०००६८.
२. अरुणा मधुकर निर्गुण ऊर्फ अरुणा कमळाकर वाकडे
रा. मु. पो. सासवणे, ता. अलिबाग
३. अशोक विठोबा (विठ्ठल) निर्गुण रा.मुशेत, पो.मापगांव, ता.अलिबाग
४. कमळ ऊर्फ लक्ष्मीबाई रामचंद्र कदम (मयत)
४/१. सुनिल रामचंद्र कदम ४/२. प्रदिप रामचंद्र कदम
४/३. संदिप रामचंद्र कदम ४/४. संजय रामचंद्र कदम
४/१ ते ४/४ सर्व रा. मु. राजेवाडी, पो. रामराज, ता. अलिबाग
५.करुणा मधुकर निर्गुण ऊर्फ स्नेहा सुतेज लब्दे
रा.मु.मुशेत, पो. मापगाव, ता.अलिबाग
६. मालती मधुकर निर्गुण रा.मु.मुशेत, पो.मापगाव, ता.अलिबाग
७. पल्लवी ऊर्फ वासंती पांडुरंग कदम
रा.मु.मुनवली, हनुमान मंदिराजवळ, पो.मापगाव, ता.अलिबाग
८. विमल ऊर्फ तारामती हरिश्चंद्र पवार (मयत) ८/१. रोहिदास हरिश्चंद्र पवार
८/२. प्रल्हाद हरिश्चंद्र पवार ८/१ व ८/२ सर्व रा.मु.चोरंडे, हनुमान
मंदिराजवळ, पो.मापगाव, ता.अलिबाग ८/३. प्रमिला बाळाराम पिसाळ
रा. इटक हॉस्पीटल, आर. सी. बॅच नं. १४/१६१ सीजि गिडवानी, चेंबुर, मुंबई
४०० ०७४ ८/४. सादना वैजनाथ गुप्ता (मयत) ८/४/१. देवेंद्र वैजनाथ गुप्ता
८/४/२. प्रविण वैजनाथ गुप्ता रा.बोयला सोसायटी जवळ, डॉ.सि.जी.रोड,
अचल वाडी, वाडवली गाव, प्लॉट नं. २, चेंबूर, मुंबई ४०० ०७४.
८/४/३. जोत्स्ना सचिन दुबे रा.१९३२/२, प्रेम नगर, बी.जी.खेर मार्ग, वरळी,
मुंबई ४०००१८.
९. सुभाष विठोबा (विठ्ठल) निर्गुण (मयत)
९/१. सुषमा सुभाष निर्गुण ९/२. सुहास सुभाष निर्गुण **वादी/अर्जदार**
९/३. अमोल सुभाष निर्गुण ९/१ से ९/३ सर्व रा. ६७६, कांदेवाडी, भिंगारी,
ओ.एन.जी.सी. पनवेल, ता.पनवेल
१०. सुलभा रामभाऊ जगताप (मयत) १०/१.महेश रामभाऊ जगताप
१०/२. राजेंद्र रामभाऊ जगताप १०/३. दिनेश रामभाऊ जगताप (मयत)
१०/३/१. दिपिका दिनेश जगताप १०/३/२. अनिकेत दिनेश जगताप
१०/१ ते १०/३/२ सर्व रा. घर नं.२०, श्रीबाग नं.२,अलिबाग, ता.अलिबाग
१०/३/३. स्पृहा स्वप्नील वाळंज रा.मु.पो.कुरुळ, ता.अलिबाग
१०/४. शिल्पा शाम परब रा.मु.पो.चोरंडे, पो. मापगाव, ता. अलिबाग
१०/५. मिताली महादेव शिरोडकर रा.मु.पो.आग्राव, पो.चौल, ता.अलिबाग
१०/६. गौरी कांचन चौधरी रा.श्रीलक्ष्मी अपार्टमेंट, रुम नं.०५,
मार्डन टॉवर कंपाऊंड, दुसरा मजला, ठाणे-पश्चिम ४००६०१.
११. जयश्री सुरेश झोरे रा. सुर्यउदय सोसायटी, सेक्टर नं.१, प्लॉट नं.१७७/२,
कार्ड सिध्देश्वर रोड, चारकोप पश्चिम, कांदिवली पश्चिम, मुंबई ४०० ०६७.
१२. दत्ताराम गजानन नीलवर्ण रा.शांती सदन सोसायटी, उरण-मोरा रोड, रुम
नं. सी १०४, पहिला मजला, बोरीनाका उरण, ता.उरण
१३. मीना प्रकाश नीलवर्ण रा.उरण- मोरा रोड, सीडीकेट बँके बाजुला,
रुम नं. बी ४-२०४, सीव्हिव पार्क, उरण, ता.उरण
१४. रमाकांत गजानन नीलवर्ण रा.सिडको गार्डन जवळ, उत्सव सोसायटी,
रुम नं.बी १०३, प्लॉट नं.१०७/१०८, सेक्टर १०, नवीन पनवेल, ता.पनवेल
१५. स्नेहल विजय पवार रा.प्लॉट नं.२९, पवार चाळ, नंदादिप सोसायटीजवळ,
जोगेश्वरी, मुंबई ४०० ०६०.
१६. प्रिया प्रशांत मुवड १७. रंजना गणेश पाशिलकर

**विरुद्ध**

१. मालती गोविंद काळे २. कमल गणेश घैसास
३. विजया अनंत डोंगरे ४. शुभांगी गजानन भिडे
५. उल्हास चिंतामण रानडे ६.मेघा मिलिंद गोडबोले **- प्रतिवादी/सामनेवाला**
७. सुनंदा विश्वनाथ रानडे ८.वंदना प्रमोद पुराणिक
९. स्वरदा श्रीकांत वाकणकर रा.कु.वायशेत, पो.थळ, ता.अलिबाग

**विषय- मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन नियम १९५६ चे कलम ३२ ग प्रमाणे**

**जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | गट नं. | स.नं. | क्षेत्र हेक्टर आर | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| मौजे मुशेत, ता.अलिबाग | ४/३ | १/२ | ०-२१-२० | ४.५६ |

वादी/प्रतिवादी यांस या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, वादी यांनी उपरोक्त नमुद मिळकतीची मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट नियम १९५६ चे कलम ३२ग नुसार खरेदी किंमत ठरवून मिळणेकामी या न्यायालयात दि. २५/०९/२०२५ रोजी दावा/अर्ज दाखल केला आहे.

आता तुम्हास नियोजित खरेदीविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत घ्यावयाची असल्यास तारिख ०९/१२/२०२५ रोजी ११-०० वाजता तहसिल कार्यालय अलिबाग येथे शेतजमीन न्यायाधिकरणा पुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरुन फर्मावीत आहे जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्ही कसूर कराल तर त्या बाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामास तुमच्या गैरहजेरीत सुरुवात करण्यात येईल. आपण सदर सुनावणीस हजर न राहिल्यास उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग — सही/-
दिनांक :- ११/११/२०२५ — **(विक्रम पाटील)**
**अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण**
**अलिबाग- रायगड**


पान १ वरून

## जादूटोण्याच्या संशयावरून महिलेला मारहाण

महिला या तक्रारीनुसार फिर्यादी महिला आणि साक्षीदार आरोपीच्या घरी जाऊन ‘तुझा पती आमच्या घरावर जादूटोणा का करतो?’असा प्रश्न विचारल्याने आरोपी संतापला.आरोपी आणि इतरांनी गैरकायदेशीररीत्या मंडळी जमवून फिर्यादी व साक्षीदार यांना हाताने ढकलून शिवीगाळ केली तसेच जीवेठार मारण्याची धमकी दिली.

## ‘अमृत-१६’ ला जलसमाधी

त्यांपैकी तिघांची प्रकृती सुरुवातीला गंभीर होती. मात्र सध्या सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रभाकर भोये यांनी दिली. तटरक्षक दलाच्या वेळेवर आणि धाडसी कारवाईमुळे पाच कर्मचाऱ्यांचे जीव वाचले असले तरी, बेपत्ता कर्मचाऱ्याचा शोध घेण्यासाठी तटरक्षक दलाचे शोध आणि बचावकार्य युद्धपातळीवर सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

## रस्ता एक, भूमीपूजन अनेक

नागरिकांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला धारेवर धरले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी रात्रंदिवस काम करुन दोन दिवसांत पुल उभा केला. मात्र श्रेय लाटण्यासाठी पुन्हा एकदा आमदार महोदय भूमीपूजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करीत आहेत. रस्त्याचं काम सुरू न होता फक्त भूमीपूजनासाठीच हा मार्ग असल्याचं मत अनेकांनी व्यक्त केले असून त्यांना आता नारळफोडी, भाषणं आणि खोटी आश्वासनं नकोत तर प्रत्यक्ष काम हवं आहे, असेही मत त्यांनी व्यक्त केले. गुरुवारी दुपारी बेलकडे फाटा परिसरात भूमीपूजन बॅनर आणि शिवसेनेचे झेंडे लावण्यात आले. इपीसी अंतर्गत अलिबाग बायपास रोड ते अलिबाग- रोहा जंक्शनपासून बेलकडे ते गरुडपाडा, नागाव हटाळे ते रेवदंडा पूल रस्ता ते साळाव ते तळेखार हा रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन शुक्रवारी करण्यात येणार आहे.

यापूर्वी अलिबाग-रोहा रस्त्याचे काम २०१९ नंतर मंजूर झाले होते. हा रस्ता आपणच मंजूर केला असा दावा आमदारांनी केला होता. मात्र या रस्त्याच्या कामाला मुहूर्त मिळत नव्हता. अनेकवेळा बेलकडे येथे नारळ फोडीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भाजप आणि शिंदे गटात या कामाबाबत श्रेय वाद ही झाला होता. अखेर कामाला सुरुवात झाली. परंतू ते काम अपूर्ण अवस्थेत ठेवण्यात आले.मागील दीड वर्षापासून या रस्त्याचे काम थांबले आहे.

नवघर पुलासह वढाव येथील पूल धोकादायक झाले आहेत. या धोकादायक पुलांचे नुतनीकरण अद्याप झाले नाही. खानाव पासून उसर, वावे, आरसीएफ वसाहत प्रवेशद्वार ते बेलकडे रस्त्यावर आजही खड्डे पडले आहेत. मात्र रस्त्यांच्या दुरुस्तीकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याची चर्चा आहे.

## काशिदच्या सरपंचासह उपसरपंच व सदस्याला दणका

बांधकाम केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. जिल्हाधिकारी यांच्या निर्णयाने काशिदच्या सरपंचासह उपसरपंच व सदस्याला दणका मिळाला आहे. या निर्णयाकडे काशिदमधील नागरिकांचे लक्ष लागून राहिले होते. या निकालाबाबत ॲड. परेश देशमुख व रोहन खोपकर यांचे शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले आहे.

## बांधांवरून होणारे वाद मिटणार

दिलासादायक बाब म्हणजे एकाच कुटुंबातील जमिनीच्या पोटहिश्याची मोजणी अवघ्या २०० रुपयांत होणार आहे. कुटुंबाच्या नावे असलेल्या सातबारा उताऱ्यावरील प्रत्येक पोटहिश्शाच्या मोजणीसाठी केवळ २०० रुपयांचे शुल्क आकारले जाणार आहे. आता खासगी भूमापकांनी मोजणी कशी करायची, मोजणीनंतर हद्दखुणा निश्‍चित कशा करायच्या, त्यावेळी तालुक्यातील भूमिअभिलेख कार्यालयातून तपासणी करून घ्यावी, अशी कार्यपद्धती निश्‍चित केली जात आहे. कार्यपद्धती अंतिम होऊन त्याला शासनाची मान्यता मिळाल्यानंतर या नव्या पद्धतीनुसार अंमलबजावणी सुरु होणार आहे.

खासगी परवानाधारक भूमापक आता जमिनींची मोजणी करू शकणार आहे. त्यासंदर्भातील कार्यवाही निश्‍चित केली जात आहे. शासनाच्या महसूल व वन विभागाने १ सप्टेंबर २०२५ रोजी राजपत्र प्रसिद्ध केले आहे. त्यानंतर नुकतेच परिपत्रकदेखील काढण्यात आले आहे. लवकरच शासनाच्या या निर्णयानुसार कार्यवाही सुरु होईल. हा निर्णय शेतकऱ्यांसाठी खूप महत्त्वाचा आहे, असे भूमिअभिलेख विभागातील सूत्रांनी सांगितले.

## उद्यापासून वरसोली यात्रा

ते कार्तिक अमावस्येपर्यंत चालणार आहे. या यात्रेची सुरुवात काकड आरतीने होणार आहे. त्यानंतर महाआरती केली जाणार आहे. या यात्रेनिमित्त मंदिरात भजनांचे कार्यक्रम होणार आहेत. भाविकांची गैरसोय होऊ नये, याचीदेखील काळजी घेतली जाणार आहे. भाविकांना दर्शन घेता यावे, यासाठी दरवर्षी प्रमाणे यावर्षीदेखील योग्य अशा पध्दतीने रांगेतून येण्या-जाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेताना झुंबड होऊ नये, यासाठी योग्य असे व्यवस्थापन विठ्ठल रखुमाई मंदिर देवस्थान व यात्रा कमिटीने केले आहे.

सकाळपासून दिवसभर भजन, कीर्तन आदी धार्मिक उपक्रम घेण्यात येणार आहेत. पिण्याचे पाणी,वीज पुरवठा आदी सुविधा उपलब्ध करून दिले जाणार आहे. यात्रेमध्ये लाखो भाविक दर्शनासाठी येण्याची शक्यता आहे. भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अलिबाग पोलिसांमार्फत योग्य ते नियोजन करण्यात आले आहे. ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी गर्दीत पोलिसांची साध्या वेशात गस्त राहणार आहे. यात्रेमध्ये मदतीसाठी पोलीस मदत केंद्र उभारण्यात येणार आहे. सर्वांनी मंगलमय व आनंदमय वातावरणात हा सोहळा साजरा करा असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. यावर्षी वेगवेगळ्या खाद्य पदार्थांसह खेळणी, पूजेचे साहित्य,वस्तू, मिठाई, हार, फुलांचे एक हजार स्टॉल यात्रेमध्ये असणार आहे. मात्र मागील दहा दिवसांपूर्वी पडलेल्या पावसामुळे जमीन ओली असल्याने आकाशपाळणा व इतर मोठी खेळाची दुकाने उभारली जाणार नसल्याची माहिती समोर आली आहे.

# आज पोलादपूरात जनआक्रोश मोर्चा

## ।। अवाजवी घरपट्टी वाढीविरोधात एल्गार ।। प्रशासन, नगरसेवक अधिनियमांपुढे हतबल

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

**पोलदापूर तालुक्याच्या ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर झाल्यानंतर प्रशासनाने घरपट्टी वाढीसंदर्भात नोटीसा बजावल्या होत्या. तशाच यंदाही वाढीव अवाजवी घरपट्टी आकारणीसंदर्भात नोटीसा बजावण्यात आल्या. त्यामुळे जनतेमधून नाराजीचे सुर उमटत आहेत.त्यामुळेनागरिकांनीशुक्रवारी (दि.१४) घरपट्टीवाढीविरोधात जनआक्रोशमोर्चाकाढण्याचानिर्धार केला असून त्याबाबतचे निवेदन नगरपंचायतीचे मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.**




पोलादपूर तालुक्याच्या नगरपंचायतीने गेल्यावर्षी प्रमाणेच यंदाही पंचायत हद्दीतील नागरिकांना अवाजवी घरपट्टी आकारणी संदर्भात नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. त्यामुळे येथील नागरिकांमधून नाराजीचे सुर उमटत आहेत. या संदर्भात नागरिकांनी पोलादपूर बाजारपेठेतील गणेश मंदिरात तीन बैठका घेतल्या आणि शुक्रवारी जनआक्रोश मोर्चा काढण्याचा त्यांनी निर्धार केला. याबाबत त्यांनी बुधवारी (दि.१३) नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विनय शिपाई यांना निवेदन दिले. यावेळी दर्पण दरेकर, संतोष मोरे, प्रदीप भूतकर, गणेश शेठ, शैलेश पालकर, राजाभाऊ दिक्षित, सुनील भिलारे, गिरीधर दरेकर तसेच अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी मुख्याधिकाऱ्यांना शुक्रवारच्या जनआक्रोश मोर्चाबाबत रूपरेषा सांगितली. तसेच, या निवेदनाच्या प्रती पोलादपूर तहसिल कार्यालय आणि पोलीस ठाण्यातही देण्यात आल्या आहेत. त्यानंतर मुख्याधिकारी शिपाई यांनी केवळ दोनच तासांमध्ये निवेदन देणाऱ्या नागरिकांना चर्चेसाठी पाचारण करण्याचे पत्र पाठविले. त्यानुसार, नागरिक समस्या निवारण मंचातर्फे बुधवारी सायंकाळी प्रभारी नगराध्यक्ष प्रसाद इंगवले आणि विरोधीपक्षनेते दिलीप भागवत यांच्या उपस्थितीत नागरिकांसोबत चर्चा करण्यात आली. यावेळी मुख्याधिकारी विनय शिपाई आणि घरपट्टी मुल्यांकन मोजणीच्या ठेकेदार कंपनीचे प्रतिनिधी देखील उपस्थित होते.

याप्रसंगी नागरिक समस्या निवारण मंचातर्फे नगरसेवकांनी तात्काळ वसुलीला स्थगिती ठराव केल्यास नागरिकांना दिलासा मिळेल, असे सांगत सदोष मुल्यांकन रद्द करण्यासंदर्भात आग्रह धरण्यात आला. मात्र, नगरपंचायत प्रशासन आणि नगरसेवक अधिनियमांपुढे हतबल असल्याचे दिसून आले. त्यामुळे पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचाने शुक्रवारी (दि.१४) घरपट्टीवाढीविरोधात जनआक्रोश मोर्चा काढण्याचा निर्धार केला. हा मोर्चा सकाळी १० वाजता पोलादपूर शहरातील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे सभागृहापासून काढण्याचे निश्चित करण्यात आले आहे. तसेच, या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन नागरिक समस्या निवारण मंचातर्फे करण्यात आले आहे.

---

# पाताळगंगा येथील कंपनीत चोरी

## पोलिसांनी चोरट्याच्या मुसक्या आवळल्या

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी पाताळगंगा औद्योगिक परिसरातील वडगाव येथील एस.बी.स्कॅफहोल्डींग कंपनीच्या आवारातून बुधवारी (दि.१२) मध्यरात्रीच्या सुमारास चोरीची घटना घडली होती. या चोरीत सेन्टरींग कामासाठी लागणारे ५७ हजार ९० रुपयांचे एकूण ७७ ॲल्युमिनियमचे पॅनल चोरील गेले होते. याबाबत कंपनीचे एच.आर. मॅनेजर कृष्णा मिश्रा यांनी पोलीस ठाण्यात माहिती देताच वुयाळ येथील संजय म्हात्रे (३२) याला ताब्यात घेतले असून आणखी दोन साथीदारांचा तपास सुरु आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संजय म्हात्रे व त्यांच्या दोन साथीदारांनी एस.बी. स्कॅफहोल्डींग इंडिया कंपनीच्या गेट क्रमांक ४ ला लागून असलेल्या फटीतून आत प्रवेश केला. त्यानंतर ताडपत्री बांधून तयार केलेल्या ओपन शेडमध्ये प्रवेश करुन सेंटरींग कामासाठी लागणारे ॲल्यूमिनियमचे ५७ हजार ९० रुपये किमतीचे ७७ पॅनल कंपनी प्रशासनाच्या परवानगीशिवाय नेले. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून फॉरेन्सिक टिमला कळविण्यात आले आहे. रसायनीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस सचिन चौरे अधिक तपास करीत आहेत.

---

# उद्यमशिलतेतून महिलांनी सक्षम व्हावे

## जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे आवाहन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

उद्यमशिलतेतून सक्षम व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे. भारतीय उद्योजकता विकास संस्था अहमदाबाद, उदया प्रकल्प कार्यालय अलिबाग व टाटा कम्युनिकेशन्स मुंबई पुरस्कृत नावडे पनवेल को ऑफ इंडस्ट्रीज सभागृहात मंगळवारी (दि.११) महिलांकरीता उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.




या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पनवेल तहसीलदार मीनल भांबरे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस. हरळया, रायगड जिल्हा बँक तळोजाचे व्यवस्थापक नितेश तोंडसे, विजय लोखंडे, लक्ष्मण जाधव व राजश्री पाटील आदी उपस्थित होते. भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआय) व टाटा कम्युनिकेशन्सच्या सामाजिक दायित्व विभागाकडून पुरस्कृत उदया प्रकल्पांतर्गत दोन आठवडे महिला व दिव्यांगांकरिता उद्योजकता विकास कार्यक्रम घेण्यात आला होता. सर्व प्रथम ईडीआयचे प्रकल्प अधिकारी शशिकांत दनोरीकर यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

प्रशिक्षणामध्ये सहभागी प्रशिक्षणार्थींना जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात येऊन नावडे येथील महिला प्रशिक्षणार्थींनी सुरु केलेल्या माऊली भाकरी सेंटरचे उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता रायगड जिल्हा बँकेचे व जिल्हा उद्योग केंद्राचे मोलाचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन ईडीआय अलिबाग प्रकल्प अधिकारी शशिकांत दनोरीकर यांनी केले. या कार्यक्रमाला महिला प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.


---

# खासगी चालक-वाहकांची मनमानी

## श्रीवर्धनमधील नागरीक त्रस्त

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन आगारात लांब पल्ल्याच्या फेऱ्यांसाठी आगारात कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या खासगी बसेस सोडण्यात येतात. आगारातून पहाटेच्या वेळी मुंबई, सातारा, लातूर या बसेस श्रीवर्धन गावात फेरी घेत आपल्या मार्गावर मार्गस्थ होतात. तसेच, त्याच बसेसने सायंकाळी परतीच्या वेळी गावात फेरी घेऊन आगाराकडे जातील, असा नियम आहे. परंतु, या खासगी बसेस वरील चालक व वाहक हे बस गावात नेण्यासाठी टाळाटाळ करत असल्याने त्याचा त्रास प्रवासी वर्गाला सहन करावा लागत आहे.



श्रीवर्धन आगारात रात्रीच्या वेळी लातूर, सातारा व मुंबई येथून लांब पल्ल्याच्या बसेस येतात. येथील प्रवाशांची रात्रीच्या वेळी गैरसोय होऊ नये म्हणून एसटी बसेस श्रीवर्धन गावातून आगारात जातात. सध्या नालासोपारा, भाईंदर, बोरीवली या मार्गावर श्रीवर्धन आगाराच्या कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या खासगी बसेस सोडण्यात येतात. या मार्गावर चालक व वाहकाच्या मर्जीतील हॉटेलमधे बस नाष्टा व जेवणासाठी थांबवण्यात येते. परंतु, या हॉटेलमध्ये सुलभ शौचालय व स्वच्छता गृहाची वानवा असल्यामुळे प्रवासी वर्गाला त्रास सहन करावा लागतो. तसेच, परतीच्या मार्गात रात्रीच्या सुमारास खासगी बसेसने श्रीवर्धन गावातून फेरी मारत मगच आगारात जाण्याची नियमावली आहे. परंतु, या खासगी बसेसवरील चालक व वाहक हे बस गावात नेण्यासाठी टाळाटाळ करतात. बस नियोजित वेळेपेक्षा उशिरा श्रीवर्धन बसस्थानकाजवळ आली असता प्रवासी वर्गाला स्थानकाजवळ उतरवले जाते. बस गावात फेरी करीता नेण्यासाठी आग्रह केला असता प्रवासी वर्गाला चालक व वाहकाकडून अपमानास्पद वागणूक देण्यात येते. त्यामुळे गावातून फेरी आणि चालक-वाहकाच्या मर्जीतील हॉटेल या बाबतीत श्रीवर्धन आगाराकडून नियमावली लागू करण्यात यावी, अशी मागणी प्रवासी वर्गाकडून करण्यात येत आहे.

---

# सोळा लाखांची घरफोडी

**नवीन पनवेल :** पनवेल येथील महात्मा फुले रोडवरील चैतन्य काळे यांच्या घरात चोरीची घटना घडली आहे. त्यांच्या घराच्या दरवाजाची कडी कोयंडा तोडून आम पवेश करत कपाटातील दागिने आणि रोख रक्कम असा १६ लाखांचा ऐवज चोरून नेण्यात आला आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पनवेल शहर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

---

# शेतकऱ्यांचं नगदी पीक उद्ध्वस्त

**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**



लांबलेल्या परतीच्या पावसामुळेरायगडजिल्ह्यातील भात शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. त्याताच येथील हक्काच्या नाचणी व वरी या नगदी पिकांवर देखील संकट ओढावले आहे. सुधागड तालुक्यातील उसर येथील शेतकरी सदानंद मानकर यांच्या दोन एकरावरील हाताशी आलेले नाचणी व वरीचे पिक परतीच्या पावसामुळे अक्षरशः उद्ध्वस्त झाले आहे.

या नुकसानी बद्दल त्यांनी शासनाकडे नुकसान भरपाईची मागणी केली आहे. कारण त्यांचे हक्काचे उत्पादन व उत्पन्न आता मातीमोल मळिाले आहे. घर संसार चालवायचा कसा, असा प्रश्न आता सदानंद मानकर यांना पडला आहे.

---

# निवडक

## वाहनाच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**नवीन पनवेल :** पळस्पे येथे एका वाहनाने स्कुटीला धडक दिल्याने अपघात घडला. या अपघातात स्कुटी चालवणाऱ्या महिलेचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, रसायनी येथील शिखर ग्रीन सोसायटी येथील रंजीता त्रिपाठी (४२) या सोमवारी (दि.१०) रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास उलवे येथून एक्टिवा स्कुटीने रसायनी येथे येत होत्या. त्या पळस्पे येथील राहुल पार्क हॉटेलजवळ आल्या असत्या त्यांच्या पाठीमागून आलेल्या एका वाहनाने त्यांच्या स्कुटीला धडक दिली. त्यामुळे त्यांचा गाडीवरचा ताबा सुटला आणि त्या रस्त्यावर पडल्या. त्यामुळे त्यांच्याडोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना लगेचच पनवेल येथील गांधी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. परंतु, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

## व्यावसायिकांची लाखोंची फसवणूक

**नवीन पनवेल :** पनवेल येथील संतोष अस्वले यांचा बिल्डिंग मटेरियल सप्लायरचा व्यवसाय आहे. त्यांना ९ टन टाटा स्टीलची ऑर्डर मळिाली होती. डीलरकडे टाटा स्टील उपलब्ध नसल्याने त्यांनी गुगलवर व्यक्ती आणि एजन्सी सर्च केली असता मोबाईल नंबर मळिाला. त्यांच्याशी संपर्क केला असता समोरील व्यक्तीने ५ लाख १४ हजार ४०० रुपयांचे बिल पाठवले. त्यानंतर संतोष यांनी आरटीजीएस द्वारे पेमेंट केले. दुसऱ्या दिवशी समोरील व्यक्तीने लहान ऑर्डरसाठी डिलिव्हरी होऊ शकत नाही. १५ ते १८ टन ऑर्डर केल्यास डिलिव्हरी केली जाईल अन्यथा ऑर्डर ब्लॉक करून पैसे परत केले, जातील असे सांगितले. त्यावेळी संतोष यांनी पैसे परत करण्यास सांगितले असता २४ तासांत पैसे परत येतील, असे सांगण्यात आले. त्यानंतर संतोष यांनी बँकेत जाऊन चौकशी केली असता समोरील व्यक्तीचे नाव विनोद कुमार असून त्याची मेरठ येथील बँक असल्याचे समजले. परंतु, त्यांच्या खात्यात आरटीजीएस केलेले ५ लाख १४ हजार ४०० रुपये परत आले नाहीत. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर पनवेल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## हातभट्टी दारूप्रकरणी गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** गावठी भट्टीच्या दारू प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दोघांविरोधात विरोधात मंगळवारी (दि.११) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मळिालेल्या माहितीनुसार, मंगळवारी मानघर जंगलामध्ये गावठी हातभट्टीची दारू तयार होत असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मळिाली होती. त्यानुसार पोलीस माणघर जंगलात जाऊन त्या ठिकाणी पाहणी केली असता दोन व्यक्ती गावठी हातभट्टीची दारू काढत असल्याचे दिसून आले. त्यातील एक जण पळून गेला असून दुसऱ्याला ताब्यात घेण्यात आले आहे. त्याने त्याचे नाव बारक्या बबन कातकरी असे सांगितले असून पळून गेलेल्या व्यक्तीचे नाव राजू वास्कर असे सांगितले.

## राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

अलिबाग : महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये दि.१३ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अलिबागचे वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तथा सचिव तेजस्विनी निराळे यांनी दिली आहे. या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जिल्ह्यातील सर्व न्यायालयात प्रलंबित असलेली, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे व अपिले, मोटार अपघात प्रकरणे, विवाह विषयक प्रलंबित प्रकरणे तसेच ग्रामपंचायत यांच्याकडील घरपट्टी, पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, विजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर वित्तीय संस्था यांचेकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे ठेवण्यात येतात. त्यामुळे या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत यांनी केले आहे.

## श्रीवर्धनमध्ये उमेदवारी अर्ज भरण्यासाठी धावपळ

**श्रीवर्धन :** मागील चार वर्षांपासून रखडलेली महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक जाहीर झाल्यानंतर श्रीवर्धन नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी देखील जोरदार हालचालींना वेग आला आहे. अनेक राजकीय पक्षांच्या उमेदवारांसह, अपक्ष उमेदवार, त्याचप्रमाणे हौसे, नवसे यांनी कुठून आपल्याला संधी मिळते का? हे पाहून उमेदवारी अर्ज भरण्यासाठी धावपळ सुरू केलेली पाहायला मिळत आहे. यावेळी श्रीवर्धन नगर परिषदेचे १७ ऐवजी २० प्रभाग करण्यात आलेले आहेत. त्यामुळे यावेळीची नगर परिषदेची निवडणूक अत्यंत चुरशीची होणारब आहे. यादरम्यान, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पडलेल्या फुटीचा परिणाम नगरपरिषद निवडणुकीमध्ये पाहायला मिळणार आहे. नगरपरिषदेतील प्रभागांच्या निवडणुकांबरोबरच नगराध्यक्ष पदासाठी थेट निवडणूक होणार आहे. नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी देखील अनेक जण इच्छुक आहेत. त्यामुळे कुणाची वर्णी लागते, याकडे श्रीवर्धन वासियांचे लक्ष लागून राहिले आहे. परंतु, अद्यापही कुठल्याच राजकीय पक्षाकडून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीसाठी कोणत्याही प्रकारची घोषणा करण्यात आलेली नाही. तसेच, भाजपाच्या जुन्या कार्यकर्त्यांना निवडणूक प्रक्रियेपासून डावलले जात असल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

---


# SIMRAN MOTORS PVT LTD.

AUTHORISED DEALER OF MARUTI SUZUKI INDIA LTD

**WE ARE LOOKING FOR THE FOLLOWING MANPOWERS FOR OUR NEXA & ARENA DEALERSHIPS AT VARIOUS LOCATIONS (PANVEL, KHARGHAR, AIROLI)**

| SR.NO | DETAILS OF POSTS | NO OF VACANCY | REQUIRED EXPERIENCE |
|---|---|---|---|
| 1 | RM | 25 NOs | AUTOMOBILE EXPERIENCE IS PREFERED (NON AUTOMBOBILE SALES EXPERIENCE CANDIDATES CAN ALSO APPLY) |
| 2 | SRM | 10 NOS | 3-4 YEARS EXPERIENCE AS SRM |
| 3 | CRE-SALES | 10 NOS | WITH 1-2 YEARS EXPERIENCE |
| 4 | USED CAR MANAGER(TRUEVALUE) | 2 NOS | WITH 4-5 YEARS EXPERIENCE |
| 5 | SERVICE ADVISORS | 10 NOS | WITH 3-4 YEARS EXPERIENCE |
| 6 | CAR WASHERS | 4 NOS | ON COMPANY PAYROLL WITH PF/ESIC FACILITY |
| 7 | HOUSE KEEPING | 10 NOS | ON COMPANY PAYROLL WITH PF/ESIC FACILITY |
| 8 | DRIVERS | 5 NOS | 4-5 YEARS EXPERIENCE IS MUST |

INTERESTED CANDIDATES CAN APPLY ON MAIL : hrm@simranmotors.com

**CONTACT : MR.RAMESH PILLAI - 8433958585**
**MS.POOJA KAMBLE - 8657735940**





---

**जिजाऊ प्रतिष्ठानचा स्तुत उपक्रम | स्पर्शाने घेतला भेटीचा आनंद**

# दृष्टीबाधित विद्यार्थ्यांची 'जंजिरा' सफर

**। मुरूड-जंजिरा । प्रतिनिधी**

जिजाऊ प्रतिष्ठान आणि नॅशनल असो. फॉर ब्लाइंड यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग/दृष्टीबाधित विद्यार्थ्यांसाठी शनिवारी (दि.८) 'दुर्ग दर्शन मोहिम' जलदुर्ग जंजिरा किल्ल्यावर आयोजित करण्यात आली होती. यात नॅबचे २९ विद्यार्थी आणि ४ शिक्षिकांनी सहभाग घेतला. जिजाऊ प्रतिष्ठानचे संस्थापक चंद्रकांत साटम यांच्या नेतृत्वाखाली २९ स्वयंसेवकांच्या देखरेखीखाली ही मोहीम यशस्वी रित्या पार पडली.



शनिवारी सकाळी दहिसर वरून प्रस्थान करून मुरूडमधील एकदरा या ठिकाणी दिव्यांग/दृष्टीबाधित विद्यार्थी आणि जिजाऊ प्रतिष्ठानचे स्वयंसेवक समूह एकत्रित जमले. त्यानंतर त्यांनी जंजिरा किल्ल्याकडे प्रस्थान केले. या विशिष्ट म ुलांना मोहिमेची माहिती जंजिरा किल्ल्यातील केंद्र पुरातत्व विभागाचे अधिकारी सहाय्यक संवर्धक बी.जी. येलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली बहुउद्देशीय कर्मचारी प्रकाश घुगरे आणि कर्मचाऱ्यांनी दिली. दरम्यान, या मोहिमेत मुलांना शिडाच्या हेलकावणाऱ्या बोटीत चढवणे आणि किल्ल्यावरील प्रवेशद्वारात उतरवणे हे काम जिकरीचे होते. ते आव्हानही सर्वांनी योग्य प्रकारे स्वीकारले. यावेळी किल्ल्याच्या महादरवाजावरील लोखंडी कडी, टोकदार खिळे आपल्या हस्तस्पर्शाने पाहून दुर्ग भ्रमंतीला प्रारंभ केला. पुढे जंजिऱ्याला अजिंक्य ठेवणाऱ्या महाकाय पंचधातुने मढविलेल्या तोफांना हस्तस्पर्श करीत आगळी वेगळी अनुभूती घेतली.

यावेळी प्रा. डॉ. मृण्मयी साटम यांनी ऐतिहासिक दस्ताऐवजांचा संदर्भ देत किल्ल्याच्या गत स्मृतींना उजाळा दिला. या विद्यार्थ्यांनी किल्ल्याच्या दुर्ग अवशेष हे आपल्याला सोबतच्या स्वयंसेवकांच्या डोळ्यांनी न्याहळत किल्ल्याच्या तटबंदी वरील मार्गावरून किल्ल्याची प्रदक्षिणा पूर्ण केली. परतीच्या प्रवासात दुपारी पुन्हा मुलांना जंजिऱ्याच्या महादरवाज्यातील पायऱ्यांच्या जवळ हेलकावणाऱ्या होडीत सुरक्षित पणे चढवून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने सर्वांनी जंजिरा किल्ल्याचा निरोप घेतला.

सहली दरम्यान खूप चांगला अनुभव मिळाला, स्वयंसेवकांनी खूप चांगल्या प्रकारे काळजी घेतली. इतिहास हा प्रेरणादायी होता. शिडाच्या होडीतील प्रवास थोडा भीतीदायक पण तितकाच आनंददायी होता, अशा प्रतिक्रिया विद्यार्थ्यांसह शिक्षक वृंदानी दिल्या.

## बेटकुळ्यांच्या मर्यादा

नगरपंचायती आणि परिषदांच्या निवडणुकांची धामधूम सुरू आहे. सगळ्या पक्षांचे स्थानिक नेते व कार्यकर्ते यांना आपण एकट्याने लढावे असे वाटत आहे. आपली ताकद किती भारी आहे याचे प्रदर्शन चालू आहे. असलेल्या, नसलेल्या दंडाच्या बेटकुळ्या दाखवणे चालू आहे. हा विषय राज्य पातळीवर गेला की तिथले नेते सबुरीने घेण्याची भाषा करीत आहेत. भाजपवाले विशेष जोरात आहेत. त्यांना सगळीकडे कमळ फुलले आहे असा भास होतो. पण देवेंद्रांना वस्तुस्थिती ठाऊक आहे. नगरपंचायती किंवा परिषदांची शहरे छोटी आहेत. काही ठिकाणी तर जेमतेम १७ जागा आहेत. स्थानिक पातळीवर अनेक अपक्ष रिंगणात असणार आहेत. दोन-तीनशे मतेही निर्णायक ठरू शकतात. अशा वेळी सर्वत्र स्वबळाचा नारा देणे शहाणपणाचे नाही. एकमेकां साह्य करू हाच मार्ग सोईस्कर आहे. त्यातच अनेक शहरांमध्ये तब्बल पाच वर्षांनी निवडणुका होत आहेत. मधल्या काळात राज्याचे राजकारण उलटेसुलटे झाले आहे. आधी सेना वा काँग्रेसमधून कंटाळून लोक भाजपमध्ये गेले होते. पण नंतर सेना व राष्ट्रवादीमध्येच फूट पडली आणि शिंदे व अजितदादा भाजपसोबत आले. त्यामुळे पूर्वी जे एकमेकांना वैतागले होते वा शत्रू मानत होते त्यांना एकमेकांशेजारी बसण्याची पाळी आली आहे. दुसरीकडे शिवसेना हा परवापर्यंत जातीयवादी पक्ष म्हटला जात होता. पण आता शरद पवार गट व काँग्रेस उध्दव यांच्यासोबत आहेत. तिथेही कालचे शत्रू, आजचे मित्र अशी स्थिती आहे. पूर्वी नेत्यांसोबतचे कार्यकर्ते पक्के असत. पण आता कार्यकर्त्यांनाही स्वतःची मते आली आहेत. ते स्वाभाविकही आहे. त्यामुळे नेते व कार्यकर्ते यांचीही फाटाफूट झाली आहे. त्यामुळे लोकांची मते नक्की कोणाला जाणार याचा शेवटपर्यंत अंदाज बांधणे अवघड आहे. त्यातच भाजपचे हिंदुत्व किंवा काँग्रेसचा नेहरुवाद स्थानिक पातळीवर चालत नसतो. तिथे लोक नेत्यांकडे पाहून मतदान करतात. अजब-गजब लोकांची एकमेकांशी मैत्री असते. हे सगळे हिशेब पाहता, निदान नगरपरिषदांच्या निवडणुकीत तरी स्वबळ नावाची गोष्ट किती अवघड असते हे ध्यानात यावे.

### आघाडीला अखेर शहाणपण

गंमत अशी आहे की, महायुतीमध्ये स्वबळाचे दावे व भांडणे सर्वाधिक आहेत. पण मिडियातून चित्र मात्र नेहमीप्रमाणे महाविकास आघाडीतील भांडणांचे अधिक आहे. आघाडीत बिघाडी अशी शीर्षके रोज चालू आहेत. याला आघाडीचे नेतेही जबाबदार आहेत. यांच्या तीन नेत्यांची तोंडे सहा दिशांना आहेत. प्रत्येक जण रोज उठून वेगवेगळे वक्तव्य करतो आहे. मनसेसोबतच्या युतीचा मुद्दा घ्या. मुंबई व काही प्रमाणात नाशिक या महानगरपालिका वगळता मनसेची ताकद बाहेर खूपच मर्यादित आहे. त्यामुळे नगरपालिकेच्या निवडणुकीत मनसेसोबत जायचे की नाही यावरून वितंडवाद होण्याचे वास्तविक काही कारण नाही. पण यावरून काँग्रेसचे प्रदेश प्रमुख हर्षवर्धन सकपाळ यांनी आजतागायत विनाकारण मनसेला दुखावणारी वक्तव्ये केली आहेत. मनसेशी युती केल्याने मुंबईत हिंदी भाषकांची मते मिळणार नाहीत हाही मिडियाने पसरवलेला गैरसमज आहे. गंमत पाहा. गेल्या वर्षी लोकसभेला राज ठाकरे यांनी भाजप व मोदींचा प्रचार भाषणामधून केला. पण त्यामुळे आपल्याला उत्तर प्रदेश वा बिहारमध्ये फटका बसेल असे भाजपला वाटले नाही वा मिडियानेही तसा प्रचार केला नाही. काँग्रेसला मात्र मिडिया हा बागुलबुवा दाखवतो आणि काँग्रेसवाले त्याला बळी पडतात हा आश्चर्यकारक प्रकार आहे. सुदैवाने आता आघाडीतील नेत्यांना शहाणपणा सुचला असून त्यांनी युत्या करण्याचे अधिकार स्थानिक पातळीवर देऊन टाकले आहेत. शिवाय, आघाडीमध्ये समन्वयासाठी सकपाळ, अनिल परब व शशिकांत शिंदे यांची समिती नेमली आहे. आता तरी जाहीर भांडणे बंद होतील अशी आशा आहे. महायुतीच्या नेत्यांनी याबाबत अधिक शहाणपणा दाखवला. शक्यतो एकत्र लढू, पण जिथे शक्य नाही तिथे एकमेकांवर टोकाची टीका करू नका असे स्पष्ट निर्देश देवेंद्र फडणवीस कार्यकर्त्यांना देत आहेत. अर्थात त्याने फरक पडलेला नाही. सिंधुदुर्गात महायुती एकत्र आहे असे नारायण राणे यांनी सांगितल्याच्या दुसऱ्याच दिवशी नितेश राणे उदय सामंतांना इशारे देत आहेत व भाजपच्या पोस्टरवरचे एकनाथ शिंदे यांचे छायाचित्र काढून टाकले जात आहे.

### दोन्ही पवार एकत्र

ठाणे व नवी मुंबईत तर भाजपवाल्यांनी थेट एकनाथ शिंदे यांच्या दाढीला हात घालण्याची तयारी चालवली आहे. मराठवाडा, विदर्भात शिंदेंच्या मंत्र्यांचा आत्मविश्वास भयंकर वाढला आहे. इकडे पश्चिम महाराष्ट्रात सातारा व कोल्हापूरवर शिंदे दावा करीत आहेत. पुण्यात अजितदादा आणि भाजप यांच्यात चकमकी सुरू झाल्या आहेत. नाशिकमध्ये शिंदे विरुध्द दादा विरुध्द भाजप असा सामना आहे. पण टीव्ही वाहिन्यावाले महायुतीच्या प्रचाराच्या अमलाखाली असल्याने या लढाया झाकून ठेवल्या जात आहेत. शिंदे व अजितदादा यांची ताकद ठराविक भागातच आहे. उदाहरणार्थ, नाशिक, नगर, सातारा, पुणे व सोलापूर या जिल्ह्यांमध्ये दादांनी जोर लावला आहे. पण भाजपने नेमके याच परिसरात गेल्या चार महिन्यात प्रचंड फोडाफोड्या केल्या आहेत. सोलापुरात तर दादांचा गट साफ झाला आहे. पुण्यातली पार्थची जमिनीची जी भानगड बाहेर येण्यामध्येही असेच हिशेब आहेत. वास्तविक ही सरकारी जमीन आपल्याला हस्तांतरीत करावी असे पत्र शीतल तेजवानी हिने गेल्या डिसेंबरमध्ये जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. म्हणजेच तेव्हापासून हा प्रकार मुख्यमंत्र्यांना व महसूलमंत्री बावनकुळे यांना ठाऊक असणार. पण तो अचूक निवडणुकांच्या तोंडावर बाहेर यावा हे उल्लेखनीय आहे. आता शिंदे गटाचीही अशीच काही प्रकरणे बाहेर येण्याची शक्यता आहे. अर्थात, खुद्द भाजपमध्येही सर्व काही आलबेल नाही. शिंदे व दादांना सत्तेत भागीदारी द्यावी लागल्याने असंख्य जण नाराज आहेत. त्यामुळे वरिष्ठांना न जुमानता अगदी नागपुरातही बंडाळी करण्याचे घाटते आहे. खुद्द बावनकुळे यांच्या मतदारसंघातही शिंदे गटाला सोबत न घेण्याबाबत भाजपवाले ठाम आहेत. रायगडातही या तीन जणांची तोंडे तीन दिशांना आहेत. रवींद्र चव्हाण यांची कार्यशैली सर्वांना मान्य नाही. यावर इलाज म्हणून देवेंद्रांनी आता बावनकुळे यांना निवडणुकीचे प्रभारी म्हणून नेमले आहे. बावनकुळे यांच्यापाशी मंत्रिपदाचा वचक आहे. तो मतभेद मिटवण्याच्या कामी येईल असे भाजपच्या नेत्यांना वाटत असावे. ते होईल का हे दिसेलच. दरम्यान, शरद पवार यांनी भाजप सोडून कोणाशीही युती करायला हरकत नाही असा सल्ला दिला आहे. याचा अर्थ अजितदादांसोबत जाण्यास त्यांनी स्थानिकांचा मार्ग मोकळा करून दिला आहे. यामुळे राष्ट्रवादीची दुभंगलेली ताकद एक होईल व पुणे जिल्ह्यात बारामती किंवा सातारा जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी तरी सत्तेची सूत्रे हाती राहतील असा त्यामागचा हिशेब आहे.

---

**विचार**

# पालकांनी बालकाशी पालकासम वागणे...

***बालक दिनाचा खरा उद्देश म्हणजे बालक आपल्या समाजाचे भविष्य आहे याचे स्मरण समाजाला होणे आणि हे भविष्य सुरक्षित असावे म्हणून बालकांप्रती समाजाच्या जबाबदारीची जाणीव वाढीस लागणे. प्रत्यक्षात एक सामाजिक घटक म्हणून किंवा पालक म्हणून आपली वागणूक बालक दिनाच्या उद्देशाला पूरक आहे का, याचा गांभिर्याने विचार करण्याची गरज आहे. १४ नोव्हेंबरच्या बाल दिनाच्या पार्श्वभूमीवर ही संधी घेता येते.***



**डॉ. साधना कुलकर्णी**

शीर्षक वाचून मनात गोंधळ उडाला असणार. हरकत नाही. बालक आणि पालक यांचे एकमेकांशी कसे संबंध असावेत, हा विषय कायमच ज्वलंत रहाणार आहे. प्रामुख्याने हे संबंध तपासताना आमचे पालक, आमचे लहानपण, आमचे पालकपण... या फुटपट्ट्या लावल्या जातात आणि नेमका तिथेच गोंधळ होतो. असो. निमित्त आहे बालक दिनाचे आणि नुकताच 'केबीसी'मध्ये इशित भट्ट हॉट सीटवर विराजमान झाल्यानंतरचा प्रसंग. या प्रसंगाच्या खोलात शिरण्याची गरज नाही, कारण तो सगळ्यांना माहित आहे. या प्रसंगावर पालक, शिक्षक, समुपदेशक, बालमनसशास्त्रज्ञ, लाईफ कोच सगळ्यांनाच व्यक्त व्हावंसं वाटलं. त्यांनी लिखाणातून आपली मतं मांडली. सामान्य जनतेने गप्पांमधून, बडबड करून यथेच्छ तोंडसुख घेतलं. कुणी समाजमाध्यमाला, कुणी पालकत्वाला, कुणी शिक्षणपद्धतीला, कुणी संस्कारशून्य पिढीला तर कुणी विभक्त कुटुंबपद्धतीला जबाबदार ठरवलं. खरं तर, दुसऱ्याकडे बोट दाखवलं की उरलेल्या तीन बोटांची दिशा स्वतःकडे असते, हा साधा नियम आपण विसरून गेलोय. समोरच्याला दोषी ठरवण्यासाठी आम्ही इतके उतावीळ, उत्तेजित आणि सर्वज्ञानी असतो की त्या भरात तारतम्य न ठेवता भाष्य करण्याचीच आम्हाला प्रौढी वाटते. किंबहुना, त्यासाठी हल्ली काही ना काही निमित्तच हवं असतं आणि तसं नसेल तर ते निमित्त शोधून काढलं जातं. त्यावर चर्चेचा धुराळा उडतो. मतमतांतरांचं मंथन होतं आणि काहीही निष्पन्न न होताच सगळं काही शांत होतं, विस्मरणात जातं.

इशीत भट्ट हा लहान मुलगा. जेमतेम दहा - बारा वर्षाचा मुलगा. या वयाची मुलं आपल्या घरात असली की हल्लीची पिढी काय हुषार आहे नाही, हे वाक्य आपण दिवसातून कमीत कमी तीनदा तरी आळवतो. पण हीच मुलं शेजारच्या घरात असली की आगाऊ आणि भोचक वाटू लागतात. इशीत भट्ट हा मुलगा नेमका 'केबीसी'मध्ये महानायक अमिताभ बच्चन यांच्यासमोर आल्यामुळे या प्रसंगाची प्रसिद्धी कमालीची वाढली. अमिताभ बच्चन यांच्याबद्दल ज्या भावना, जी आदरयुक्त भीती, जे दडपण मोठ्यांना येतं, तसं इशीत भट्टला वाटणं शक्यच नाही. अमिताभ बच्चनला प्रत्यक्ष समोर बघताना अतिउत्तेजित होऊन 'अजि म्या ब्रम्ह पाहिले' या भावनेने भल्याभल्यांना सुचेनासे होते, हे आपण अनेकदा बघितले आहे. पण इशीतच्या पिढीने केवळ केबीसीमध्ये आणि जाहिरातीतच त्यांना बघितलं असण्याची शक्यता आहे आणि ते ही घरी नियमित केबीसी बघितले जात असेल तरच. पालकांनी अमिताभच्या व्यक्तिमत्वाचा आवाका इशीतला सांगितला असेलही. पण ती माहीती गांभिर्याने घेण्याचं त्याचं वय नाही आणि तेवढी त्याला समजही नाही. इशीत उद्धटपणे, आगाऊपणे वागला असं भाष्य करणाऱ्यांनी लहान मुलांचे नृत्याचे आणि संगीताचे रिॲलिटी शो बघावेत. लहान मुले बघत असलेल्या कार्टून्समधल्या पात्रांचा अभ्यास करावा. जाहिरातीतली लहान मुलं बघावीत आणि रोजच्या हिंदी आणि मराठीमधल्या संस्कारी मालिका बघाव्यात.

जेमतेम अर्धा तास इशीत हॉट सीटवर होता आणि तेवढ्याच वेळात त्याच्या वागण्यावर गदारोळ उठला. ज्यावेळी याच वयाची मुलं रिॲलिटी शोमध्ये नृत्य करतात, गाणी गातात, त्यावेळी तर अनेकदा वयाला न साजेशा गाण्यांची निवड केली जाते. त्यावर नृत्य करताना उत्तेजक हावभाव, विचित्र स्टेप्स बघणं असह्य होतं. या शोमधले परीक्षकही डोकं गहाण ठेवून केवळ कौतुक करण्यासाठी आणि छचोरपणा करण्यासाठी बसलेले असतात. परफॉर्मन्सच्या मध्ये सुरु असलेली हुल्लडबाजी आणि वाह्यातपणा बघता संतापाशिवाय दुसरी कोणतीच भावना मनात येत नाही. स्पर्धकांच्या जोड्या जमवल्या जातात, त्यांना एकमेकांवरुन चिडवलं जातं. प्रपोज करणं, क्रश, ब्रेकअप, लव्ह ट्रँगल... ही भाषा सतत वापरली जाते आणि या प्रकाराचं प्रचंड कौतुक केलं जातं. म्हणजे प्रत्यक्षातही असंच वागायचं असतं अशी स्पर्धकांची समजूत होतेच, पण बघणाऱ्या असंख्य लहान मुलांचीही खात्री होते. परफॉर्मन्सवर टिप्स, चुका समजावणं, सुधारणा करणं या बाबी महत्वाच्या नसतातच. प्रत्येक परीक्षक शब्दकोषात कौतुकभरल्या नवीन शब्दांची मोलाची भर टाकण्याचे काम नेमाने करत असतो. फक्त कौतुक आणि तोंडी लावायला रडणं. रडणं हे भावनिक बुद्ध्यांक दाखवणारं. त्याचं प्रदर्शन पण अत्यावश्यक. स्पर्धक, परीक्षक, प्रेक्षक यांनी टिपं गाळून आपल्या 'संवेदनशीलतेचं प्रदर्शन करणं' ही अट पाळली की पुढच्या राऊंडच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा. शास्त्र असतं ते. त्यामुळे टिपं गाळण्याचं हे संसर्गजन्य अस्त्र कायम सगळेचजण भात्यात ठेवून असतात.

अशा रिॲलिटी शोवर कुणीच काहीच कसं बोलत नाही? इशीत तर फक्त अर्धा तास पडद्यावर होता. बाकी शो मधील मुलं तर दर आठवड्याला पडद्यावर येतात आणि परीक्षक आणि स्पर्धकांचे निरर्थक संवाद, माकडचाळे बघावे लागतात. निषेध करायचा, टीका करायची किंवा गदारोळ करायचा तर केबीसीतल्या इशीतवरच का? तसंच अनेकांच्या घरी टीव्हीवर मालिका बघितल्या जातात. वडीलधारी बघतातच पण त्याचा कळत-नकळत परिणाम लहानांवरही होत असतो. शून्य अभिरूची आणि बुद्धीशी फटकून असलेल्या या मालिकांमध्ये नकारात्मक व्यक्तिरेखांचे उदात्तीकरण इतक्या जास्त प्रमाणात दाखवले जाते की अशी पात्रं प्रत्यक्षातही असणार, यावर लहान मुलांचा नक्कीच विश्वास बसू लागतो. फरशीवर तेल सांडवणं, पदार्थात मीठ/ तिखट ओतणं, गॅसचा नॉब उघडून ठेवणं, कपड्यांवर शाई सांडवणं... बालबुद्धीलाही लाजवतील अशा अभिनव कल्पनांचा सुकाळ असणाऱ्या या मालिका लहान पिढीवर काय परिणाम करत असतील याचा विचारही करवत नाही. हीच बाब मुलांच्या कार्टून शोबद्दल. त्यातली पात्रं तर कमालीची आगाऊ, वात्रट आणि वाचाळ असतात. लहान मुलं तर या कार्टून्सच्या आकंठ प्रेमात बुडालेली असतात. अशा वेळी त्यांचं अनुकरण मुलांनी केलं नाही तरच नवल. हे सगळे टीव्हीच्या माध्यमातून होणारे संस्कार. पण घरातल्या पालकांकडून काय घडतं? लहान मुलांनी काढलेली चित्रं, गायलेली गाणी, कविता, केलेला नाच, फॅन्सी ड्रेस या सगळ्यांचं शूटींग करून रील्स काढली जातात, पोस्ट केली जातात. मग त्यानंतर पडणारा कौतुकाचा आणि लाईक्सचा पाऊस.. हे सगळे कुळाचार घरी यथास्थित पार पडत असल्याने लहान मुलांना ते नॉर्मल वाटू लागतं. कौतुक, प्रसिद्धी, रील, फोटो या दैनंदिन जगण्यातल्या आवश्यक बाबी आहेत असा त्यांचा समज होत असेल तर नेमका दोष कुणाचा? मुलांनी काहीही केलं तरी टाळ्या पडल्याच पाहिजेत, हा पालकांचा अट्टाहास मुलांवरही परिणाम करतो. आपल्यावर टीका केलेली मुलांना अजिबात सहन होत नाही. कोणतीही कृती करण्याच्या आनंदापेक्षा त्याचं प्रदर्शन करणं मुलांना महत्वाचं वाटू लागतं. अगदी अतिरेक म्हणजे काही पालक मुलांच्या गुणपत्रिकासुद्धा समाजमाध्यमावर टाकतात. याशिवाय हल्लीच्या पालकत्वानुसार मुलं आणि आईवडिलांचे मैत्रीपूर्ण संबंध असावेत असं शास्त्र आहे. पण प्रसंगी मैत्रीची मर्यादा ओलांडून ही मुले दादागिरी कधी करू लागतात हे समजतही नाही. त्यामुळे आजच्या कुटुंबात सगळ्यात जास्त धाक कुणाचा असेल तर तो लहान मुलाचा. त्याची आवडनिवड, त्याचे हट्ट त्याच्या मागण्या, त्याचे लाड ही पालकांची प्राथमिकता झाली आहे. ही मुलं आई वडिलांशी, आजी-आजोबांशी, पाहुण्यांशी उद्धटपणे बोलतात. अशा वेळी इशीतवरच दोषारोपण का?

आज समाजात संस्कारवर्गाची खरी आणि महत्वाची भूमिका बजावली जाते आहे ती तंत्रज्ञान आणि समाजमाध्यमांद्वारे. या वेगवान त्सुनामीमध्ये सगळेच भरडून निघताहेत. पण खरी फरपट होते आहे ती लहान मुलांची. त्यांना या माध्यमाचे आकर्षण वाटणं, त्यावर विश्वास बसणं, त्यांनी या आभासी दुनियेचं अनुकरण करणं हे साहजिकच आहे, कारण त्यांचा जन्मच मुळी हातात स्मार्टफोन घेऊन झाला आहे. पण त्सुनामीच्या या लाटेत पालकही वहावत जायला लागले तर कसं होईल? आज गोकुळाष्टमी म्हणजे दहीहंडीचा उत्सव, गणेशोत्सव म्हणजे मिरवणुका आणि ढोल, नवरात्र म्हणजे नऊ रंगाचे कपडे आणि गरबा, दिवाळी म्हणजे रोषणाई, फटाके आणि भेटवस्तू... असे लहान पिढीचे समज झाले आहेत. हे चुकीचे समज कुणामुळे? आपणच आपलं आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. खरं तर अशा वेळी एका दीपस्तंभाप्रमाणे आज पालकांनी आपल्या मुलांना योग्य मार्गदर्शन करणं गरजेचं आहे. मुलं कुठेही भरकटली तरी त्यांना त्यांचा दीपस्तंभ पालकांनी उपलब्ध करून दिला पाहिजे. दुर्दैवाने आजच्या वेगवान तंत्रयुगात पालकांच्या हाती मोजकेच पत्ते उरले आहेत. अनेक आगाऊ, अनावश्यक बाबींवर त्यांचा ताबा असूच शकत नाही. बाहेरच्या प्रत्येक प्रलोभनावर पालकांनी नियंत्रण ठेवणं अशक्य आहे. पण उरलेले हातातले पत्ते हे हुकुमाचे असणं ही आजच्या काळाची गरज आहे. मग पालकांनी नेमकं करावं तरी काय? पालकांनी इतरांना दोष न देता, आपलं लहानपण आठवावं. आई वडिलांची वागणूक आठवावी. आपल्या स्वतःच्या पालकांचाच आदर्श समोर ठेवून वागलं नाही तर भविष्य कठीण असणार आहे. म्हणूनच २०२५ च्या बालकदिनाच्या निमित्ताने 'हीच अमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे। पालकांनी बालकांशी पालकासम वागणे।'

---

# दहशतवादाविरुद्धचे युद्ध अद्याप संपलेले नाही

**सुयोग आंग्रे**

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या शक्तिशाली स्फोटाने पुन्हा एकदा आठवण करून दिली की भारताचे दहशतवादाविरुद्धचे युद्ध अद्याप संपलेले नाही. ऑपरेशन सिंदूरच्या अवघ्या काही महिन्यांनंतरची ही दहशतवादी घटना पुष्टी करते की युद्ध नुकतेच एका नव्या टप्प्यात दाखल झाले आहे. शत्रू कमकुवत झाला असला तरी प्रहार करण्यास सक्षम आहे. चिंताजनक बाब म्हणजे लाल किल्ल्यावरील दहशतवादी घटनेचा कट अतिशय काळजीपूर्वक रचण्यात आला होता. दहशतवादाच्या या कृत्यात डॉक्टरांचा सहभाग दर्शवतो की, पूर्वी सुरक्षित समजल्या जाणाऱ्या विद्यापीठे आणि रुग्णालयांसारख्या ठिकाणीही कट्टरतावाद आता शिरकाव करत आहे. लाल किल्ला स्फोटाची घटना २७ ऑक्टोबर रोजी सुरू झाली, जेव्हा जैश-ए-मोहम्मदचे पोस्टर्स श्रीनगरमध्ये दिसू लागले. सीसीटीव्ही फुटेजमुळे पोलिसांना डॉ. आदिलची ओळख पटवण्यात मदत झाली, ज्याला नंतर उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथून अटक करण्यात आली.अनंतनागच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात तपासकर्त्यांनी त्याच्या लॉकरची झडती घेतली तेव्हा त्यांना एक असॉल्ट रायफल सापडली. त्याच्या चौकशीदरम्यान, पोलिसांना फरीदाबादमध्ये लपवून ठेवलेला स्फोटकांचा साठा सापडला, ज्यावरून हे नेटवर्क काश्मीरपासून दिल्ली-एनसीआरपर्यंत पसरले आहे. भारताच्या सीमेपलीकडेही या नेटवर्कच्या तारा जोडलेल्या आहेत. दहशतवाद्यांचे हस्तक पाकिस्तानमध्ये सक्रिय होते. या प्रकरणात आणखी एक दहशतवादी अल फलाह विद्यापीठातील डॉ. मुझम्मील शकील यालाही अटक करण्यात आली आहे. डॉक्टर उमर मोहम्मद देखील स्फोटकांनी



भरलेली कार चालवत होते.अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित आत्मघाती हल्लेखोर दिल्लीत घुसला होता आणि त्याने मशिदीजवळ वाहन पार्क केले होते. सीसीटीव्ही फुटेजमध्ये असे दिसून आले आहे की, कार उभी असताना तो एकदाही बाहेर पडला नाही. जणू काही तो सूचनांची वाट पाहत होता किंवा त्याच्या उद्दिष्टाची वाट पाहत होता. फरिदाबादमधील अटकेमुळे गटामध्ये दहशत पसरली असावी, असा तपास अधिकाऱ्यांचा विश्वास आहे. आपण अडकलो आहोत हे लक्षात येताच उमर मोहम्मदने निराशेतून किंवा घाबरून बॉम्बचा स्फोट केला असावा. त्याच्या हँडलरने त्याला जिवंत पकडण्यापेक्षा आत्मघातकी हल्ला करण्यास पटवले असावे. ते काहीही असो, अतिरेकी गट हौतात्म्य हे एक उदात्त कृत्य आहे असे मानून तरुण सुशिक्षित मनांवर प्रभाव टाकतात, हे कुणापासून लपून राहिलेले नाही.भविष्यात असे हल्ले होऊ नयेत यासाठी कडक दक्षतेची गरज आहे. सुरक्षा, दक्षता ही केवळ जम्मू-काश्मीर किंवा दिल्लीसारख्या मोठ्या शहरांपुरती मर्यादित न राहता संपूर्ण देशात असायला हवी. अतिरेक्यांकडून जप्त करण्यात आलेली स्फोटके ही संभाव्य विनाशाची पातळी दर्शविते. त्यामुळे अनेक बॉम्बस्फोटांची योजना आखण्यात आली असावी, असा संशय निर्माण झाला आहे. त्यामुळे गुप्तचर नेटवर्क मजबूत करणे, शहरी आणि निमशहरी भागात पाळत ठेवणे आणि आंतर-एजन्सी समन्वय सुधारणे महत्त्वाचे आहे. राजनैतिक आघाडीवर भारतानेही दहशतवादाला बळी पडलेल्या पाकिस्तानचे छुपे समर्थन करण्याची पाकिस्तानची दुटप्पी खेळी उघडकीस आणली पाहिजे.जे देश अजूनही पाकिस्तानला दहशतवादविरोधी सहयोगी मानतात, त्यांना त्याच्या खऱ्या रेकॉर्डची आठवण करून दिली पाहिजे. भारताने युएन ,जी -२० आणि एफएटीएफ सारख्या जागतिक मंचांचा वापर करून दहशतवादाला आश्रय देणाऱ्या किंवा वित्तपुरवठा करणाऱ्या देशांविरुद्ध कठोर आंतरराष्ट्रीय कारवाईसाठी दबाव आणला पाहिजे. भारताने पुढील पावले आखताना तात्काळ लष्करी किंवा प्रत्युत्तराच्या कारवाईच्या पलीकडे जावे. दहशतवादविरोधी आज एक बहुआयामी रणनीती आवश्यक आहे, ज्यामध्ये मजबूत मुत्सद्देगिरी, प्रगत संरक्षण आणि गुप्तचर यंत्रणा, अंतर्गत सामाजिक सामंजस्य आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अटल राजकीय इच्छाशक्ती यांचा समावेश आहे.लाल किल्ल्याची घटना ही आठवण करून देणारी आहे की दुर्बलता आणि विभाजनाच्या क्षणांची वाट पाहत धोका अजूनही आपल्यामध्ये लपून आहे. हा लढा केवळ पोलीस, सशस्त्र दल किंवा गुप्तचर यंत्रणांचा नसून प्रत्येक भारतीयाचा आहे. सरकार आणि विरोधकांनी राष्ट्रीय सुरक्षेला राजकारणाच्या वर ठेवून समान उद्दिष्ट ठेवून काम केले पाहिजे. देशाला आतून कमकुवत करणाऱ्या द्वेष आणि चुकीच्या माहितीच्या विरोधात नागरिकांनीही सतर्क, जबाबदार आणि एकजूट राहिले पाहिजे.

---

**लोकसंसद**

## धर्मांध शिकले तरी आतंकवादीच होणार



१० नोव्हेंबर २०२५ ला राजधानी दिल्ली येथील लाल किल्ला समोर झालेल्या रासायनिक बॉम्बस्फोटानंतर पकडण्यात आलेले डॉक्टर अहमद राठर, डॉक्टर आदिल, डॉक्टर अहमद सय्यद, डॉक्टर शाहिन शाहिद, डॉक्टर मुजाम्मिक शकील हे जैश ए महंमद या आतंकवादी संघटनेची संबंधित होते. या सर्वांकडून अमोनियम नायट्रेट, मोठ्या प्रमाणात शस्त्रात आणि स्फोटके देखील जप्त करण्यात आले आहे. डॉक्टर मुजाम्मिक याच्या घरातील शस्त्रसाठ्यात चीनी पिस्तुले मिळाली आहे. आतंकवाद्यांना चीनसह अन्या देशांचे सहाय्य मिळत असल्याचा हा एक पुरावा आहे. ऑपरेशन सिंदूरने जैश एमहंमद ला लक्ष दिले होते त्याचा हाच सूड होता. खरे तर दिवाळी व २६ जानेवारीला संपूर्ण देशात बॉम्बस्फोट घडवण्याचा त्यांचा मानस होता पण नियतीच्या मनात वेगळेच होते. हे सर्व डॉक्टर समाजसेवेच्या नावाखाली शस्त्र पुरवठा, निधी पुरवठा आणि जिहादी विचारसरणी पसरविणे हे काम करत होते. हे आतंकवादी संघटनेच्या स्लीपर सेलचे काम करत होते हे जाळे एवढे प्रचंड प्रमाणात पसरले आहे त्यामुळे आपल्या आजूबाजूला असणारी धर्मांध व्यक्ती घुसखोर आहे का, तिचे वागणे संशयास्पद आहेत का हे जागृत राहून पाहणे तसेच सतर्क राहून सुरक्षा यंत्रणांना सहाय्य करणे आवश्यक आहे. यावेळी एक महिला या गटात सामील झाली आहे हे लक्षात घेतले पाहिजे. तज्ञ पोलीस आणि लष्करी अधिकारी यांच्या मते शासकीय यंत्रणा ९०% घटनांमध्ये घटना होण्यापूर्वी त्यांचे डाव उध्वस्त करत आहे. हे आपल्या गुप्तचर यंत्रणेसह विविध यंत्रणांचे यश आहे परंतु आक्रमणांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसल्याने परत त्रुटी आणि आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. या घटनेत ज्या गतीने चक्र फिरली आणि सर्व यंत्रणांच्या समन्वयातून जलद गतीने मुळाकडे जाण्याचा प्रयत्न झाला तो चांगला आहे. तंत्रज्ञानही पुढे गेले असल्याने त्याची साथ मिळाली आहे. सर्व माध्यमांनी त्यांचे दायित्वही लक्षात घेऊन शासनाला मदत करणे गरजेचे आहे. वारंवार आक्रमणे करणाऱ्या आतंकवाद्यांचा प्राण असलेल्या पाकिस्तानला नष्ट करण्याचे ध्येय आता सरकारने ठरवले पाहिजे. कायमस्वरूपी पर्यायांचा वापर करण्याकडे भारताने पाऊले उचलली पाहिजे.

**लीना मकरंद गाडगीळ पनवेल**

---

**दिनविशेष**

# जागतिक बाल दिन

दरवर्षी १४ नोव्हेंबर रोजी देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचा जयंती दिन 'बालदिन' म्हणून साजरा केला जातो. चाचा नेहरूंच्या कार्यासाठी, त्यांच्या शिक्षणातील योगदानासाठी आणि लहान मुलांवरील प्रेमाचे प्रतीक म्हणून हा दिवस साजरा केला जातो. पंडित नेहरू यांचा जन्म १८८९ साली अलाहाबादमध्ये झाला. मुले ही कोणत्याही समाजाचा पाया आणि राष्ट्राची खरी ताकद असतात असा, त्यांचा ठाम विश्वास होता. ''आजची मुले उद्याचा भारत घडवतील आणि आपण त्यांचा ज्या पद्धतीने विकास करू, त्याच स्तरावर देशाचाही विकास होईलङ्घङ्घ, असे ते नेहमी म्हणायचे. पंडित जवाहरलाल मोतीलाल नेहरू हे भारताचे पहिले पंतप्रधान व भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी लोकप्रिय नेते होते. त्यांचा जन्मदिन हा बाल दिन म्हणूनही देशभर साजरा केला जातो. त्यांचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे झाला. त्यांचे सुरुवातीचे शिक्षण घरीच खासगी शिकवण्यांद्वारे झाले. नंतर ते इंग्लंडला आणि त्यानंतर हॅरो येथे शिक्षणाकरिता गेले. केंब्रिज विद्यापीठातून त्यांनी सामान्य विज्ञान या विषयात पदवी घेतली.



ते १९१२ मध्ये भारतात परतले आणि सरळ राजकारणात उतरले. १९१२ मध्ये झालेल्या बंकीपूर काँग्रेस अधिवेशनाला ते उपस्थित होते. १९१९ मध्ये ते होमरुल चळवळीचे अलाहाबादचे अध्यक्ष बनले. १९१६ मध्ये ते प्रथमच महात्मा गांधींना भेटले आणि त्यांच्यापासून विलक्षण प्रेरित झाले. १९२० मध्ये त्यांनी उत्तर प्रदेशच्या प्रतापगढ जिल्ह्यात पहिला किसान मोर्चा काढला. १९२०-२२ दरम्यान असहकार आंदोलनामुळे त्यांना दोनदा कारावास भोगावा लागला.१९२८ मध्ये सायमन कमिशन विरोधात निदर्शने करताना त्यांना लाठी हल्ल्याला सामोरे जावे लागले. १९२८ मध्येच त्यांनी स्वतंत्र भारत चळवळ सुरू केली. १९२९ मध्ये ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या लाहोर अधिवेशनाचे अध्यक्ष झाले. तेथे संपूर्ण स्वातंत्र्य हेच ध्येय निश्चित केले गेले. १९३० ते १९३५ दरम्यान मिठाचा सत्याग्रह आणि अशाच अन्य सत्याग्रहांमुळे त्यांना अनेकदा कारावास भोगावा लागला. ७ ऑगस्ट १९४२ रोजी त्यांनी भारत छोडो ही क्रांतीकारी घोषणा केली. १९४६ रोजी त्यांना काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले. १९५४ पर्यंत त्यांनी पदभार सांभाळला. अशा या थोर नेत्याचे २७ मे १९६४ रोजी निधन झाले.

बालदिनाचा मुख्य उद्देश म्हणजे मुलांच्या अधिकारांचे रक्षण करणे, त्यांना सुरक्षित वातावरण देणे आणि त्यांच्या शिक्षणाकडे व आरोग्याकडे लक्ष देणे हे आहे. बालदिनाला बालकांवरील वाढते अत्याचार, बालमजुरी आणि शिक्षणातील संधी याविषयी जनजागृती केली जाते. हा दिवस मुलांच्या आनंदासोबतच त्यांच्या अधिकारांबद्दल समाजाच्या असणाऱ्या जबाबदारीची जाणीव करुन देतो.

पं. नेहरुंचं असं म्हणणं होतं की मुलांना त्यांच्या बालवयातच योग्य मार्गदर्शन आणि प्रेम दिलं पाहिजे. त्यांच्या अनुसार, मुलांमध्ये कोणताही भेदभाव करू नये. मुलं स्वतंत्र विचारांची आणि इतर प्रत्येक मुलांपेक्षा वेगळी असतात त्यामुळे त्यांना स्वतंत्र पद्धतीने शिकण्याची आणि वाढण्याची मोकळीक द्यायला हवी. पं. नेहरु नेहमीच लहान मुलांमध्ये जाऊन त्यांच्यासोबत वेळ घालवायचे. त्यांचा असा विश्वास होता की मुलांमध्ये निरागसता, प्रामाणिकपणा आणि निष्ठा असते जी मोठ्यांनाही कधीकधी प्रेरणा देते. बालदिनाच्या माध्यमातून मुलांच्या अधिकारावर लक्ष केंद्रित केले जाते. जसे की मुलांना शिक्षणाचा अधिकार, बालमजुरीपासून सुटका आणि एक सुरक्षित व प्रेममय वातावरणात वाढण्याचा अधिकार इत्यादी. भारतात बाल अधिकारांच्या सुरक्षेसाठी संरक्षण कायदे आणि संस्था कार्यरत आहेत ज्यांचा उद्देश लहान मुलांचे भविष्य सुरक्षित बनवणे हा आहे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे
१४ नोव्हेंबर
१)श्रीम.कांती कृष्णानंद नायक
१४-११-१९५१

# रस्ता रुंदीकरणासाठी वृक्षतोड

## ● बेसुमार झाडांच्या कत्तलीमुळे शहरातील हिरवळ नष्ट; पर्यावरणप्रेमींमध्ये संताप

। ठाणे । प्रतिनिधी ।

स्वच्छ ठाणे.. हरित ठाणे ही घोषणा ठाणे महानगरपालिकेने काही वर्षांपूर्वी केली; परंतु आता हेच ठाणे कोमेजत चालले आहे. घोडबंदर रस्त्याच्या रुंदीकरणासाठी दीड हजार झाडांची आतापर्यंत कत्तल करण्यात आली असून फक्त ४१५ वृक्षांचे पुनर्रोपण झाले आहे. बेसुमार वृक्षतोडीमुळे शहरातील हिरवाई नष्ट होत असल्याने पर्यावरणप्रेमींमध्ये संताप व्यक्त होत आहे.



कुणीही मागणी केली नसताना महापालिकेने कापूरबावडी ते गायमुख या घोडबंदर मार्गाच्या रुंदीकरणाचा घाट घातला. १०.१५ किलोमीटरचा हा रस्ता पूर्णपणे काँक्रीटचा केला जात आहे. एमएमआरडीएमार्फत हे काम सुरू असून त्यासाठी अंदाजे ५६० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या मार्गाच्या दोन्ही बाजूला असलेल्या सर्व्हिस रोडचे विलीनीकरण करण्यात येत आहे. या सर्व्हिस रोडवर पूर्वी महापालिकेने २ हजार १९६ झाडे लावली. त्यामुळे हवेची गुणवत्ताही राखण्यास मदत झाली.

घोडबंदर रोडच्या रुंदीकरणाचे काम एमएमआरडीएमार्फत सुरू असून त्यासाठी १ हजार ६४६ झाडे तोडण्याची परवानगी महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाने दिली आहे.

सप्टेंबरपर्यंत १ हजार ३१० झाडे तोडली असून ही संख्या आणखी मोठी असण्याची शक्यता आहे. सध्या जेसीबी व अन्य साधनांच्या मदतीने मोठमोठ्या झाडांची बेसुमार कत्तल केली जात आहे.

ही झाडे तोडताना एमएमआरडीएच्या ठेकेदार व उपठेकेदाराने सर्व नियम पायदळी तुडवले आहेत. रात्रीच्या अंधारात गुपचूप ही झाडे तोडून ती परस्पर नेण्यात येतात.

### झाडांचे पुनर्रोपण केले तरी कुठे?

ठाणे महापालिकेने एमएमआरडीएच्या ठेकेदाराला झाडे तोडण्याची फक्त परवानगी दिली आहे. त्याशिवाय ५४९ वृक्षांचे पुनर्रोपण करण्याची अटही घातली, पण हे पुनर्रोपण नेमके कुठे केले? कोणी केले? झाडे कोणती तोडली? याची कोणतीही माहिती महापालिकेकडे नाही. तसेच या वृक्षतोडीवर देखरेख ठेवण्यासाठी पालिकेचा एकही अधिकारी उपस्थित नसतो. ही आमची नव्हे तर एमएमआरडीएची जबाबदारी आहे असे सांगून पालिकेच्या अधिकाऱ्यांनी हात झटकले आहेत.

### शिवसैनिकांचा आंदोलनाचा इशारा

घोडबंदर रोडच्या रुंदीकरणात मनमानीपणे वृक्षतोड सुरू असल्याचे समजताच शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे मानपाडा विभागप्रमुख प्रदीप पुर्णेकर, अंगद मोरे, आयुष घोडेकर, दया वर्मा, नितीन गवारी आदींनी कासारवडवली येथील बसस्टॉपजवळ धाव घेतली. शिवसैनिकांना बघताच ठेकेदाराचे कामगार पळून गेले. रात्रीच्या वेळी झाडे तोडू नयेत म्हणून उशिरापर्यंत शिवसैनिकांनी तिथे ठिय्या मांडला. एक झाड दहा कुटुंबांना ऑक्सिजन पुरवते. त्यामुळे ही वृक्षतोड त्वरित थांबवा, अन्यथा मोठे आंदोलन उभारू, असा इशारा शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांनी दिला.

## ठाण्यात भटक्या कुत्र्यांची दहशत

। ठाणे । प्रतिनिधी ।

ठाणे शहरात भटक्या कुत्र्यांची चांगलीच दहशत वाढली असून जानेवारी ते ऑक्टोबर या दहा महिन्यात तब्बल १२ हजार ४६५ नागरिकांचे लचके तोडले आहेत. पालिकेच्या आरोग्य विभागाने दिलेल्या आकडेवारीतून ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. याशिवाय खासगी दवाखान्यात उपचार घेतलेल्या रुग्णांची संख्यादेखील बहुतांश आहे. सुदैवाने यात कोणाचाही मृत्यू झालेला नाही. त्यामुळे पालिकेच्या निर्बिजीकरण मोहिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ठाणे पालिका हद्दीतील भटक्या श्वानांना पकडून त्यांची नसबंदी आणि ॲण्टी रेबीज लसीकरण करण्यात अक्षम्य हेळसांड सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. वास्तविक भटक्या श्वानांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी नसबंदी आणि रेबीज मोहीम सातत्याने राबविणे गरजेचे असते, परंतु पालिका प्रशासनाने या संदर्भातील काढलेल्या निविदा प्रक्रियेला दोन वेळा मुदतवाढ देऊनही शून्य प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. दरम्यान, भटक्या श्वानांचा उपद्रव आणि चावे घेतल्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत असून एखाद्याच्या जीवावर बेतल्यावर पालिकेला जाग येणार आहे का? असा सवाल ठाणेकर नागरिक करीत आहेत.

## निवृत्त बँक अधिकाऱ्याची फसवणूक

। मुंबई । प्रतिनिधी ।

शेअर ट्रेडिंगच्या नावाखाली निवृत्त बँक अधिकाऱ्याची ५१ लाख रुपयांची फसवणूक प्रकरणी एकाला उत्तर प्रादेशिक सायबर पोलिसांनी अटक केली. वसीम शेख असे त्याचे नाव आहे.

गोरेगाव येथील ज्येष्ठ नागरिक एका व्हॉट्सअप ग्रुपमध्ये जोडले गेले. त्या ग्रुपवर शेअर ट्रेडिंगची माहिती दिली जात होती. ग्रुप अडमिनने त्यांना शेअरमध्ये गुंतवणूक करण्याचा सल्ला दिला. त्यानंतर त्यांना एक अप्स डाऊनलोड करून वैयक्तिक आणि बँक खात्याची माहिती अपलोड करण्यात सांगितली. त्यानंतर त्यांनी शेअरमध्ये ३० लाख ६५ हजार ४५० रुपयांची गुंतवणूक केली. याच दरम्यान त्यांना अन्य एका साईटवर शेअर ट्रेडिंगची जाहिरात दिसली. त्यावर क्लिक केल्यावर ते दुसऱ्या एका व्हॉट्सअप ग्रुपवर जोडले गेले. जास्त नफा मिळेल या हेतूने त्यांनी २१ लाख २५ हजार रुपयांची गुंतवणूक केली. यात नफा दिसून आला. ही रक्कम बँक खात्यात ट्रान्सफर करण्यासाठी ग्रुप अडमिनला संपर्क केला. तेव्हा त्याने टॅक्स म्हणून आणखी काही रक्कम जमा केल्याशिवाय ती रक्कम बँक खात्यात जमा करता येणार नाही असे त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर त्याने त्यांचे फोन घेणे बंद केले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्याने उत्तर प्रादेशिक सायबर पोलीस ठाण्यात तक्रार केली.

## ई-सिगारेटचा अड्डा उद्ध्वस्त

**मुंबई :** शासनाने बंदी घातलेली असतानाही ई-सिगारेटचा मोठ्या प्रमाणात साठा करणाऱ्यांना शिवडी पोलिसांनी दणका दिला आहे. फॉसबेरी मार्गावरील महेंद्र पानवाल्याजवळ एक्सेल ट्रेडिंग कंपनी येथे ई-सिगारेटचा साठा करून ठेवला असल्याची खबर शिवडी पोलिसांना मिळाली. त्यानुसार शिवडी पोलिसांच्या पथकाने त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी एक्सेल ट्रेडिंग कंपनी येथे साठा केलेले ३० लाख ५० हजार किंमतीचे ई-सिगारेटचे ३०५ बॉक्स पोलिसांनी जप्त करत पैजल जवेरी याला अटक केली.

## अमली पदार्थ तस्करांना अटक

। ठाणे । प्रतिनिधी ।

मध्यप्रदेशातून मेफेड्रॉन या अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या चौघांना ठाणे पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली. या अमली पदार्थांचे उत्पादन, विक्री, साठवणूकीमध्ये आणखी कोण सहभागी होते का, याचा तपास पोलिसांकडून सुरु आहे. बब्बु खिजहार खान उर्फ इम्रान (३७), वकास अब्दुलरब खान (३०), ताकुद्दीन रफीक खान (३०) आणि कमलेश चौहान (२३) अशी अटकेत असलेल्या आरोपींची नावे आहेत. हे सर्व आरोपी मध्यप्रदेशातील रहिवासी आहेत.

ठाणे पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाकडून शोध मोहीम सुरु होती. अमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस हवालदार अमित सपकाळ यांना मिळालेल्या माहितीनुसार ३ नोव्हेंबरला पथकाने ठाण्यातील चरई भागात सापळा रचून इम्रान, वकास, ताकुद्दीन आणि कमलेश या चौघांना ताब्यात घेतले. पोलीस पथकाला त्यांच्याकडे १ किलो ७१ ग्रॅम ६ मिलीग्रॅम वजनाचा एमडी हा अमली पदार्थांचा साठा आढळून आला. त्यांच्याविरोधात नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी वाहनासह २ कोटी २४ लाख ७५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



## लाडघर किनाऱ्याची ब्लू फ्लॅगसाठी निवड

। दापोली । प्रतिनिधी ।

दापोली तालुक्यातील लाडघर समुद्रकिनारा आता आंतरराष्ट्रीय दर्जाच्या दिशेने वाटचाल करत आहे. पर्यावरणीय गुणवत्ता, स्वच्छता, सुरक्षितता आणि नैसर्गिक सौंदर्य यासाठी प्रसिद्ध असलेल्या या किनाऱ्याची ब्लू फ्लॅग मानांकनासाठी निवड झाली असून प्राथमिक सुरक्षा आणि पर्यावरणीय ऑडीट प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

ब्लू फ्लॅग हे आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र जगातील निवडक, पर्यावरणपूरक व सुरक्षित समुद्रकिनाऱ्यांना दिले जाते. या मानांकनासाठी लाडघर किनाऱ्यावर पाण्याची गुणवत्ता, कचरा व्यवस्थापन, बचाव व्यवस्था, पर्यटकांसाठी स्वच्छ शौचालये व प्राथमिक उपचार सुविधा, तसेच किनाऱ्याचे सौंदर्य राखण्यासाठी केलेले प्रयत्न यांची बारकाईने तपासणी करण्यात आली आहे.

### पर्यटनाला मिळणार चालना

या तपासणीत लाडघर किनाऱ्याने उत्कृष्ट कामगिरी बजावल्याची माहिती मिळाली आहे. ब्लू फ्लॅग मानांकन मिळाल्यास लाडघर किनाऱ्याचे नाव जागतिक दर्जाच्या समुद्रकिनाऱ्यांच्या यादीत झळकणार आहे, ज्यामुळे दापोली पर्यटन क्षेत्राला नवसंजीवनी मिळेल. विविध सामाजिक संस्था आणि स्थानिक व्यवस्थापन यांच्या संयुक्त प्रयत्नातून लाडघर किनाऱ्याचे सर्वांगीण सुशोभिकरण आणि पर्यावरणीय संवर्धन सुरू आहे.

यामुळे केवळ पर्यटनाला चालना मिळणार नाही, तर स्थानिकांना रोजगाराच्या नव्या संधीही उपलब्ध होणार आहेत.

## कामथे घाटात धुक्याची चादर; वातावरणात वाढला गारवा

। चिपळूण । प्रतिनिधी ।



नोव्हेंबर महिन्यामध्ये अखेर कोकणामध्ये धुके पडायला सुरुवात झाली आहे. धुक्यांनी सजली सकाळी असे दृश्य आता नदीलगत आणि डोंगर रांगांवरती सगळीकडे पहावयास मिळत आहे. थंडीची चाहूल लागली असून कामथे घाटात धुक्याचे दृश्य पाहताना मन मोहून जाते. वातावरणातील गारवा सुद्धा वाढायला सुरुवात झालेली आहे. आता गावागावात शिकोट्या पेटवण्यास सुरूवात झाली आहे. थंडीचे दिवस सुरू झाले की निश्चित सारी सृष्टी दवबिंदूनी भिजली जाते आणि धुक्याची चादर सर्वत्र पांगरली जाते. असेच दृश्य आता पहावयास मिळत आहे. धुक्यात हरवलेली सृष्टी आणि निसर्ग सौंदर्य पाहताना निश्चित या थंडीच्या दिवसांमध्ये मनाला वेगळाच आनंद प्राप्त होतो.

चिपळूण येथील कामथे घाटात गेल्या आठ दिवसांपासून सकाळी दाट धुके पसरलेले असते. हे धुक्याचे दृश्य किमान सकाळी नऊ वाजेपर्यंत तरी दिसून येते. धुक्यातून वाट काढताना एक वेगळाच निसर्ग सौंदर्याचा नजारा बघायला मिळतो. धुके दाट पडत असल्याने त्यातून वाहन चालक यांना गाडीचे लाईट लावण्याशिवाय पर्याय उरत नाही. समोरून येणारी वाहन सुद्धा या धुक्यातून दिसत नाहीत. कदाचित अशावेळी अपघात होण्याच्या घटनाही घडू शकतात. दाट धुक्याने कोकणातील घाट रस्ते एक वेगळ्या सौंदर्याने खुलून दिसत आहेत. वळणावळनात धुक्यात हरवलेले रस्ते हे दृश्य जणू डोळ्यात साठवून ठेवावे असेच आहे. आता गुलाबी थंडीच चाहूल सर्वत्र लागली आहे. त्यामुळे प्रत्येक जण उबदार स्वेटर खरेदीसाठी सुद्धा बाजारामध्ये गर्दी करत आहे.

कोकणात ज्या ज्या ठिकाणी घाट रस्ते आहेत. अशा सुंदर ठिकाणी धुके पडल्यानंतर एक वेगळा नजराणा बघायला मिळतो.

## जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

**चिपळूण :** चिपळूण तालुक्यातील चिंचघरी-खोतवाडी येथे सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकल्याची घटना सोमवारी (दि.१०) सायंकाळी साडेचारच्या सुमारास घडली. या कारवाईत आठ जणांना जुगार खेळताना रंगेहात पकडण्यात आले. याप्रकरणी चिपळूण पोलीस स्थानकात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. याबाबतची फिर्याद पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रवीण जाधव यांनी पोलिसात दाखल केली आहे.

## पामबीच मार्गालगतचे पथदिवे बंद

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

नवी मुंबई शहरातील पामबीच मार्गालगतच्या ज्वेल ऑफ नवी मुंबई परिसर नागरिकांच्या पसंतीचे केंद्र आहे. या ठिकाणी सकाळी आणि सायंकाळी मोठ्या प्रमाणात आबालवृद्धांची गर्दी पाहायला मिळते. विस्तीर्ण परिसराच्या नेरुळकडील मुख्य प्रवेशद्वार परिसरातील पथदिवे मात्र बंद असल्याने नागरिकांना येथे येण्यात अंधारामुळे अडचणी येत आहेत.

पालिकेने याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी होत आहे. नवी मुंबई महापालिकेने स्वच्छ भारत तसेच माझी वसुंधरा अभियानाच्या माध्यमातून नेरुळ पामबीच मार्गाला लागून असलेल्या १३७ एकरच्या भूखंडावर ज्वेल ऑफ नवी मुंबई विकसित केले आहे.

### नागरिकांमध्ये नाराजी

या ज्वेल ऑफ नवी मुंबई परिसराची नागरिकांना भुरळ असून सकाळी व संध्याकाळी या परिसरात नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. परंतु मागील काही दिवसांपासून ज्वेल ऑफ नवी मुंबईकडे जाणाऱ्या मुख्य प्रवेशद्वाराजवळील व परिसरातील पथदिवे बंद असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.


> **नवी मुंबईतील ज्वेल ऑफ नवी मुंबई परिसराबरोबरच मुख्य प्रवेशद्वाराबाहेरील मुख्य रस्त्यावर पथदिवे बंद असतील तर तात्काळ त्याची पाहणी करून दुरुस्ती करण्यात येईल.**
> **– मिलिंद पवार, अभियंता विद्युत विभाग, नवी मुंबई महापालिका**

पुरातत्त्व विभागाकडून उत्खननाला सुरुवात | इतिहासावर आणखी प्रकाश पडणार

# घारापुरी बेटावरील रहस्य उलगडणार

। उरण । प्रतिनिधी ।

ऐतिहासिक घारापुरी बेटावरील शेतबंदर आणि मोरा बंदर परिसरात संशोधनादरम्यान काही पुरातन वस्तू आढळल्या आहेत. त्यामुळे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाकडून अधिक सर्वेक्षणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. या सर्वेक्षणातून आणि खोदकामातून ऐतिहासिक घारापुरी बेटावरील इतिहासावर आणखी प्रकाश पडण्यास मदत होईल, असा विश्वास भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.



या पुरातन बेटावर विविध ठिकाणी करण्यात आलेल्या खोदकामात दळणकांड करण्यासाठी वापरात येणारी पुरातन काळातील जाते, मडकी, भव्य शिवलिंग, विविध पुरातन वस्तूंचे भग्न अवशेष अनेकदा सापडले आहेत. काही दिवसांपूर्वी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतबंदर गावातील स्मशानभूमी ते सीता गुंफा या एक हजार मीटर लांबीच्या परिसरात केलेल्या सर्वेक्षणात विविध पुरातन वस्तू आढळून आल्या.

तसेच मोरा बंदर येथील डोंगराच्या पायथ्याशी व समुद्राला मिळणाऱ्या ओढे, नाले यांच्यामध्ये सोने, चांदी व इतर धातूंच्या मुद्रा, नाणीही आढळून येतात. त्यामुळे या दोन्ही ठिकाणी आणखी उत्खनन करण्याचा निर्णय भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी घेतला आहे. यासाठी या ठिकाणी खोदकाम करून शोध घेतला जाणार आहे. यासाठी ४ ते ६ महिने सुमारे ७० मजूर खोदकाम करणार आहेत. काळ्या पाषाणात कोरलेल्या या लेण्या जगप्रसिद्ध आहेत.

त्या पाहण्यासाठी जगभरातील पर्यटक घारापुरी येथे येतात. या निसर्गरम्य ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना या उत्खननामुळे लाभ होणार आहे. शेतबंदर गाव, मोरा बंदर या दोन्ही ठिकाणी आणखी उत्खनन करण्याचा निर्णय भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी घेतला आहे. यासाठी या ठिकाणी खोदकाम करून शोध घेतला जाणार आहे. यासाठी ४ ते ६ महिने सुमारे ७० मजूर खोदकाम करणार आहेत.

### सल्लागार सेवा नियुक्ती करण्यात येणार

लिफंटा बेट चार किमी चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरलेले आहे. यामध्ये सर्वाधिक क्षेत्र वन विभागाच्या अखत्यारित येतो. पुरातत्त्व, नौदल, बंदर विभाग आणि स्थानिक शेतकऱ्यांच्या मालकीचेही क्षेत्र आहे. सिडकोकडून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर काम होणार आहे. त्यानंतर पर्यटन, पर्यटकांसाठी विकास मॉडेल व आर्थिक मॉडेलिंगसाठी सल्लागार सेवा नियुक्ती करण्यात येणार आहे.

# निवडक

## संगमेश्वरमध्ये उभारणार छ. संभाजी महाराजांचे स्मारक



**मुंबई :** स्टॅच्यू ऑफ युनिटीच्या धर्तीवर राज्य सरकारच्यावतीने रत्नागिरीतील संगमेश्वरमध्ये छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक उभारण्यात येणार आहे. संगमेश्वर येथे छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक उभारण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. त्या अनुषंगाने या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील संकल्पचित्राचे सादरीकरण मंत्री शेलार यांच्यासमोर करण्यात आले. प्रस्तावित स्मारक ५ एकर क्षेत्रात उभारले जाणार असून, पार्किंग आणि अन्य सुविधांसाठी अतिरिक्त २ एकर जागा शासनाने घेतली आहे. माजी आमदार प्रमोद जठार यांनी हे स्मारक वेगवेगळ्या टप्प्यात करून ते अधिक भव्यदिव्य व्हावे, अशी मागणी केली होती. याबाबत त्यांची संकल्पना समजून घेण्यासाठी मंत्री शेलार यांच्या दालनात बैठक पार पडली. या बैठकीत मंत्री शेलार यांनी पहिल्या टप्प्यात संकल्पचित्रानुसार मुख्य स्मारकाचे काम करण्याचे निर्देश दिले. तसेच, आजूबाजूच्या परिसरात पर्यटकांसाठी सेवा, सुविधा व विकासाच्या कल्पनांचा अभ्यास करून सविस्तर अहवाल सादर करावा, अशा सूचनाही दिल्या. या बैठकीला सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्व विभाग, रत्नागिरी जिल्हाधिकारी, तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित अधिकारी उपस्थित होते.



## रेल्वेस्थानकांवर डीजी लॉकर सुविधा

**रत्नागिरी :** प्रवासाला जाताना अनेकवेळा रेल्वे स्थानकावर सोबत आणलेले सामान कोठे ठेवायचे, असा प्रश्न प्रवाशांना असतो. त्यांच्यासाठी कोकण रेल्वेने रत्नागिरी, थिविम आणि उडुपी स्थानकांवर डीजी लॉकर सुविधा सुरू केली आहे. सुरक्षित आणि स्वतः ऑपरेट करता येईल, अशी सोय प्रशासनाने करून दिली आहे. त्यामुळे प्रवासी आता युपीआय, क्रेडिट किंवा डेबिट कार्डस् आणि इतर डिजिटल माध्यमांचा वापर करून आधुनिक क्युआर आधारित डिजिटल पेमेंट प्रणालीद्वारे त्यांचे सामान सोयीस्करपणे आणि सुरक्षितपणे ठेवू शकतात. ही सुविधा चोवीस तास कार्यरत आहे, ज्यामुळे सहज उपलब्धता सुनिश्चित होते आणि भारत सरकारच्या डिजिटल इंडिया चळवळीअंतर्गत डिजिटलदृष्ट्या सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला हातभार लागतो. या सुविधेमुळे प्रवाशांना त्यांचे सामान ठेवण्यासाठी एक सुरक्षित पर्याय निर्माण झाला आहे.

## चोरट्याच्या हल्ल्यात वृद्धेचा मृत्यू

**सिंधुदुर्ग :** सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेल्या काही दिवसात गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. एका वृद्ध महिलेच्या घरात घुसून चोरीच्या उद्देशाने करण्यात आलेल्या हल्ल्यात त्या महिलेचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मालवणजवळ कट्टा परिसरात हा धक्कादायक प्रकार घडला आहे. रोहिणी गुराम असे हत्या करण्यात आलेला वृद्ध महिलेचे नाव आहे. दोन दिवसांपूर्वी कट्टा खालची गुरामवाडी येथे चोरीच्या उद्देशाने घरात घुसले. यावेळी त्यांनी अज्ञात चोरट्यांनी वृद्ध महिलेवर हल्ला केला व यातच त्या महिलेचा मृत्यू झाला. हा हल्ला केल्यावर ते तिथून पळून गेले होते. हा सगळा गंभीर प्रकार आजूबाजूच्या लोकांच्या लक्षात येताच त्यांनी पोलिसांना या सगळ्याची माहिती देत तात्काळ या महिलेला रुग्णालयात दाखल केले होते. मात्र दोन दिवसापूर्वी उपचारादरम्यान या वृद्ध महिलेचा मृत्यू झाला आहे. मालवण पोलिसांनी संशयित चोरट्याविरोधात खून आणि घरफोडी करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांचा तपास सुरू असताना बुधवारी सकाळी कुणकवळे कुपेरीची घाटी परिसरात जळालेले कपडे व अन्य साहित्य पोलिसांना आढळून आल्याची माहिती मिळाली आहे. मात्र हे साहित्य या खून प्रकरणातील आहे की कसे, याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे.



## बांबू महोत्सवातून अर्थव्यवस्थेला बळ

**पालघर :** पालघर जिल्ह्यातील आदिवासी आणि ग्रामीण समुदायाच्या अर्थव्यवस्थेला बांबू या नैसर्गिक संसाधनाच्या माध्यमातून बळकटी देण्यासाठी केशवसृष्टी संस्थेच्या वतीने जव्हार येथील केशवसृष्टी ऑक्सिजन पार्क येथे ८, ९ व १० नोव्हेंबर तीन दिवसीय बांबू महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. जलद वाढणारे, पर्यावरणपूरक आणि दीर्घकाळ टिकणारे बांबू हे ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी कसे वरदान ठरू शकते, हा संदेश या उत्सवाद्वारे यशस्वीरित्या पोहोचवण्यात आला. या तीन दिवसीय बांबू महोत्सवात ग्रामीण व शहरी भागातून २००० हून अधिक नागरिक, शेतकरी, उद्योजक, विद्यार्थी आणि स्थानिक कलाकारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या महोत्सवात आदिवासी कला प्रदर्शनच्या माध्यमातून तारपा, ढोल, टिपरी आणि तूर यांसारख्या लुप्त होत चाललेल्या पारंपरिक कला पंधरा गटांनी सादर केल्या. यासह वारली पेंटिंग, रांगोळी, रानभाज्यांच्या पाककला आणि भजन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. बांबू लागवडीतून उपलब्ध होणाऱ्या बांबूद्वारे ग्रामीण भागातील नागरिक रोजगारासाठी बांबूच्या विविध हस्तकला, आधुनिक बांबू वस्तू, घरगुती आणि सजावटीच्या वस्तू बनवू शकतात याकरिता प्रदर्शन व प्रात्यक्षिक भरवण्यात आले होते. या महोत्सवाच्या माध्यमातून सहभागी आदिवासी महिलांना जवळपास ३०,००० चे उत्पन्न प्राप्त झाले.

## रिक्षात विसरलेले दागिने महिलेला परत

**ठाणे :** पोलिसांच्या तत्परतेमुळे एका महिलेचे १५ तोळ्यांचे सोन्याचे दागिने सुरक्षितपणे परत मिळाले आहेत. वसंत विहार ते नौपाडा, ठाणे या प्रवासादरम्यान महिलेची दागिन्यांची बॅग रिक्षात राहिली होती. घटनेची माहिती मिळताच नौपाडा पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने परिसरातील सीसी टिव्ही फूटेज तपासून रिक्षाचा शोध घेतला. शिताफीने केलेल्या तपासानंतर पोलिसांनी संबंधित रिक्षा शोधून काढली आणि त्यामधील १५ तोळ्यांचे सोन्याचे दागिने हस्तगत करून महिलेच्या सुपूर्द केले. नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास वृद्धिंगत करणारी ही नौपाडा पोलिसांची कामगिरी प्रशंसनीय असल्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे.

# ऐन थंडीत राजकीय वातावरण तापले

| उरण | प्रतिनिधी |

उरण नगरपरिषदेच्या निवडणुकीची घोषणा होताच ऐन थंडीच्या दिवसात राजकीय वातावरण आता तापले आहे. प्रत्येक पक्ष आता पूर्ण ताकदीनिशी मैदानात दंड थोपटून उभे राहिले आहेत. उरण नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी प्रत्येक राजकीय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते कामाला लागले आहेत. भावी नगरसेवकांनी गाठीभेटी घेण्यास सुरुवात केली आहे. तर अनेक इच्छुक उमेदवारांनी मतदारांना, ओळखीच्या मित्र परिवार, नातेवाईकांना फोनद्वारे संपर्क साधायला सुरुवात केली आहे. यातच सर्व राजकारण ढवळून निघत आहे.

उरण नगरपालिकेच्या सत्तेची रणधुमाळी सुरु झाली आहे. सोमवार दि. १० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. यानंतर उरणच्या गल्लीबोळात राजकीय तापमान



चांगलेच चढले असून, कोण बाजी मारणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

उरण नगरपालिकेतील एकूण १० प्रभागांतून २१ नगरसेवक आणि १ नगराध्यक्षा असे २२ जनप्रतिनिधी निवडून देण्यात येणार आहेत.

नगराध्यक्ष पद महिला राखीव असल्याने राजकीय पक्षांच्या गणितात उलथापालथ झाली असून, प्रत्येक पक्षाला योग्य महिला उमेदवार शोधण्यासाठी धडपड करावी लागत आहे. या निवडणुकीत एकूण १३,३११ पुरुष आणि १२,९०३ महिला असे मिळून २६,२१४ मतदारांचे भवितव्य ठरणार आहे. हे मतदारच आता उरण नगरपालिकेच्या गादीवर कोण बसवायचे हे ठरवतील. या मतदारांच्या हातात नगराध्यक्ष व नगरसेवकांचे भवितव्य अवलंबून आहे.प्रभागनिहाय मतदारसंख्या पाहिली असता प्रभाग क्रमांक १ मध्ये पुरुष १६०५, महिला १७०६, प्रभाग २ मध्ये पुरुष १५४९, महिला १६१३, प्रभाग ३ मध्ये पुरुष १२५२, महिला ११६८, प्रभाग ४ मध्ये पुरुष १४१६, महिला १३२१, प्रभाग ५ मध्ये पुरुष १२९८, महिला १२६८, प्रभाग ६ मध्ये पुरुष १०१०, महिला १०४९, प्रभाग ७ मध्ये पुरुष १५६६, महिला १३८८, प्रभाग ८ मध्ये पुरुष ९५५, महिला ८९३, प्रभाग ९ मध्ये पुरुष ११४८, महिला ११४५, आणि प्रभाग १० मध्ये पुरुष १५१२, महिला १३५२ अशी मतदारांची आकडेवारी आहे. प्रभाग १ ते ९ मधून प्रत्येकी २ नगरसेवक, तर प्रभाग १० मधून ३ नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. त्यासोबतच संपूर्ण उरण शहराच्या नेतृत्वासाठी एका नगराध्यक्षा पदासाठी निवडणूक होणार आहे. २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून, निकाल ३ डिसेंबर रोजी घोषित केला जाणार आहे. त्यामुळे केवळ काही आठवड्यांतच उरणच्या भवितव्याचा निर्णय होणार आहे.

नगराध्यक्षा पद महिला राखीव असल्याने भाजप, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट), काँग्रेस, मनसे, शेकाप, वंचित बहुजन आघाडी, भारिप आणि स्थानिक गटांमध्ये नगराध्यक्ष उमेदवार निवडीसाठी हालचालींना वेग आला आहे.

मागील निवडणुकीपेक्षा यंदाची निवडणूक चुरशीची होण्याची दाट शक्यता आहे. भावी इच्छुक नगरसेवक व नगराध्यक्ष यांनी निवडून येण्यासाठी कंबर कसली असून, मतदार नेमकी कोणाला निवडून देतो. मतदार कोणाला कौल देतो हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

### भाजपविरोधात सर्वपक्षीय आघाडी?

**नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी भाजपविरोधात अन्य पक्षविरहित आघाडी स्थापन करण्यात येणार आहे. या आघाडीच्या माध्यमातून भाजपला शह देण्याची योजना महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आखली असून, एकाच पक्षविरहित चिन्हावर निवडणूक लढविण्याची रणनीती आखण्यात येत आहे. चार वर्षांच्या प्रशासकीय राजवटीनंतर उरण नगरपरिषदेच्या निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. उनपच्या या निवडणुकीसाठी भाजपने मित्रपक्षांना डावलून स्वबळावर निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची जय्यत तयारी सुरू केली आहे. भाजप विरोधात महाविकास आघाडीच्या नेत्यांनीही ताकदीनिशी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी सुरू केली आहे. मात्र, २१ सदस्य आणि एक नगराध्यक्षपद अशा २२ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून आतापर्यंत तब्बल ३३ इच्छुकांनी निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केली आहे. या इच्छुक उमेदवारांच्या भाऊगर्दीमुळे आघाडीच्या नेत्यांची डोकेदुखी वाढली आहे.**

## श्रीवर्धन : अद्याप एकही उमेदवारी अर्ज नाही

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

नगरपरिषदांच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी दि.११ ते १७ नोव्हेंबर अशी कालमर्यादा आहे. मात्र, श्रीवर्धन नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी पहिल्या दोन दिवसांत एकही नामनिर्देशनपत्र दाखल झालेले नाही, अशी माहिती नगर परिषद सूत्रांकडून मिळाली. प्राप्त माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) ही निवडणूक निश्चितच लढविणार हे स्पष्टच आहे. भाजपा आणि शिवसेना (शिंदे गट) हे पक्ष युतीधर्म पाळून राष्ट्रवादीबरोबर खांद्याला खांदा लावून काम करतील किंवा कसे हे अजून स्पष्ट झालेले नाही. ते लवकरच स्पष्ट होईल.

## उरण ते शिर्डी मानाच्या पालखीचे यंदा रौप्य महोत्सवी वर्ष



| उरण | प्रतिनिधी |

साई सेवा मंडळ उरण विभागाच्या रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने शिर्डीनगरीचे साई संस्थानचे मुख्य अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांची भेट मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी नुकतीच घेतली. त्यांच्यात काही महत्वपूर्ण विषयावर चर्चा करण्यात झाली. यावेळी बोलताना मंडळाने पालखी संगे येणाऱ्या भाविकांना दर्शन सुरळीत मिळावं अशी मागणी पत्राद्वारे केली.

या मागणीवर बोलताना विश्वस्त म्हणाले की, आपल्या पालखीला लवकर दर्शन कसे होईल यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. आपल्याला हवं ते सहकार्य करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. या चर्चेत आळंदी या ठिकाणी प्रवास करणाऱ्या जासई वारीवर जे संकट आलं त्याबाबत साई संस्थानाने दुःख व्यक्त केल. साई संस्थानकडून उरण ते शिर्डी मानाच्या पालखीला विमा पॉलिसी व त्याचे पेपर त्वरित मंडळाला सुपूर्द केले.

साई संस्थांच्या विश्वस्तांची झालेली ही मंडळाची पहिली भेट होती आणि या भेटीत चर्चा अतिशय सकारात्मक झाली.

## बोर्लीत नरेंद्र महाराजांचा पादुका दर्शन सोहळा उत्साहात

| कोर्लई | प्रतिनिधी |

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी व पिठाचे उत्तराधिकारी परमपूज्य कानिफनाथ महाराज यांच्या कृपाशीर्वादाने रत्नागिरी-नाणिज दक्षिणपीठ नाणीजधामच्या वतीने मुरुड तालुक्यातील बोर्ली येथील पादुका दर्शन सोहळ्याने भक्तगण धन्य धन्य झाले.



यादिवशी सर्वप्रथम बोर्लीतील यजमान जितेंद्र पाटील यांच्या निवासस्थानापासून श्रींच्या पादुका वाजत गाजत कार्यक्रमस्थळी येताना मुख्य बॅनर, ढोलपथक, कलशधारी महिला, निशाणधारी पुरुष, रामपंचतन देखावा, विविध देखावे, कोळीनृत्य, भजनपथक, माऊलींचा रथ, छत्रपती शिवाजी महाराज, झाशीची राणी खालुबाजा, लेझीमपथक व शेवटी भक्तगण अशी पथके खास आकर्षण होती.

कार्यक्रमस्थळी सर्वप्रथम श्रींच्या पादुकांचे आगमन झाल्यानंतर गुरुपूजनासह सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये गरजू विद्यार्थ्यांना ६० सायकलींचे वाटप करण्यात आले.त्यानंतर गुरुपूजन व श्रींची आरती, तद्नंतर ज.न.म. प्रवचनकार शोभा बेलदार यांचे प्रवचन झाले. त्यानंतर उपासक दिक्षा,सिद्ध पादुका दर्शन व नंतर पुष्पवृष्टीने कार्यक्रमाची सांगता झाली. संपूर्ण रायगड जिल्ह्यातील हजारो भक्तगणांनी या सिध्द पादुका दर्शन सोहळ्याचा लाभ घेतला. पाच ते सहा हजार भक्तगण उपस्थित होते. यातील ३१५ जणांनी उपासक दीक्षा घेतली तर ७८० गुरुबंधूनी गुरु पूजन केले.

## यंदा फ्लेमिंगोंचे आगमन लांबणार



| उरण | प्रतिनिधी |


यावर्षी नोव्हेंबरपर्यंत लांबलेल्या पावसामुळे वातावरणात बदल झाला आहे. परिणामी, दरवर्षी ऑक्टोबरअखेर आणि नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात येणाऱ्या फ्लेमिंगो पक्ष्यांचे आगमन लांबणीवर पडणार असल्याची माहिती पर्यावरणवाद्यांनी दिली आहे. हा हवामान बदल आणि नष्ट होणाऱ्या पाणथळ जागांचा परिणाम असून, मान्सूननंतरच्या पावसामुळे हवामानातील बदल झाला आहे. त्यामुळे यावर्षी हे पक्षी उशिरा येणार असल्याची माहिती पर्यावरणतज्ज्ञांनी दिली आहे.

यात मुख्य कारण म्हणजे नवी मुंबईसह उरण व पनवेलमधील नष्ट होणाऱ्या पाणथळ जागा याचाही परिणाम आहे. फ्लेमिंगो हे निरोगी पर्यावरणाचे दूत आहेत. ते ज्यावेळी मोठ्या संख्येने येतात तेव्हा याचा अर्थ पाणथळ जागा जिवंत असतात. त्यामुळे त्यांचे उशिरा आगमन हा एक धोक्याचा इशारा आहे, अशी माहिती पर्यावरणवादी बी.एन. कुमार यांनी दिली आहे. तर, दुसरीकडे अतिवृष्टी, भरती-ओहोटीचे पूर आणि समुद्राच्या पातळीत वाढ होण्याचा सामना करणाऱ्या किनारी शहरामधील पाणथळी सुरक्षित राहिल्या पाहिजेत. पाणथळ जागा या हवामानाच्या दृष्टीने संरक्षणात्मक पायाभूत सुविधा आहेत. त्याचप्रमाणे फ्लेमिंगो पाणथळ जागा आरोग्य राखण्यासदेखील मदत करतात. फिल्टर-फीडर म्हणून, ते सूक्ष्म शैवाल आणि लहान अपृष्ठवंशी प्राणी खातात आणि आहार देताना, गाळ हलवतात -ही प्रक्रिया बायोटर्बेशन म्हणून ओळखली जाते-जी चिखलाला ऑक्सिजन देते आणि पोषक संतुलनासही मदत करते. पाणथळ जागा आणि ठाणे खाडीमध्ये फ्लेमिंगोची हजेरी केवळ दृश्य आकर्षणापेक्षा जास्त आहे - ती पर्यावरणीय आरोग्याचे एक प्रमुख घटक आहेत.

## रेल्वे स्थानकात पीरभॉय यांचा फोटो

| माथेरान | प्रतिनिधी |

माथेरान मिनी ट्रेनचे जनक स्वर्गीय आदमजी पीरभॉय व त्यांचे सुपुत्र हुसेन पूर्व यांचे चित्र माथेरान रेल्वे स्टेशन येथे त्यांनी माथेरान मिनीट्रेनसाठी केलेले कार्य येथे येणार आहे. पर्यटकांच्या कायम स्मरणात राहावे याकरिता लावले होते; परंतु मागील एक वर्षापासून हे चित्र येथून गायब झाले होते व ते चित्र पुन्हा लागावे याकरिता आदमजी पीरभॉय यांचे नातू अली अकबर पिरभॉय हे रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करीत होते. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून,



बुधवारी हे चित्र पुन्हा माथेरान स्थानकामध्ये लावण्यात आले आहे.

माथेरानच्या पर्यटनामध्ये मिनी ट्रेनचे स्थान अनन्यसाधारण आहे, कारण माथेरानचे पर्यटन व अस्तित्व खऱ्या अर्थाने मिनीट्रेन सुरू झाल्यानंतरच बहरले होते. या ट्रेनमधून प्रवास करण्याकरिता देश-विदेशातून अनेक पर्यटक दाखल होत असतात. माथेरान मिनी ट्रेनचा इतिहास १९०७ मध्ये सुरू झाला, जेव्हा नेरल आणि माथेरान दरम्यान ही हेरिटेज रेल्वे सुरू झाली. सर आदमजी पीरभॉय यांनी आपल्या मुलाच्या, अब्दुल हुसैन आदमजी पीरभॉय यांच्या मदतीने या १९०४-१९०७ दरम्यान १६,००,००० रुपयांच्या खर्चाने बांधलेल्या रेल्वेमार्गाचे बांधकाम पूर्ण केले. ही रेल्वे माथेरानला जाण्यासाठी एकमेव रस्ता प्रदान करते, ज्यामुळे तिचे ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्व आहे. त्यांनी केलेल्या या कामाला हवा तसा सन्मान अजूनही माथेरानमधून मिळाला नसल्याची खंत यांचे नातू अली अकबर पिरभॉय यांनी व्यक्त केली.

> **आमच्या आजोबांनी माथेरान पर्यटन वाढविण्याकरिता मिनीट्रेनमार्फत दिलेल्या योगदानाला हवा तसा सन्मान अजूनही मिळाला नाही. माथेरान स्थानकामध्ये त्यांच्या नावाने एक स्मारक व्हावे अशी आम्ही सातत्याने मागणी करत असतो; परंतु त्याकडे दुर्लक्ष केले जाते.**
> **- अली अकबर पिरभॉय**



● पनवेल पालिका क्षेत्रात वाढत्या लोकसंख्येसह सुरक्षा व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी विविध भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. (छायाचित्र : राजेश डांगळे)

## अर्ज भरण्यास मुदतवाढ

**अलिबाग :** सैनिक कल्याण विभागातील सरळ सेवेतील लिपिक टंकलेखक (गट-क) पदभरतीबाबत सैनिक कल्याण विभागाच्या www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उमेदवाराकडून ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. ५ नोव्हेंबरपर्यंत देण्यात आली होती. तथापि, जास्तीत जास्त उमेदवारांना अर्ज भरण्याची संधी मिळण्याकरिता अर्ज भरण्याकरिता दि.२६ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, जास्तीत जास्त उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड ले. कर्नल राहुल वैजनाथ माने (नि.) यांनी केले आहे.

## वांगणी-कर्जतदरम्यानच्या फाटकांचा समावेश | उपनगरीय रेल्वे प्रवास जलद करण्याचा प्रयत्न

# मध्य रेल्वेवरील दहा रेल्वे फाटके बंद होणार

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत येथे मध्य रेल्वे कडून बनवण्यात येत असलेला कारशेड आणि पनवेल-कर्जत रेल्वे मार्ग यामुळे मध्य रेल्वेवरील या मार्गाचे महत्त्व वाढणार आहे. ते लक्षात घेऊन मध्य रेल्वेचे मेन लाइन मार्गावर उपनगरीय रेल्वेच्या जलद प्रवासासाठी वांगणी ते कर्जतदरम्यान असलेली दहा रेल्वे फाटक बंद करण्यात येणार आहेत. दरम्यान, त्यातील काही ठिकाणी उड्डाण पूल बांधण्याचे प्रयोजन मुंबई रेल कॉर्पोरेशनकडून सुरू असून, २२६ कोटींचा हा प्रस्ताव मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे.

मध्य रेल्वेचे मेन लाइनवरील उपनगरीय लोकल वाहतूक जलद व्हावी यासाठी मोठी पावले उचलली जात आहेत. मेन लाइनवरील कल्याण ते कर्जतदरम्यान असलेली १० लेव्हल क्रॉसिंग गेट्स कायमस्वरूपी बंद करण्याचे हालचाली सुरू आहेत. कल्याण ते कर्जत या उपनगरीय विभागात सध्या वांगणी ते कर्जत येथे १० रेल्वे फाटक कार्यरत आहेत. त्यात बदलापूर वांगणीदरम्यान एक, वांगणी शेलू दरम्यान दोन, शेलू ते नेरळदरम्यान एक, तर नेरळ ते भिवपुरी रोडदरम्यान दोन आणि भिवपुरी रोड ते कर्जत यादरम्यान दोन फाटके आहेत. मेन लाइनवरील या मार्गावर दिवसातून अनेकदा ही सर्व फाटक वाहन वाहतुकीसाठी खुली करण्यात येतात. दरवेळी फाटक उघडे असताना रेल्वे वाहतूक काही मिनिटांसाठी थांबवावी लागते. त्यामुळे लोकलच्या वेळापत्रकात सातत्याने येतो. परिणामी, प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो.

रेल्वेच्या आकडेवारीनुसार, प्रत्येक फाटकावर दिवसातून किमान तीस ते चाळीस वेळा फाटक बंद-उघड करण्याची प्रक्रिया पार पडते. त्यामुळे केवळ या विभागातच लोकल गाड्यांचा सरासरी आठ ते दहा मिनिटांचा वेळ वाया जातो. फाटक बंद झाल्यावर रस्त्यांवरील वाहतूकही ठप्प होते. त्यामुळे रेल्वे आणि रस्ते या दोन्ही वाहतुकीवर विपरित परिणाम होत असल्याने रेल्वे प्रशासनाने या ठिकाणी उड्डाण पूल उभारली जाऊ शकतात का, याचा अभ्यास सुरू आहे. रेल्वे फाटक बंद करून रोड ओव्हर ब्रिज उभारल्यास लोकल गाड्यांना ग्रीन कॉरिडॉर मिळेल. या मार्गावर गाड्यांचा प्रवास अधिक वेगवान आणि वेळेत पूर्ण होणार आहे. याशिवाय, रस्त्यांवरील वाहतूक कोंडीही कमी होईल, अशी माहिती मध्य रेल्वे प्रशासनाने दिली. त्यामुळे या मार्गावरील लोकल वाहतुकीला ग्रीन कॉरिडॉर मिळणार आहे. परिणामी, या मार्गावरील गाड्यांच्या वेगात वाढ होणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली.



### बंद होणारी फाटकंन

देउलवाडी-पुलाचीवाडी, सावरगाव, कोषाणे, भिवपुरी-चिंचवली, आंबिवली, नेरळ, दामत, शेलू, डोणे, वांगणी.

### कोट्यवधींचा होणार खर्च

**२३६ कोटींचा खर्च करण्याची तयारी सुरू केली असून मध्य रेल्वेने १0 फाटक कायमस्वरूपी बंद करून त्याजागी आधुनिक रोड ओव्हर ब्रिज बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या १0 उड्डाणपुलांसाठी सुमारे २३६ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, त्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला असून, त्यांच्या जागी नवे रोड ओव्हर ब्रिज (आरओबी) उभारण्यात येणार आहेत.**

# निवडक

## रमेश भोळेंना पुरस्कार जाहीर



**नवीन पनवेल :** दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघ नाशिक यांच्यावतीने पत्रकार दिनानिमित्त दरवर्षी महाराष्ट्रातील आपापल्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना इंटरनॅशनल अचिव्हर्स अवॉर्ड पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. यावर्षीचा पत्रकारिता क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पत्रकार रमेश भोळे यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. रमेश भोळे हे अनेक वर्षे पत्रकार, संपादक म्हणून ते काम पाहत आहेत. साईंचे सोबती या पुस्तकांचे ते लेखक असून, दरवर्षी दिवाळी अंकांमध्ये तसेच साईलीला अंकांमध्ये त्यांचे अनेक लेख कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. रमेश भोळे यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील कार्याची दखल घेत त्यांना इंटरनॅशनल अचिव्हर्स अवॉर्ड जाहीर करण्यात आला आहे. हा राष्ट्रीय पुरस्कार सोहळा मंगळवार, दि. ६ जानेवारी रोजी दुपारी अडीच वाजता साईबाबांची पुण्यभूमी शिर्डी येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. पत्रकार रमेश भोळे यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने सर्वस्तरातून त्यांचे हार्दिक अभिनंदन होत आहे.



## फणसाड अभयारण्यात पक्षी निरीक्षण

**कोर्लई :** मुरुड जंजिरा पर्यटनात प्रसिद्ध असलेल्या मुरुड तालुक्यातील फणसाड वन्यजीव अभयारण्यात ग्रीन वर्क ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने सहाय्यक वनसंरक्षक मनोहर दिवेकर, वनपरिक्षेत्र अधिकारी नितीन ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षी निरीक्षण कार्यक्रम घेण्यात आला. ठाणे-ग्रीन वर्क ट्रस्टचे संचालक निखिल भोपाळे यांची टीम, फणसाड अभयारण्याचे वनपाल हरिश्चंद्र नाईक, वनरक्षक, वनमजूर यांनी पक्षी प्रजाती ओळख, माहिती, आवाज, दिसलेल्या पक्ष्यांची नोंद घेण्यात आली. यावेळी पक्षी निरीक्षणात सर्प गरुड, शिक्रा, हरियाल, वेडा राघू, नील माशिमार, बगळा, सातभाई, कोतवाल, धनेश, शेंडी गरुड, खाटिक आदी पक्षी आढळून आले.

## शहरातील रस्त्यांबाबत पालिकेला पत्र

**नवीन पनवेल :** पनवेल शहरातील रस्त्यांबाबत आणि काही गतिरोधक बसविण्याबाबत भाजपचे शहर उपाध्यक्ष केदार भगत यांनी पालिकेकडे पत्रव्यवहार केला असून, पालिकेकडूनदेखील लवकरच कार्यवाही होणार असल्याचे त्यांना सांगितले आहे. शहरातील हुतात्मा हिरवे गुरूजी मार्ग म्हणजे जुने आदर्श हॉटेल ते छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा हा मार्ग खड्ड्यांनी व्यापला आहे. हीच परिस्थिती कापड गल्ली, स्वामी हॉटेल ते गावदेवी मंदिर, तक्का येथील पेट्रोल पंपजवळदेखील आहे. हे सर्व रस्ते शहरातील मुख्य रस्ते आहेत. खड्ड्यातून मार्गक्रमण करताना नागरिकांना विशेष करून वाहनचालकांना जिकिरीचे झाले आहे. पावसामुळे काही महिने नागरिकांनी रस्त्यामुळे होणार हाल सोसले आहेत. पण आता तातडीने नागरिकांना खड्डेमुक्त आणि धूळमुक्त रस्ते हवे आहेत. त्यामुळे याबाबत गांभीर्यपूर्वक विचार करून रस्त्यांची डागडुजी आणि शक्य असेल तिथे नवीन रस्ते करावेत. तसेच शहरातील मुख्य मार्केट (हनुमान मंदिर) ते उरण नाका रस्ता आमच्या परिसरातून जातो आणि त्या रस्त्यावर वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात आहे. येथील रहिवाशांना त्रास होत आहे. वाहतूक कोंडी होत आहे. अनेक वाहनचालक येथे अतिवेगाने वाहने चालवतात. त्यामुळे अपघात होण्याचा धोका वाढला असून, शाळकरी मुले, वृद्ध व्यक्ती आणि पादचारी यांना रस्ता ओलांडताना अडचण निर्माण होते. संबंधित ठिकाणी गतिरोधक बसविण्यात यावेत, अशी मागणी भगत यांनी केली आहे.

## निवृत्त पोलीस पाटलांचा सन्मान

**तळा :**तळा तालुका पोलीस पाटील संघटना व तळा पोलीस ठाणे यांच्या वतीने निवृत्त पोलीस पाटलांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. तळा पोलीस ठाणे येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यावेळी पोलीस पाटील म्हणून आपली सेवा बजावून निवृत्त झालेल्या वावे मांद्रज येथील वैशाली बाबुराव घोसाळकर, गौळवाडी येथील श्रीरंग नथुराम खेडेकर, वानस्ते येथील राजाराम यशवंत राऊत, काकडशेत येथील सुरेंद्र भास्कर राऊत व रोवला येथील भागोजी रामचंद्र कानसे या पाच निवृत्त पोलीस पाटलांना तळा पोलीस पाटील संघटना व तळा पोलीस ठाणे यांच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच विविध गुन्ह्यांमध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावलेल्या बारपे येथील कांतीलाल शिवराम कसबले, तळेगाव येथील किशोर भिकू कदम व मालूक येथील नागराज भिकानंद पवार या पोलीस पाटलांनाही तळा पोलिसांकडून सन्मानित करण्यात आले. यांसह तालुक्यातील सर्व पोलीस पाटलांना विशेष कामगिरी बाजावल्याबद्दल प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● दुकानाचा गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग-रेवस रोडवर हॉटेल रविकिरण शेजारी, अलिबाग बाझार शेजारील गाळा, एरिआ-६६० चौ.फूट, अधिक माहितीसाठी इच्छुक ग्राहकांनी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा-९८५०९५६७८२/७०५८५८१८०१

● नागावमधील हॉटेलमध्ये कामासाठी रिसेप्शनिस्ट आणि हाउसकिपर इत्यादी माणसांची आवश्यक्ता आहे. मो. ९९२१९७८०८०

● Design Metrics is Hiring. Need a civil draftsman/ Site Supervisor at our Studio in Alibag. Skills required - Basic Autocad Kindly share your CV on design-metricsoffice@gmail.com Contact No - 9970051876

● श्री इलेक्ट्रीकल अँड प्लंबिंग वर्क्स, चेंढरे मारुती मंदिराशेजारी कामासाठी ड्रायव्हर, इलेक्ट्रिशन, वायरमन व प्लंबर या कामाचा अनुभव असलेली मुले पाहिजेत. प्रत्यक्ष भेटा पगार रु. १५०००/- संपर्क-९४२२६९०८५३,७८७५६८३७७३

● समुद्रापासून पाच मिनिट अंतरावर फुल फर्निश ब्लॉक विकणे आहे. मो. ८८०५५४०४६४.

● सकाळी नाश्ता बनविण्यासाठी अलिबागमधील बाई पाहिजे. ७०६६१३८३६८.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# स्मिता नवघरे यांचा सन्मान



**महाड :** तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये शिक्षण व सामाजिक क्षेत्रात प्रभावी कार्य करणाऱ्या घुरुपकोंड येथील प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका तसेच सृष्टी प्रतिष्ठानच्या संस्थापिका स्मिता नवघरे-जोष्टे यांना स्वतंत्र कोकण राज्य अभियानातर्फे 'कोकण रत्न २०२५' जाहीर करण्यात आला आहे. मुंबई मराठी पत्रकार भवन येथे १३ डिसेंबर रोजी त्यांचा सन्मान होणार आहे. स्मिता जोष्टे या मूळच्या खान्देश प्रदेशातील असून, खान्देश एकता मंडळ महाडच्या सक्रिय सदस्य आहेत. त्या सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात सातत्याने सहभाग घेत असून, खान्देश आणि कोकण यांच्या स्नेहबंधांना जोडणारे कार्य त्यांनी केले आहे. तसेच, त्या आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त प्राथमिक शिक्षिका असून विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रमांची अंमलबजावणी, किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन व सॅनिटरी पॅड वाटप तसेच शिक्षणक्षेत्रातील नावीन्यपूर्ण योगदान याबाबत त्यांचे विशेष कार्य अधोरेखित होते.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, श्री. सत्यनारायण राम बिलास जाजू यांचे मालकीहक्कातील, ताबेकब्जातील व वहिवाटीतील जमीन मिळकत आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे.

| गावाचे नाव | सर्वे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार | भोगवटादारचे नाव |
|---|---|---|---|---|
| मौजे-चिंचवली तर्फे वाजे ता.पनवेल, जि. रायगड | ५८/१ | ०.४०.४० पोटखराब- ०.०८.१० एकूण क्षेत्र- ०.४८.५० | ०८.५० | श्री. सत्यनारायण रामबिलास जाजू |

उपरोक्त नमुद जमीन मिळकत ही श्री. सत्यनारायण रामबिलास जाजू यांचे मालकीहक्कातील, ताबेकब्जातील व वहिवाटीतील जमीन मिळकत आहे.

तरी सदरहु जमीन मिळकतीसंबंधी अथवा तिच्या कोणत्याही हिश्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षीस, चार्ज अटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा, कोणत्याही प्रकारची बुकींग वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष दाखल कराव्यात. या प्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदरहू जमीन मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे माझे अशील समजतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत खरेदीदार यांच्यावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १२/११/२०२५

सही
खरेदीदारा तर्फे वकील
ADV. RAJESHREE BHAUSAHEB VIKHE-PATIL

FLAT NO.- 101, PAVAN APARTMENT,
AMARDHAM ROAD, LOKHANDIPADA,
OPP PANVEL COURT, OLD PANVEL,
DIST. RAIGAD 410206

sd/-
Adv.SACHIN ROHIDAS BHOSALE
ADV. SACHIN KRISHNABAI ROHIDAS BHOSALE
M.A, L.L.B
MAH/10652/2022
15/11/2022

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

ई निविदा सूचना क्र.५०/२०२५-२०२६ (मुंबई) करीता

दिनांक २८/१०/२०२५ रोजी दैनिक नवराष्ट्र, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक कृषीवल, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या : https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | रानसई आणि पाताळगंगा पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... उद्योग सारथी भूखंडामधून स्टॉक साहित्य व खराब झालेले पाईप, जुन्या ऑफिसच्या समोर हालविणे. | ₹३,३४,९५४.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक २४/११/२०२५ पर्यंत : https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकर सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. २७५/५, एकूण क्षेत्र ४-०५-०० आर. चौ. मीटर, आकार ४०.०० रू. पै. ही बिनशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक अतिश अशोक म्हात्रे रा. आगरसुरे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १३/११/२०२५

**(अॅड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हो.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे-करजांडे, ता. पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाचा भूखंड १) निसार अब्दुल गफुर शेख, २) सीमा निसार शेख यांच्या मालकीहक्कात व ताबेकब्जातील आहे. सदर भूखंड हा दि.०३/०८/२०११ रोजीच्या त्रिपक्षीय कराराने विकत घेतलेला आहे. सदर भुखंड आमचे अशिल त्रिपक्षीय कराराने विकत घेत आहेत त्याकरीता सदर भूखंडाचे स्वामित्व पडताळण्याकरीता जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. करजांडे, ता. पनवेल, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | सिडको फाईल नं | सेक्टर | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी |
|---|---|---|---|---|
| १) निसार अब्दुल गफुर शेख<br>२) सीमा निसार शेख | ५१९ | ०४ | १२२ | ४० |

वर नमुद भूखंड आमचे अशिल त्रिपक्षीय कराराने विकत घेत आहेत. सबब वर नमुद भूखंड मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, एम.ओ.यु, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अॅटचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विशद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक :- १३/११/२०२५

सही/-
**अॅड. सचिन बी. कोंडीलकर,**
शॉप नं. १४२, म्युनसीपल कॉम्प्लेक्स,
जुना भाजी मार्केट जवळ, पनवेल,
ता.पनवेल, जि. रायगड. ४१०२०६.
मो.९८३३३०६३६१.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे अंत्राट तर्फे वरेडी, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १)श्री.रामचंद्र उर्फ रामण बालू हजारे<br>२) बेबी रामचंद्र हजारे | १०५ | २/अ | ०-३४-०० | ० | २५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**अॅड. निलेश दामु मुंढे**
दिनांक :-१४/११/२०२५
मो.नं.८४४६८६९६७१
ई मेल : nileshmundhe029@gmail.com

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड

**जाहिर सूचना**

**पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात पशुवैद्यकीय दवाखाना सुरु करण्यासाठी जागा भाडेतत्वावर घेणेबाबत.**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात पशुवैद्यकीय दवाखाना सुरु करण्यासाठी खारघर, नावडे-तळोजा विभाग व नवीन पनवेल येथे तळमजला वरील १५०० ते २००० चौ. फुट जागा भाडेतत्वावर घेणेकामी मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका इच्छुक व्यक्ती/संस्था यांचेकडून अर्ज मागविणेत येत आहेत. जागा/इमारत भाडेतत्वावर घेणेचा कालावधी २ वर्षांचा असेल

इच्छुक व्यक्ती/संस्था यांनी जागेचे ठिकाण, भाडे इ. तपशीलासह अर्ज पनवेल महानगरपालिकेच्या pmcmalmatta2018@gmail.com या मेलआयडीवर अथवा प्रत्यक्ष कार्यालयात दिनांक २०/११/२०२५ रोजी दुपारी १४.०० पर्यंत जमा करावेत.

संपर्क क्र. :- श्री. जयराम पादीर. ९३२३१६६४९०

**उप आयुक्त, मालमत्ता**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.पमपा/माव्य/९९२५/प्र.क्र.९५/७७२/२०२५
दिनांक :- १३/११/२०२५

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, आमचे अशिल **(१) उदय रामचंद्र मोरे,** सज्ञान, भारतीय रहिवाशी, आणि **(२) सुनिता उदय मोरे,** सज्ञान, भारतीय रहिवाशी, दोघेही राहणार : १०४/ए, प्रफुला को.-ऑप. हाउसिंग सोसायटी, ए. जी. पवार गल्ली, इंडिया युनायटेड मिल क्र.५ च्या जवळ, भायखळा पूर्व, मुंबई-४०००२७, यांच्याशी यात याखाली लिहिलेल्या **परिशिष्टामध्ये** अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या शेतकी जमिनीच्या त्या सर्व तुकड्याची आणि भागाची त्यावरील संरचनेसह खरेदी आणि संपादन करण्यासाठी वाटाघाटी करीत आहेत (एकत्रितपणे **"सदर मालमत्ता"**).

सदर मालमत्तेच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील कोणत्याही स्वरूपाची विक्री, हस्तांतरण, अभिहस्तांतरण, अदलाबदल, वाटप, आकार, भार, भाडेदारी, पोट भाडेदारी, भाडेपट्टा, पोट- भाडेपट्टा, अनुज्ञप्ती, गहाण, वारसा, भोगवटा, कब्जा, शेअर, बक्षिस, धारणाधिकार, परिरक्षा, सुविधाधिकार, न्यास, एकाधिकार, प्रसंविदा, अधित्याग, अधित्यजन, किंवा अन्य कोणत्याही पद्धतीने कोणताही करारनामा, विलेख, दस्तऐवज, लिखिते, अभिहस्तांकन विलेख, मृत्युपत्र, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था/तडजोड, विवाद, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, करार/करारनामे, विकासाधिकार किंवा एफएसआय/ टीडीआर वापर, भार किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाचे काहीही असेल तर त्याद्वारे कोणताही शेअर, अधिकार, हक्क, इस्टेट, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/किंवा मागणी असेल अशा सर्व व्यक्तींनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना आमच्या **दुसरा मजला, एन. एम. वाडिया बिल्डींग, १२३, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१** येथील कार्यालयामध्ये **dhawal.mehta@wadiaghandy.com** आणि **bhakti.mehta@wadiaghandy.com** यांना मार्क केलेल्या प्रतीसह या सूचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत त्या संबंधातील दस्तावेजी पुराव्यासह लेखी स्वरूपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे. अन्यथा अशा प्रकारचा कोणताही शेअर, अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, आक्षेप, आणि/किंवा मागणी यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात येईल आणि त्यांचा अधित्याग आणि/किंवा परित्याग करण्यात आलेला आहे असे समजण्यात येईल.

**यात यावर संदर्भित केलेले परिशिष्ट**
**(सदर मालमत्तेचे वर्णन)**

मौजे कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील गट क्र.३३९, हिस्सा क्र.१/२, क्षेत्रफळ २० आर (म्हणजेच २००० चौ.मी. किंवा त्याच्या आसपासच्या समतुल्य) शेतकी जमिनीचा त्यावरील संरचनांसह तो सर्व तुकडा आणि भाग आणि खालील प्रमाणे सीमित असलेला, म्हणजेच,-

उत्तरेकडे किंवा त्या दिशेकडे : रस्ता
दक्षिणेकडे किंवा त्या दिशेकडे : गट क्र.३४३अ ची जमीन
पूर्वकडे किंवा त्या दिशेकडे : गट क्र.३३९ हिस्सा क्र.१(भाग) ची जमीन
पश्चिमकडे किंवा त्या दिशेकडे : गट क्र.३४२ ची जमीन

**आज दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५**

**वाडिया घांदी आणि कं. करीता**
**भक्ती एम. मेहता**
**भागिदार**

## वीज बंद निवेदन

महापारेषण — महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

महापारेषण कंपनीद्वारे कळविण्यात येत आहे की, **दि. १३.११.२०२५ सकाळी १०.०० वाजल्यापासून ते दि. १६.११.२०२५ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत** (एकूण चार दिवस) २२० के. व्ही. आपटा – पॉवरग्रीड १ आणि २ या वाहिनीवर अत्यंत महत्वाचे मनोरा उभारणीचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे या कालावधीत वीज पुरवठा हा २२०के.व्ही. पॉवर ग्रीड उपकेंद्राद्वारे असणार आहे. सदर कालावधीत पॉवरग्रीड उपकेंद्रात काही बिघाड झाल्यास २२० के. व्ही. तळोजा उपकेंद्राच्या लगतच्या गावांना तसेच तळोजा औद्योगिक वसाहत व आजुबाजूच्या गावांतील वीजपुरवठा खंडित होवू शकतो. तरी याबाबतीत वीज ग्राहकांनी महापारेषण कंपनीस सहकार्य करावे ही विनंती.

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**अउदा संवसु विभाग पनवेल**

**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात**
**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि. रायगड**

क्रमांक/आरटीएस/अपील क्र. ३३७/२०२५
दिनांक : ११/११/२०२५

१ श्री. प्रितमकुमार नवनाथ सोनावणे
मु. ४ ए/१७, प्लॉट नं. ६, पिरवाडी, खेड, सातारा,
जि. सातारा ४१५००३ — **अपिलार्थी**
२ श्री. रुपेश गजानन मोरे
मु. भोस्ते, ता. श्रीवर्धन, जि. रायगड
तर्फे अखत्यारी श्री. प्रथमेश जयवंत साबळे
मु. शिवथर, ता. जि. सातारा ४१५००१

विरुद्ध

१ तहसिलदार श्रीवर्धन
२ उप वनसंरक्षक, ता. रोहा, जि. रायगड
३ मोहिद्दीन हसन बडे मयत तर्फे वारस
३/१ श्रीम. रहिमा मोहिद्दीन बडे
मु. फ्लॅट २०२, जेसेल एंपायर, प्लॉट नं. ६, सेक्टर नं. ९, — **उत्तरार्थी**
खांदा कॉलनी, ता. पनवेल, जि. रायगड
३/२ श्री. हसनमिया मोहिद्दीन बडे
मु. जसवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड
अ. क्र. ३/३ व ३/४ रा. मु. फ्लॅट २०२, जेसेल एंपायर,
३/३ श्री. उस्मान मोहिद्दीन बडे
३/४ श्री. मुबीन मोहिद्दीन बडे
प्लॉट नं.६. सेक्टर नं.९. खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड
३/५ श्रीम.मरियम आसिफ हमदुले
रा. फ्लंट नं. ५०३, ७ बी, गुरुशरमण कॉम्पलेक्स, विश्रीळी नाका,
पनवेल, जि. रायगड ४१०२०६

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे भरडोली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील स.नं./गट नं. ५३. क्षेत्र ३.०७.०० हे. आर. आकार १.०६ रु. पैसे, या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी या न्यायालयात दि. ११/०८/२०२५ रोजी अपील दाखल केले आहे. सदर अपिलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपिलामध्ये दि.२५/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग हे सुनावणी घेणार असून सदरची सुनावणी उपविभागीय अधिकारी, माणगाव यांचे कार्यालय, माणगाव येथे निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : माणगांव
दिनांक : ११/११/२०२५

सही/-
**अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग करीता**

## जाहिर सूचना

**सूचना** देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांच्या वतीने येथे खाली लिखित **पहिल्या अनुसूचीमध्ये** अधिक विशेषत: वर्णन करण्यात आलेल्या जमीन आणि त्या जमिनीवर उभ्या असलेली संरचना **("मालमत्ता")** यांच्या अधिकार, शिर्षक, हिस्सा आणि हितसंबंधाबाबत तसेच येथे खाली लिखित **दुस-या अनुसूचीमध्ये** अधिक विशेषत: वर्णन करण्यात आलेल्या जमिनीवरील कायमस्वरुपी आणि चिरंतन मार्गाच्या अधिकाराबाबत **("मार्गाच्या अधिकारीची जमिन")** फ्लॅट क्रमांक २८०२, ए१ विंग, मिनर्वा, एनएम जोशी मार्ग, जेआर बोरीचा मार्ग, लोढा बेलिसिमोच्या शेजारी, महालक्ष्मी (पुर्वी), मुंबई – ४०००११ येथे राहणारे **विकाश सतीश सुतारिया ("मालक")** यांच्या मालकी हक्काची आम्ही चौकशी करीत आहोत.

जमीन किंवा मार्गाच्या अधिकारीची जमिन किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये मालकांचे अधिकार, मालकी हक्क, हिस्सा किंवा हितसंबंधाविरुद्ध किंवा संदर्भात कोणाही व्यक्ती/व्यक्तींचा कोणताही दावा आणि/किंवा मागणी आणि/किंवा आक्षेप असल्यास, याच्या पुढे किंवा अंतर्गत कोणत्याही विक्री, हस्तांतरण, नियुक्ती, भेट, विनिमय, भाडेपट्टी, परवानगी आणि परवाना, कुळ, ताबा, वापर, वहीवाट, विश्वस्त, देखभाल, सुविधाधिकार, संपादन, मागणी, विकसन अधिकार, विकास क्षमता वापरण्याचा अधिकार, एफएसआयचा वापर, मुखत्यारपत्र, प्रलंबित दावे, गहाण, धारणाधिकार, भार, गृहीतक (प्राप्तीच्या मार्गासह), तारण, हमी, कर्ज, ऋण, आगाऊ रक्कम, वारसा, योजना, वसीहत, विभाजन, तडजोड, किंवा कोणत्याही कॉर्पोरेट स्ट्रक्चरिंग किंवा रीस्ट्रक्चरिंग (कोणत्याही विलीनीकरण, डिमर्जर, दिवाळीखोरी, लिक्विडेशन, किंवा अन्यथा सह), किंवा कोणत्याही न्यायालयाचा, न्यायाधिकरणचा, महसूल किंवा वैधानिक प्राधिकरणाचा किंवा लवादाचा कोणत्याही जप्ती, मनाई हुकूम, डिक्री, आदेश, निर्णय, किंवा निवाडा अंतर्गत किंवा कोणत्याही करार, सामंजस्य करार, टर्म शीट आणि/किंवा इतर कोणताही डीड किंवा दस्तऐवज (एकतर कोणत्याही खटल्यात आव्हान दिलेले किंवा अन्यथा) अंतर्गत किंवा जमिनीच्या किंवा मार्गाच्या अधिकारीची जमिनीसंदर्भात किंवा संबंधित कोणताही दावा किंवा मागणी असल्यास, जो मालकांचे हक्क, शिर्षक किंवा हितसंबंधा प्रतिकूल किंवा विसंगत असल्यास किंवा जरी इतर कोणतेही अधिकार, मालकी हक्क, मागणी, दावा किंवा हितसंबंध **("दावे")** असल्यास, त्यांनी याद्वारे आम्हाला आमचे कार्यालय खैतान अॅण्ड कंपनी, वकिल, वन वर्ल्ड सेन्टर, १३वा मजला, टॉवर-१सी, ८४१ सेनापति बापट मार्ग, मुंबई ४०००१३ येथे तसेच mumbai@khaitanco.com (श्री. देवेंद्र देशमुख यांना लक्षवेधासाठी चिन्हांकीत करुन) या ईमेल सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १० (दहा) दिवसांच्या कालावधीत ज्याच्या आधारावर असे दावे, मागणी किंवा हक्क केले जात आहेत अश्या सर्व कागदपत्रांच्या प्रतींसहीत लिखीत स्वरुपात कळविणे आवश्यक आहे.

जर उपरोक्त कालावधी संपण्यापुर्वी कोणताही दावा प्राप्त झाला नाही तर अशा परिस्थीतीत असा कोणताही दावा अस्तित्वात नाही असे गृहीत धरले जाईल किंवा असा दावा जर असेल तर तो माफ केला गेला आहे आणि/किंवा सोडून दिला गेला आहे असे मानले जाईल आणि तो दावा आमच्या अशिलांवर बंधनकारक नाही असे मानले जाईल.

**वर संदर्भित केलेली पहिली अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

तालुका अलिबाग, जिल्हा रायगड मधील सार्तीजे गावातील गट क्रमांक १३२/१ असलेला एकूण मोजमापीत ३,५१० चौरस मिटर्स बिगर शेतजमिनीचा सर्व तो तुकडा आणि खंड सोबत तळमजला आणि १ वरचे मजले यांचा समावेश असलेला मोजमापीत ६१३.१४ चौरस मिटर्सचा 'व्हिला एस्टेल' नावाच्या बंगल्यासहीत.

**वर संदर्भित केलेली दुसरी अनुसूची**
**(मार्गाच्या अधिकाराच्या जमिनीचे वर्णन)**

तालुका अलिबाग, जिल्हा रायगड मधील सार्तीजे गावातील गट क्रमांक १२८/३/२ असलेला एकूण मोजमापीत ३३,५८० चौरस मिटर्स जमिनीपैकी आणि जमिनीतून मोजमापीत ४.६५ चौरस मिटर्सचा मार्गाचा अधिकार.

आज दिनांक १४ नोव्हेंबर २०२५

**खैतान अॅन्ड कंपनी करीता**
**सही /-**
**देवेंद्र देशमुख**
**भागीदार**

## जाहीर निविदा

ग्रामपंचायत नांदवी ता.माणगाव, जि.रायगड यांचे वतीने जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येते आहे की, ग्रामपंचायत नांदवी हद्दीत खालील प्रमाणे विकास बांधकामे करणेचे असल्याने इच्छुक निविदा धारकांनी नोटीस मधील सर्व बाबी व नियम अटी शर्तींना अधिन राहून निविदा सादर करावी.

| अ क्र. | कामाचे नाव व ठिकाण | योजनेचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम (लक्ष) | कामपूर्ण करण्याचा कालावधी | निविदा फी | बयाना /इसारा रक्कम | निविदा सादर करणेची अंतिम तारीख | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुनिता सावंत ते सुधाकर सावंत वाडापर्यंत रस्ता करणे | १५ वित्त आयोग पंचायत समिती स्तर | १००००० | तीन महिने | २००/- | - | २०/११/२०२५ | सायंकाळी ०६:०० | ग्रामपंचायत कार्यालय नांदवी |
| २ | आश्रम शाळा ते घराडे यांच्या घरापर्यंत रस्ता करणे | १५ वित्त आयोग पंचायत समिती स्तर | ३००००० | तीन महिने | २००/- | - | २०/११/२०२५ | सायंकाळी ०६:०० | ग्रामपंचायत कार्यालय नांदवी |
| ३ | तांबडी आदिवासी वाडी मारुती यांच्या घरापासून करवड यांच्या वाड्या पर्यंत गटार बांधणे | १५ वित्त आयोग पंचायत समिती स्तर | १००००० | तीन महिने | २००/- | - | २०/११/२०२५ | सायंकाळी ०६:०० | ग्रामपंचायत कार्यालय नांदवी |
| ४ | कुंभारवाडा ते जुना तलाव पर्यंत गटार दुरुस्त | १५ वित्त आयोग पंचायत समिती स्तर | १२५००० | तीन महिने | २००/- | - | २०/११/२०२५ | सायंकाळी ६:०० | ग्रामपंचायत कार्यालय नांदवी |
| ५. | बबन कालेकर ते सार्वजनिक शौचालय पर्यंत गटार दुरुस्त करणे | १५ वित्त आयोग पंचायत समिती स्तर | ७५००० | तीन महिने | २००/- | - | २०/११/२०२५ | सायंकाळी ६:०० | ग्रामपंचायत कार्यालय नांदवी |
| ६ | नांदवी बौद्धवाडी येथील विहिरीवर पंप बसवून साठवण टाकी बांधणे | १५ वित्त आयोग पंचायत समिती स्तर | १५०००० | तीन महिने | २००/- | - | २०/११/२०२५ | सायंकाळी ६:०० | ग्रामपंचायत कार्यालय नांदवी |

**अटी व शर्ती**

१) सहभागी ठेकेदाराने निविदा सीलबंद लिफाफ्यात सादर करणे आवश्यक.
२) कोऱ्या निविदा निविदाप्रसिद्धच्या दिनांका पासून निविदा विक्रीच्या अंतिम दिनांका पर्यंत कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेतच उपलब्ध होतील.
३) सदर निविदा फॉर्म निविदा फी निविदा फॉर्म घेताना कार्यालयात रोख स्वरुपात जमा करून त्याची पावती घेणे आवश्यक राहील. अथवा सदरची फी कार्यालयाच्या बँक खातेमध्ये जमा करून जमा केलेली पावती सादर केल्यास कोऱ्या निविदा प्राप्त होतील,
४) अंदाजपत्रकातील १२% अथवा १८% जी.एस.टी. हा मूळ अंदाजपत्रकातील असल्याने मंजूर ठेकेदारांना सदरचा जी.एस.टी. हा मंजूर निविदे नुसारच अदा केला जाईल.
५) खाडाखोड व दुरुस्ती केलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.
६) निविदा मंजूर वा नामंजूर करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेले आहेत.
७) मंजूर निविदा धारक ठेकेदारास रुपये ५००/- बाँड पेपरवर असणाऱ्या अटी शर्तींना अधीन राहून स्व:खर्चाने करारनामा करणे बंधनकारक राहील.
८) मंजूर विकास कामाचा निधी हा संबंधित कार्यालयाकडून प्राप्त झाल्यावर नियमाप्रमाणे अदा केला जाईल.
९) प्राप्त निविदा दि २०/११/२०२५ रोजी सकाळी ठीक स.११:३० वा. उघडण्यात येतील.
१०) निविदा धारकाने निविदे सोबत आवश्यक कागदपत्रे सादर करणेबाबतची सूचना ग्रामपंचायत नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत नांदवी**
**ता.माणगाव, जि.रायगड**

**मा. सरपंच**
**ग्रामपंचायत नांदवी**
**ता.माणगाव, जि.रायगड**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**

दुरध्वनी क्रमांक -०२१९२-२७५०४८ — तहसिलदार कार्यालय, खालापूर जि.रायगड
पिन कोड-४१०२०२ — ई मेल:-tahasil.khalapur3@gmail.com

पत्र क्र.मशा/आस्था/कात-५/वारस दाखला/देशमुख/२०२५/८३०३ दिनांक :-११/११/२०२५

## जाहीर वृत्तपत्र नोटीस

कै. श्रीकांत महादेव देशमुख हे नवी मुंबई महानगर पालिकेत मोरबे विभागात शिपाई या पदावर कार्यरत होते. कै. श्रीकांत महादेव देशमुख यांचे दि. ०२/१०/२०२५ रोजी निधन झाले आहे. कुटुंब निवृत्ती वेतन मिळणेकामी कै. श्रीकांत महादेव देशमुख यांची पत्नी श्रीम. सुलभा श्रीकांत देशमुख यांनी वारस दाखला मिळणेकामी दि.३०/१०/२०२५ रोजी या कार्यालयाकडे अर्ज सादर केला आहे. सदर अर्जदार यांचे विनंतीनुसार स्थानिक पंचनामा व जबाब घेवून ग्राम महसूल अधिकारी चौक यांनी अहवाल सादर केलेला आहे. सदर वारस पंचनामा, जबाब व इतर कागदपत्रांवरुन खालीलप्रमाणे वारस आहेत असे दिसून येते. तथापि सदर वारसांबद्दल हरकत असल्यास या कार्यालयास ०७ दिवसांत संपर्क साधावा.

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | नाते |
|---|---|---|---|
| १ | श्रीम.सुलभा श्रीकांत देशमुख | ४५ वर्षे | पत्नी |
| २ | कुमार ओम श्रीकांत देशमुख | १९ वर्षे | मुलगा |

सही/-
**(अभय चव्हाण)**
**तहसिलदार खालापूर**

**ग्रामपंचायत नागोठणे ता.रोहा, जि.रायगड**

**जाहिर निविदा**

मा. सरपंच, ग्रामपंचायत नागोठणे ता. रोहा, जि. रायगड यांचे मार्फत ग्रामनिधी व १५ टक्के मागासवर्ग राखीव निधी सन २०२५/२६ अंतर्गत खालील विकास कामे करण्यासाठी नोंदणी धारक अनुभवी ठेकेदार/स्थानिक संस्था यांजकडून लिफाफा पद्धतीने सिलबंद निविदा मागविणेंत येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | रमाईनगर येथे गटार बांधणे | ३०००००/- | १००/- | ११ महिने |
| २ | रमाईनगर येथे रस्ता करणे | २०००००/- | १००/- | ११ महिने |
| ३ | मिरानगर आदिवासीवाडी धोबी घाट बांधणे | २०००००/- | १००/- | ११ महिने |
| ४ | मिरानगर आदिवासीवाडी येथे शौचालय बांधणे | ३०००००/- | १००/- | ११ महिने |
| ५ | रामनगर येथे गटार बांधणे | २०००००/- | १००/- | ११ महिने |
| ६ | रामनगर येथे रस्ता तयार करणे | २०००००/- | १००/- | ११ महिने |
| ७ | रामनगर येथे शेड बांधणे | २०००००/- | १००/- | ११ महिने |
| ८ | मुकेश भोय घरासमोर गटार बांधणे - ग्रामनिधी | २०००००/- | १००/- | ११ महिने |
| ९ | कुंभारआळी येथे शौचालय बांधणे | ३०००००/- | १००/- | ११ महिने |

वृत्त पत्रात प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून सुट्टीचे दिवस सोडून ७ दिवसांचे आत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत निविदा सादर कराव्यात २) उशिरा आलेल्या निविदांचा विचार करण्यात येणार नाही. ३) सरकारी नियमा प्रमाणे असणाऱ्या सर्व शासकीय कपाती करणेंत येतील ५) ग्रा.पं. मधील खात्यावरील उपलब्ध असणा-या निधी प्रमाणे ठेकेदारास देयक अदा करणेंत येतील

सही /-
**श्री.राकेश रामचंद्र टेमघरे**
**ग्रामविकास अधिकारी**

सही /-
**सौ. सुप्रिया संजय महाडिक**
**सरपंच**

## जाहीरनामा

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

प्रणेश प्रकाश पाटील, — अर्जदार
रा.वडगाव, ता.पेण, जि.रायगड

**विरुद्ध**

ग्रामपंचायत रोडे, — सामनेवाला
ता.पेण,जि.रायगड.

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचा जन्म दिनांक १४/०६/१९९१ रोजी मौजे रोडे, ता.पेण, जि.रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत रोडे, ता.पेण, जि.रायगड यांचेकडे झालेली नसल्याने जन्म नोंद घालणेसाठी या कार्यालयांत अर्ज दाखल केला आहे. तरी या अर्जाची चौकशी तात्काळ करावयाची असल्याने याकामी जर अर्जदार यांच्या जन्माची नोंद घालण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १५ दिवसांत कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालयांत समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे. कोणाचेही म्हणणे किंवा आक्षेप या कार्यालयात मुदतीत प्राप्त न झाल्यास अर्जावर उपलब्ध पुरावे, कागदपत्र विचारात घेउन अर्जदार यांना उशिरा जन्म नोंद दाखला देणेबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १०/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले.

पेण
दि. १४/११/२०२५

सही/-
**(तानाजी शेजाळ)**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग




मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटिक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# निवडक

## बाहेगाव परिसरात बिबट्याची दहशत



**कोलाड** : काही दिवसांपूर्वी उडदवणे ते बाहे या गावांच्या दरम्यान गावकऱ्यांना बिबट्या दिसून आला होता. या घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या पथकाने घटनास्थळी जाऊन शहानिशा केली. तपासादरम्यान त्या ठिकाणी बिबट्याच्या पायाचे ठसे आढळून आले.या पार्श्वभूमीवर वनविभाग, रोहा आणि सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच बाहेगावात 'बिबट्या वैरी नव्हे तर शेजारी' या विषयावर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. गावकऱ्यांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमादरम्यान बिबट्याचे वर्तन, त्याच्याशी सहजीवन कसे साधावे, तसेच सुरक्षिततेचे उपाय याविषयी माहिती देण्यात आली.

## माथेरानमध्ये शिवसेनेचे मतभेद मिटले

**नेरळ** : कर्जत तालुक्यातील माथेरान या गिरिस्थान नगरपरिषदेमध्ये शिवसेना पक्षात सुरू असलेले चढाओढ थांबली आहे. या पक्षातील थेट नगराध्यक्षपदाचे दावेदार शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी आणि शहर संघटक मनोज खेडकर यांच्यातील दावेदारीसाठी सुरू असलेली चढाओढ आमदार महेंद्र थोरवे यांनी यशस्वी मध्यस्थी करून थांबवली आहे. दरम्यान, माथेरानमध्ये नगरपरिषद निवडणुकीत थेट नगराध्यक्ष पदासाठी चंद्रकांत चौधरी यांनी शिवसेना पक्षाकडून उमेदवारी देण्यात आली असून, माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर हे नवीन शहरप्रमुख बनले आहेत. माथेरानमध्ये शिवसेना भाजप पक्षाकडून आता थेट नगराध्यक्ष पदाची उमेदवारी शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी यांना देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. त्यावेळी शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या जागी नवीन शहर प्रमुख म्हणून माजी नगराध्यक्ष आणि विद्यमान शहर संघटक मनोज खेडकर यांची नियुक्ती करण्यात आली. त्याचवेळी भाजप माथेरानमध्ये युती म्हणून निवडणूक लढणार असलेल्या जागांची घोषणा करण्यात आली आहे.

## ठाकरेंचे शिलेदार उतरणार निवडणुकीच्या रिंगणात



**पनवेल** : गेल्या अनेक वर्षांपासून खांदा वसाहत व परिसरात राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रात भरीव कार्य करणारे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खांदा वसाहत शहरप्रमुख सदानंद शिर्के यंदाची महानगरपालिका निवडणूक लढण्यासाठी सज्ज झाले आहेत. ते शिवसेना पक्षाचे एकनिष्ठ गेली ३५ वर्ष कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे सकल मराठा समाज खांदा कॉलनी सचिव, विशाल को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी अध्यक्ष, अशोक को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी उपाध्यक्ष, नवजीवन मित्र मंडळ अध्यक्ष, कोकण विकास सामाजिक संस्थापक अध्यक्ष म्हणून कामकाज पहात आहेत . त्यांनी महानगरपालिकेची २०१७ साली निवडणूक लढवली आहे, पण त्यांचा त्यात निसटता पराभव झाला होता. परंतु, यंदा कोणत्याही परिस्थितीत त्यांना विजयी करण्याचा चंग महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी बांधला आहे.

## तरुणास भामट्या साधूने फसविले

**पनवेल** : श्रद्धेचा गैरफायदा घेत साधूपणाचा मुखवटा धारण करणाऱ्या एका भामट्याने कामोठे येथे राहणाऱ्या तरुणाला हिप्नोटाइज करून त्याच्याजवळ असलेली सव्वा लाख रुपये किमतीची सोन्या-हिऱ्याची अंगठी लंपास केल्याची घटना घडली आहे. एनआरआय सागरी पोलिसांनी साधूच्या वेशात आलेल्या भामट्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. तक्रारदार उदय केंद्रे (३०, रा. पार्क हेवन सोसायटी, से. २१, कामोठे) हा सकाळी सीवूड्स, सेक्टर-४० मधील पोतदार शाळेजवळ कामानिमित्त आला होता. यावेळी उदय त्याच्या कारमधून उतरत असताना एक जटाधारी, काळे कपडे परिधान केलेली व द्राक्षाच्या माळा व भगवी थैली हातात असलेला अनोळखी व्यक्ती त्याच्याजवळ आला. त्यावर भिक्षा मागणाऱ्या या साधूला उदयने १०० रुपयांची नोट दिली. यानंतर या भामट्याने हातचलाखीने त्याच नोटेस रुद्राक्ष व फूल देत उदयचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने उदयकडून त्याच्या हातातील प्लॅटिनमची अंगठी मागून घेतली व ती परत दिली. त्याला बोलण्यात गुंतवून ही अंगठी काढून घेतली व तेथून पलायन केले. त्यानंतर ही माहिती त्याने त्याच्या मित्रांना दिल्यानंतर त्यांनी एनआरआय सागरी पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली.

## आयफोनच्या खरेदीत पावणेतीन कोटींचे नुकसान

**पनवेल** : आयफोनचा व्यवसाय करणाऱ्या एका व्यापाऱ्याने ६०० आयफोन खरेदीच्या ऑर्डरमध्ये झालेल्या फसवणुकीत २ कोटी ७५ लाख रुपये गमावल्याची घटना पनवेलमध्ये घडली आहे. याबाबत चार जणांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.पनवेल शहरातील ४९ वर्षीय व्यापारी विशाल ट्रेडिंगचा व्यवसाय करतात. ऑगस्ट महिन्यात संबंधित व्यापाऱ्याने ६०० मोबाइल फोन निर्यातीकरिता ऑर्डर दिली होती. या आयफोनची किंमत २ कोटी ७५ लाख ५७ हजार एवढी असून, संबंधित व्यापाऱ्याने कंपनीला रक्कम दिल्यानंतरही मोबाइल फोन मिळत नसल्याने व्यापाऱ्याने दिलेल्या रकमेचा परतावा मागितला. यानंतरही कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने व्यापाऱ्याने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली. पोलिसांनी या प्रकरणी राजस्थान राज्यातील चार जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

## रस्त्याची साईडपट्टी खचली

**अलिबाग** : तालुक्यातील अलिबाग-रेवदंडा या मुख्य रस्त्याची साईडपट्टी ठिकठिकाणी खचली आहे. त्यामुळे मोठ्या अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा गवत उगवलेले असल्यामुळे वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नाही. परिणामी, मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु, याकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे. तरी, संबंधित विभागाने या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन तात्काळ रस्त्याच्या डागडुजीसह दुरुस्ती करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांसह वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

# कृषीवलच्या दणक्याने प्रशासनास जाग

**|| महामार्गावरील खड्डे भरण्यास प्रारंभ || प्रवाशांकडून समाधान व्यक्त**

**| कोलाड | प्रतिनिधी |**



मागील सतरा ते अठरा वर्षांपासून रखडलेल्या राष्ट्रीय मुंबई-गोवा महामार्गावर ६६ वरील सतत पडत असलेल्या परतीच्या पावसामुळे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांचा त्रास प्रवाशांसह वाहन चालकांना सहन करावा लागत आहे. तर एवढेच नव्हे तर, त्यात आता वाहने अडकून बंद पडत आहेत. याबाबत कृषीवलने आवाज उठवताच संबंधित विभागाला जाग आली असून, महामार्गावरील खड्डे बुजविण्यास सुरुवात करण्यात आली आहे. याबाबत नागरिकांसह प्रवाशांनी कृषीवलचे आभार मानले आहेत.

खांब कोलाडपासून तळवली, तिसे, भुवन, इंदापूरदरम्यान मोठ मोठे खड्डे पडल्याने त्यात वाहने अडकून बंद पडण्याच्या घटना घडत असल्याची बातमी कृषीवलमध्ये प्रकाशित होताच महामार्गावरील खड्डे भरण्यास सुरुवात झाली आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील खांब येथील दिपक धाबा ते गोमांतक हॉटेल, महिसदरा नदीवरील पूल, कुंडलिका नदीवरील पूल, कोलाड बाजारपेठ, कोलाड पोस्ट ऑफिससमोर, तिसे, तळवली, भुवन, इंदापूर या ठिकाणी रस्त्याला जीवघेणे खड्डे पडलेले असून, या खड्ड्यांतून प्रवास करताना प्रवाशांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. या खड्ड्यांतून प्रवास करताना वाहने खड्ड्यात अडकून बंद पडत आहेत. अनेकदा अपघात होत आहेत. याबाबत कृषीवलने आवाज उठवला असता, प्रशासनाने याची दखल घेत महामार्गावरील खड्डे तातडीने भरण्यास सुरुवात केली असल्याचे दिसून येत आहे.

## वाढत्या घरफोड्यांमुळे नागरिक धास्तावले

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल शहरासह खांदेश्वर वसाहत व खारघर उपनगर येथे झालेल्या तीन वेगवेगळ्या घरफोडीच्या घटनांनी येथील नागरिक धास्तावले आहेत. पनवेल शहरातील टिळक रस्त्यावरील मेस्त्री वास्तू दुकानातून दुकानदाराने दुकान बंद केल्यावर रात्रीच्या वेळी दुकानाच्या छताचे पत्रे तोडून दुकानातील नवरत्न स्टोन आणि रोख रक्कम असा १ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरला. अशीच स्थिती खांदेश्वर वसाहतीची आहे. मध्यरात्री सेक्टर १५ येथील प्रजापती आर्केड या इमारतीमधील गाळा क्रमांक १० मधील हॉटेलचे शटर तोडून ७० हजार रुपयांची चोरी केली. तर, खारघर उपनगरात मध्यरात्री सेक्टर ३५ या रेझा ग्रॅन्ड ओव्हर या इमारतीची सुरक्षा यंत्रणा चांगली आहे. मात्र, या इमारतीच्या मागील मोकळ्या जागेतून प्रवेश करत, चार चोरटे इमारतीमधील वाहनतळात शिरले. पहाटे चार वाजता सुरक्षारक्षक झोपले असताना चोरट्यांनी ही चोरी केली.

## तालुका समितीवर संजय कदम, आप्पासाहेब मगर यांची नियुक्ती

**| पनवेल | प्रतिनिधी |**



**■ वंदे मातरम्च्या वर्धापनदिनानिमित्त शासकीय स्तरावर समिती स्थापन**

बंकीमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८५७ साली लिहिलेले वंदे मातरम् या गीतास दि. ०७ नोव्हेंबर रोजी १५० वर्ष पूर्ण झाली. त्यानिमित्ताने शासन निर्णयानुसार, राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये वंदे मातरम् गीताच्या १५० व्या वर्धापन दिनाचे यशस्वी आयोजनासाठी अपर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखालीतालुकास्तरीय समिती स्थापन करण्यात येत आहे. यामध्ये पनवेलमधील पत्रकार संजय कदम व खारघर येथील पत्रकार आप्पासाहेब मगर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या कमिटीमध्ये अप्पर तहसीलदार पनवेल जितेंद्र इंगळे हे अध्यक्ष, गटविकास अधिकारी समीर वाठारकर सदस्य, सहा. आयुक्त कौशल्य विकास मोहसीन वस्ता, प्रतिनिधी, सदस्य गटशिक्षणाधिकारी शाह सकपाळ, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी पिल्ले, महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे प्राधिकृत प्रशिक्षण संस्था, प्रतिनिधी योगेश पाटील, अध्यक्ष व ज्योती लोहार सचिव, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे, शिक्षण संस्था प्रतिनिधी वाय.टी.देशमुख व राजेंद्र पालवे, संत श्रीकांत महाराज मोहोकर, क्रीडापटू प्रसाद ढवळे, विवेक सावंत, साहित्यिक गणेश म्हात्रे, सुनिता खरे, पत्रकार संजय कदम, आप्पासाहेब मगर, गडकिल्ले संवर्धन समिती सदस्य सागर मुंढे, प्रतिक चाचड, उद्योजक प्राणंश पाटील, संदीप मोहिते, महिला बचत गट प्रमुख अंजली इनामदार, स्वाती पवार आदींचा सहभाग करण्यात आला आहे.

## वैष्णवी कडूचा पोलिसांकडून सत्कार



**| पनवेल | प्रतिनिधी |**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू यांची कन्या वैष्णवी कडू हिने फ्लोरिडा येथील मायामी एव्हिएशन संस्थेत कमर्शियल पायलटची ट्रेनिंग पूर्ण करून ती कमर्शियल पायलट बनली आहे.

याबद्दल तिचा पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी विशेष सत्कार करून तिचे कौतुक केले. यावेळी पोलीस हवालदार माधव शेवाळे, गणेश कडू, दिलीप देशमुख, हसमुख वनवेरु आदींनी तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## रोह्याचा सुपुत्र अंश मरवडे दिसणार 'पारू' मालिकेत

**| खांब | प्रतिनिधी |**



रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी या गावचा सुपुत्र अंश मनोज मरवडे या बालकाला झी मराठीवर सुप्रसिद्ध असलेल्या पारू मालिकेत बालकलाकार म्हणून काम करण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे.

अंश मरवडे हा मनोज दत्तात्रेय मरवडे व जुई मरवडे यांचा सुपुत्र असून, सध्या हा परिवार आपला कामधंदा व व्यवसायाच्या निमित्ताने ठाणे येथे वास्तव्यास आहे. अंशचे वडील मनोज मरवडे हे ठाणे येथील गोडबोले हॉस्पिटलमध्ये इन्चार्ज आहेत. तर, पारू मालिकेतील बालकलाकार निवड झालेला अंश हा सुलोचना देवी सिंघानिया स्कूल ठाणे या स्कूलमध्ये चौथ्या इयत्तेत शिक्षण घेत आहे. अतिशय हुशार, दिसायला गोंडस, प्रत्येक बाबतीत हजरजबाबी व बालवयापासून अंगी असलेल्या नम्रतेमुळे अंशला पारू मालिकेतील बालकलाकार म्हणून गोपाळ या बालकाची भूमिका साकारण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. दरम्यान, अंशने भूमिका साकारलेल्या काही भागांचे प्रक्षेपण झी टिव्हीवर करण्यात आले आहे. तो करीत असलेली भूमिका रसिक प्रेक्षकांच्या चांगलीच पसंतीस उतरली आहे.

## रस्त्यावर कचरा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

तालुक्यातील आक्षी पुलाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. रस्त्याच्या दुतर्फा कचरा अस्ताव्यस्त पसरलेला दिसून येत आहे. या कचऱ्याची दुर्गंधी परिसरात पसरली असून, प्रवाशांना नाक मुठीत धरून जावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तरी, संबंधित प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे तात्काळ लक्ष देऊन कचऱ्याचा प्रश्न कायमचा मार्गी लावावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

# अमृत दुर्गोत्सव आगळावेगळा उपक्रम

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेने ऐतिहासिक कामगिरी करत विश्वविक्रमी झेप घेतली आहे. अमृतमार्फत या दिवाळीत अमृत दुर्गोत्सव २०२५ हा एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमाचा उद्देश महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, पराक्रम, संस्कृती रक्षण, स्वभाषा, स्वधर्म यासारख्या अनेक गुणांना उजाळा देऊन अनेकांच्या मनावर सुसंस्कार करणे, या दृष्टीने समाजमन घडविणे आणि शिवाजी महाराजांना विश्वविक्रमी मानवंदना देणे हा होता. यासाठी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष असलेले आणि युनेस्कोने जागतिक वारसास्थळ म्हणून घोषित केलेल्या बारा दुर्गांपैकी कोणत्याही एकाची प्रतिकृती अंगणात, सोसायटी, शाळेत, मैदानात तयार करून त्यासोबत फोटो घेऊन तो अमृत दुर्गोत्सव २०२५ च्या वेबसाईटवर अपलोड करायचा होता. सहभागी होणाऱ्या प्रत्येकास मा. मुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीचे अभिनंदन पत्र मिळणार होते.

अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांचे उत्तम नियोजन आणि अमृत कर्मचाऱ्यांच्या प्रचंड मेहनतीच्या जोरावर हा केवळ शासकीय उपक्रम न राहता त्याला लोकोत्सवाचे रूप प्राप्त झाले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद, शेजारील राज्ये, इतकेच काय अमेरिका, इंग्लंड, आखाती देशातून मिळालेला भावनिक प्रतिसाद यामुळे अमृत दुर्गोत्सवात प्रचंड प्रमाणात दुर्गांसोबत घेतलेले फोटो जमा झाले. ही संख्या इतकी प्रचंड होती की या गोष्टीची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड या विश्वविक्रमांची नोंदणी करणाऱ्या जगातील सर्वात प्रतिष्ठित संस्थेने घेतली.

मानवी हातांनी तयार केलेल्या प्रतिकृतींचा सर्वात मोठा डिजिटल फोटो अल्बम या श्रेणीमध्ये अमृत दुर्गोत्सवात विश्वविक्रम झाल्याचे प्रमाणपत्र गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे प्रतिनिधी प्रवीण पटेल यांच्या हस्ते अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांना सुपूर्द केले.

यावेळी बोलताना गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे अधिकृत पंच प्रवीण पटेल यांनी ही विश्वविक्रमाची कठीण तपासणी प्रक्रिया सर्वांपुढे मांडली. सुयोग्य चित्रे निवडणे, अस्पष्ट व दुबार चित्रांना बाद करणे आदी अनेक टप्पे चाललेल्या अतिशय क्लिष्ट प्रक्रियेतून जाऊन विश्वविक्रम प्रस्थापित होऊ शकला याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. दि. १० नोव्हेंबर म्हणजेच शिवप्रताप दिनाचे औचित्य साधून अमृत मुख्यालयात एका भव्य कार्यक्रमात गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे अधिकृत प्रमाणपत्र विजय जोशी यांना सुपूर्द करण्यात आले.

या विश्वविक्रमात सहकार्य करणारे सर्व शासकीय अधिकारी, सामाजिक नेतृत्व, दुर्गप्रेमी, विद्यार्थी, सर्व शिवप्रेमी, अमृत कर्मचारी यांचे विजय जोशी यांनी आभार मानले आहेत.

## शनिवारी पनवेलमध्ये साहित्यिकांचा गौरव सोहळा

**| पनवेल | प्रतिनिधी |**



रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल व पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी पनवेलमध्ये साहित्यिकांचा गौरव सोहळा आणि कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या समारंभासाठी महाराष्ट्रातील हास्य कवी अशोक नायगावकर, कवी अरुण म्हात्रे, गझलकार ए.के. शेख आदी उपस्थित राहणार आहेत. शनिवार, दि.१५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता पनवेलच्या मार्केटयार्ड येथील रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृह येथे समारंभ संपन्न होणार आहे. या सोहळ्यात लोकनेते माजी खासदार यांनी आपल्या ७५ व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल त्यांचा सत्कार तसेच साहित्यिकांचा सत्कार आणि कवी संमेलन संपन्न होणार आहे. सहभागी कवींना प्रमाणपत्र आणि स्मृतीचिन्ह आयोजकांच्यावतीने दिले जाणार आहे. या सोहळ्यासाठी आपण सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी, पनवेल शाखेचे अध्यक्ष सुभाष कुडके यांनी केले आहे.

## तरुणी बेपत्ता

**पनवेल** : नेहमीप्रमाणे भाजीपाला आणण्यासाठी नेरे येथे जाते असे सांगून घरातून निघून गेलेली एक तरुणी अद्याप घरी परत आली नाही म्हणून ती हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



या तरुणीचे नाव प्रीती यादव कांबळे (२०), रंग सावळा, उंची ५ फूट, बांधा मध्यम, नाकात डाव्या बाजूस पिवळ्या धातुची नथ, केस लांब काळे, अंगात नेसून लाल रंगाचा पंजाबी ड्रेस, सोबत मोबाईल फोन आहे. ती कियारा फार्म, शातीवन फाटा नेरे येथून नेहमीप्रमाणे भाजीपाला आणण्यासाठी नेरे येथे जाते असे सांगून घरातून निघून गेली, ती घरी परत आली नाही. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पो. हवा अमर भालसिंग यांच्याशी संपर्क साधावा.

# चरईखुर्द ग्रा.पं.च्या वेबसाईटचे लोकार्पण

**| तळा | प्रतिनिधी |**



**गटविकास अधिकारी महादेव शिंदे यांची उपस्थिती**

ग्रामपंचायतीच्या विविध शासकीय योजना, विविध दाखले, करवसुली, ग्रामपंचायतीमार्फत राबविले जाणारे सामाजिक, सांस्कृतिक व लोकाभिमुख कार्यक्रम, उपक्रम याची सर्वांना माहिती व्हावी याकरिता तळा तालुक्यातील प्रथम ग्रामपंचायत ठरलेल्या चरईखुर्द ग्रामपंचायतीच्या वेबसाईटचे लोकार्पण ग्रामपंचायत कार्यालय चरईखुर्द येथे पंचायत समितीचे गटविकास अधिकारी महादेव शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. वेबसाइट चालू करणारी चरईखुर्द ग्रामपंचायत ही तळा तालुक्यातून प्रथम ग्रामपंचायत ठरली आहे.

गटविकास अधिकारी महादेव शिंदे यांनी सांगितले की, या वेबसाईटमध्येचरईखुर्दग्रामपंचायतची माहिती ऑनलाईन पेजवर उपलब्ध आहे. स्कॅनर किंवा लिंक ओपन केल्यावर ग्रामपंचायतची संपूर्ण माहिती, झालेली कामे कार्यक्रम, ऑनलाईन अर्ज असेसमेंट, तक्रारी किंवा सूचना मेल करू शकता. तसेच अधिक माहिती उपलब्ध असेल असे त्यांनी सांगितले.

**मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार | सात आठवडे एनआयसीयूमध्ये उपचार**

# मुदतपूर्व बाळाची मृत्यूशी झुंज यशस्वी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

प्रसूतिपूर्व गुंतागुंतीमुळे ४१ वर्षीय महिलेची मुदतपूर्व प्रसूती करावी लागली. अवघ्या २८ व्या आठवड्यात बाळाचा जन्म झाला. त्याचे वजन केवळ ८०० ग्रॅम होते. मुदतपूर्व जन्म असल्याने त्या बाळाला अनेक शारीरिक समस्या जाणवत होत्या. या बाळावर खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार करून डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांनंतर अखेर त्या बाळाची मृत्यूशी झुंज यशस्वी ठरली.



खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटलमधील नवजात शिशु अतिदक्षता विभागात (एनआयसीयू) ७ आठवडे उपचार घेतल्यानंतर या बाळाच्या प्रकृतीत सुधारणा झाली आहे. बाळाला गंभीर श्वसन सिंड्रोम, सेप्सिस, श्वसनक्रियेत अडथळे येणे, अशक्तपणा, चयापचय समस्या तसेच हाडांचा आजार आणि ब्रोन्कोपल्मोनरी डिस्प्लेसिया (बीपीडी) यांचा सामना करावा लागला. मेडिकव्हर हॉस्पिटलचे नवजात शिशु तज्ज्ञ आणि एनआयसीयूचे इन्चार्ज डॉ. तन्मेष कुमार साहू यांच्या नेतृत्वाखाली टीमने ही गुंतागुंतीची केस हाताळली. आज हे बाळ सामान्य स्वासोच्छ्वास करत असून, स्तनपानाचाही स्वीकार करत आहे. त्याच्या वयानुसार विकासाचे टप्पे गाठत आहे.

खारघर येथील ४१ वर्षीय रहिवासी वृषाली पवार (रुग्णाचे नाव बदलले आहे) यांनी १४ ऑगस्ट २०२५ रोजी अकाली बाळाला जन्म दिला. गंभीर प्रीक्लेम्प्सिया आणि मागील सिझेरियनमुळे तसेच हाय रिस्क प्रेग्नेंसीमुळे २८ आठवड्यांतच अकाली प्रसूती करण्यात आली. बाळाच्या हृदयाची गती प्रतिमिनीट १०० बीट्सपेक्षा कमी आणि रक्त चाचण्यांमध्ये तीव्र श्वसन विकार आढळून आल्याने बाळाला त्वरित अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. डॉ. तन्मेष कुमार साहू यांनी सांगितले की, काही तासांतच बाळाला रेस्पिरेटरी डिस्ट्रेस सिंड्रोम (आरडीएस) असल्याचे निदान झाले, जो अकाली जन्मलेल्या बाळांमध्ये फुफ्फुसाचा एक गंभीर आजार आहे. बाळाला त्याकरिता विशेष थेरपी देण्यात आली. बाळाला दीर्घकालीन फुफ्फुसाच्या आजाराची सुरुवातीची लक्षणे दिसली म्हणून, क्लिनिकल प्रोटोकॉल्सनुसार, स्टिरॉइड थेरपी १० दिवसांसाठी सुरू करण्यात आली.

डॉ. साहू म्हणाले की, एनआयसीयूमध्ये असताना बाळाला सेप्सिसदेखील झाला आणि त्याच्यावर प्रगत अँटीबायोटिक्सच्या उपचार करण्यात आला. ४२ व्या दिवसानंतर बाळाला ऑक्सिजन सपोर्टवरून काढण्यात आले आणि ४५ व्या दिवसांनी तोंडावाटे आहार देण्यात आला आणि बाळाच्या आरोग्याबाबत हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला. उपचाराच्या ९ व्या दिवसापर्यंत, बाळाला श्वसनाचा आधार पूर्णपणे बंद करावा लागला आणि १ ऑक्टोबर २०२५ रोजी यशस्वीरित्या घरू सोडण्यात आले.

> "सुरुवातीला त्याची प्रकृती पाहून आम्हाला आमचे बाळ की वाचेल की नाही याची भीती वाटली. त्याला अशा अवस्थेत पाहणे आमच्यासाठी खूप त्रासदायक होते. परंतु मेडिकव्हरमधील डॉक्टर आणि परिचारिकांनी हार मानली नाही. त्यांनी आमच्या बाळाला नवे आयुष्य मिळवून दिले."
> – वृषाली पवार, बाळाची आई




## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाची कामं हातात घ्यायला हवी. आर्थिक उलाढालीत वाढ होईल. अपेक्षापूर्तीचं समाधान लाभेल.
- **वृषभ** : घेतलेल्या निर्णयावर ठाम रहा. कौटुंबिक बाबतीत अनपेक्षित घटना संभवतात. पुरेशी काळजी घ्या.
- **मिथुन** : वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. अनुभवींचं मार्गदर्शन कामी येईल. गेलेल्या संधी पुन्हा लाभतील.
- **कर्क** : कार्यक्षेत्रात छोट्या-मोठ्या अडचणी येतील. दीर्घकालीन गुंतवणूक लाभदायक ठरेल. चिंता नसावी.
- **सिंह** : आर्थिक स्थैर्य वाढीस लागेल. सत्कर्माचं उत्तम फळ प्राप्त होईल. जुनी येणी सहज वसूल होतील.
- **कन्या** : आर्थिक आमिषांना बळी पडू नका. मनाविरूध्द घटना संभवतात. घरगुती वाद वेळीच टाळावेत.
- **तूळ** : आर्थिक आवक समाधानकारक राहील. उत्साहानं कार्यरत रहाल. खाण्या-पिण्यावर नियंत्रण ठेवा.
- **वृश्चिक** : तडजोडीचं धोरण हिताचं ठरेल. नोकरी-व्यवसायात स्पर्धा वाढेल. अनावश्यक खर्च कमी करावा.
- **धनु** : आर्थिक नियोजन अचूक व्हावं. थोरामोठ्यांची मर्जी संपादन कराल. कला-गुणांचा विकास होईल.
- **मकर** : सरकारी प्रलंबित कामं मार्गी लागतील. वैवाहिक जीवनात सुसंवाद ठेवावा. प्रवासाचे योग आहेत.
- **कुंभ** : कार्यक्षेत्रात प्रगती होईल. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. आर्थिक आवक उत्तम राहणार आहे.
- **मीन** : आर्थिक बाबतीत चढ-उतार होतील. कठोर परिश्रमातून यश मिळवू शकाल. बाकी चिंता नसावी.

स्टाईल स्टेटमेंट

## असा निवडा मॅक्सी ड्रेस

मॅक्सी ड्रेसमुळे इंडो वेस्टर्न लूक मिळून जातो. पण लांबुळका मॅक्सी ड्रेस उंच मुलींनाच शोभून दिसतो, असा बुटक्या महिलांचा गैरसमज असतो. योग्य पद्धतीने कॅरी केला तर उंची कमी असूनही हा प्रकार छान दिसू शकतो.

* साईड किंवा फ्रंट स्लिटवाल्या मॅक्सी ड्रेसची निवड करा. यात पाय थोडे दिसले तरी तुम्ही जास्त उंच दिसाल. आपल्या आवडीनुसार स्लिटच्या लांबीची निवड करा. * मॅक्सी ड्रेससोबत छानसा बेल्ट कॅरी करता येईल. बेल्टमुळे तुमचं शरीर सम भागात विभागलं जाईल. यामुळे तुम्ही उंच दिसू शकता. बुटक्या युवतींनी हायवेस्ट बेल्टची निवड करावी. * मॅक्सी ड्रेस खूप घट्ट नसावा तसंच खूप ढगळही नसावा. ढगळ कपड्यांमुळे तुम्ही जास्त बुटक्या दिसता. मॅक्सी ड्रेस घेताना फिटिंगकडे नीट लक्ष द्या. * कमी उंचीच्या मुलींनी उभ्या रेघा असणाऱ्या मॅक्सी ड्रेसची निवड करायला हवी. प्रिंटेड मॅक्सी ड्रेस घ्यायचा असेल तर छोट्या प्रिंट्सची निवड करावी. * गडद रंगाच्या किंवा ब्लॅक अँड व्हाईट मॅक्सी ड्रेसचीही निवड करता येईल. हे कॉंबिनेशन खूप छान दिसतं. काळा, रॉयल ब्लू, ग्रीन, रेड असे गडद रंगाचे मॅक्सी ड्रेस विशेष खुलून दिसतात.

दिनविशेष

## १४ नोव्हेंबर

**राष्ट्रीय बाल दिन, जागतिक मधुमेह दिन**

१८८९ : भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांचा जन्मदिवस.
१९२४ : प्रख्यात कथकनर्तिका रोहिणी भाटे यांचा जन्म.
१९४२ : आसामी साहित्यिक, कवयित्री, संपादिका इंदिरा गोस्वामी यांचा जन्म.
१९७१ : 'मरीनर-९' हे अंतराळयान मंगळाच्या कक्षेत पोहोचलं.
२०१३ : वानखेडे स्टेडियमवर सचिन तेंडुलकरला हृद्य निरोप. सचिनचा कसोटी क्रिकेटला निरोप. सचिनवरील टपाल तिकीटाचं अनावरण.

सफर देशांची

## बेटांचा देश : न्यूझीलंड

न्यूझीलंड म्हणजे बेटांचा एक समूह आहे. बेटांवर बरेच डोंगर आहेत. पॅसिफिक महासागरात वसलेला हा देश ऑस्ट्रेलियाचा शेजारी आहे. या दोन देशांमध्ये १६०० किलोमीटरचं अंतर आहे. न्यूझीलंडमध्ये ५० पेक्षा जास्त ज्वालामुखी आहेत. २३ दशलक्ष वर्षांपूर्वी ज्वालामुखीच्या उद्रेकातूनच या बेटांची निर्मिती झाली असल्याचं तज्ज्ञ सांगतात. इथलं निसर्गसौंदर्य डोळ्यात भरण्यासारखं आहे. दक्षिण बेटावर या देशातील सर्वात मोठं 'माउंट कूक' हे शिखर आहे. वेलिंग्टन ही न्यूझीलंडची राजधानी आहे तर न्यूझीलंड डॉलर हे इथलं चलन. इथले ८६ टक्के लोक शहरांमध्ये राहतात. ऑकलंड, ख्राईस्टचर्च ही इथली महत्त्वाची शहरं आहेत. रग्बी हा इथला लोकप्रिय खेळ आहे. इथे क्रिकेटलाही मोठी लोकप्रियता मिळाली आहे. न्यूझीलंडमध्ये लोकशाही आहे. किवी फ्रूट, वाईन, बटर, लॅम्ब यांची निर्यात केली जाते. १९४७ मध्ये हा देश इंग्रजांकडून स्वतंत्र झाला. महिलांना मतदानाचा अधिकार देणारा न्यूझीलंड हा पहिला देश. १८९३ मध्ये इथल्या महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला. इथे विविध प्रजातींचे प्राणी पहायला मिळतात. इतकंच नाही तर काही प्रजाती फक्त न्यूझीलंडमध्येच आढळतात.

आरोग्यमंत्र

## जेवण न केल्याचे दुष्परिणाम

खूप काम आहे, असं म्हणत अनेकजण जेवण टाळतात. परंतु, आरोग्यासाठी हे अतिशय घातक ठरू शकतं. यामुळे शरीरात विविध प्रकारचे आजार निर्माण होऊ शकतात. कार्यक्षमतेवर वाईट परिणाम होऊ शकतो. काही व्यक्ती वजन कमी करण्यासाठी जेवण टाळतात. पण, आरोग्यासाठी हे घातक आहे. जेवण वेळेवर न केल्याचे हे आहेत दुष्परिणाम-

१. वेळेत जेवण न केल्यानं चयापचय प्रक्रिया बिघडते. यामुळे फॅट्स जमा होतात. वजन वाढण्यास सुरुवात होते.



२. भुकेलं राहिल्यानं अशक्तपणा येऊन अनेकदा भोवळ येते.

३. भुकेल्या अवस्थेत शरीरात कोर्टिसोल नावाच्या हार्मोन्समध्ये वाढ होते. यामुळे तणाव जाणवतो.

४. वजन घटवायचं असल्यास पौष्टिक खा आणि काही वेळेच्या समप्रमाणात अंतरानं खात राहा. अन्यथा, विविध आजार शरीरात शिरकाव करू शकतात.

५. योग्य आहार आणि व्यायाम वजन नियंत्रणात ठेवायचं असेल तर योग्य-पौष्टिक आहार घ्या आणि व्यायाम करा.

६. योग्य प्रमाणात आणि वेळेत जेवण करा. अन्यथा, रकातली साखरेची पातळी खालावते.

७. भुकेमुळे जास्त चिडचिड होते.

### पंचांग

**शुक्रवार, १४ नोव्हेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
कार्तिक कृ. १० (बालदिन),
चंद्रराशी : सिंह,
नक्षत्र : पू. फाल्गुनी, योग : वैधृति,
सूर्योदय ६.४७, सूर्यास्त ५.५९

### फॉरवर्डस

**लक़ीरें क़भी मामूली नहीं होतीं.. ये माथें पर फ़िक्र. हथेलीं पर तक़दीर...**

**जमीन पर बटवारा.. रिश्तों में दरार कर देतीं हैं...!**

### भटकंती

तुम्हाला ट्रेकिंग आवडतं का? भारतात ट्रेकिंगची बरीच ठिकाणं आहेत. अर्थात ती शोधून काढावी लागतात. काही ठिकाणी गेल्यावर तुम्हाला ट्रेकिंगचा भन्नाट अनुभव मिळू शकतो. अविस्मरणीय ठरू शकणाऱ्या काही ट्रेक्सविषयी...

लडाखमधल्या झंस्कार भागात छादार किंवा फ्रोजन झंस्कार रिव्हर ट्रेक आहे. इथे तुम्हाला थरारक अनुभव मिळू शकतो. १०५ किलोमीटरच्या या ट्रेकमध्ये तुम्ही लडाखी संस्कृतीची जवळून ओळख करून घेऊ शकता. जानेवारी आणि फेब्रुवारी हा काळ या ट्रेकसाठी बेस्ट आहे. या ट्रेकसाठी १३ दिवस लागतील.

**(क्रमशः)**

करिअरवाटा

## नोकरी शोधताना...

सध्या नोकरीसाठी ऑनलाईन अर्ज केला जातो. बऱ्याच जॉब पोर्टल्सवर रेझ्युमे अपडेट केला जातो. नोकरी ऑनलाईन शोधणं हा सोयीचा मार्ग असतो. अर्ज ऑनलाईन पोस्ट करून अधिकाधिक कंपन्यांपर्यंत पोहोचणं शक्य आहे. मात्र ऑनलाईन नोकरी शोधताना काही गोष्टींकडे लक्षही द्यायला हवं.



* ऑनलाईन जॉब शोधताना सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे उपयुक्त वेबसाईटची यादी बनवणं. कंपनी तुमच्या अपेक्षेप्रमाणे असल्याची खात्री करून मगच अर्ज पाठवावा. इंटरनेटवर नोकरी देऊ करणाऱ्या अनेक कंपन्या असतात. त्यांची विश्वासार्हता जोखून मगच अर्ज पाठवा.

* जॉबसाईट शोधताना लोकेशनकडेही लक्ष ठेवा. कंपनी नेमकी कुठं आहे, तुम्हाला तिथं जाणं शक्य आहे का, त्या शहरातली लाईफस्टाईल झेपेल का याचा आधीच विचार केलेला बरा. सर्व बाबी पटल्यावरच अर्ज करणं चांगलं.

* रोज मेल चेक करण्याची सवय ठेवा. खास करून जॉब अॅलर्टसकडे लक्ष द्या.

खेचाखेची

### ढवळाढवळ

मी लिफ्ट मध्ये एका लहान मुलाला आईस्क्रिम खाताना बघितलं. त्याची काळजी वाटून मी त्याला सहज बोललो, आज खूप थंडी आहे हे आईस्क्रिम खाऊन तू आजारी पडशील!
तो मुलगा उत्तरला, माझी आजी १०३ वर्षांपर्यंत जिवंत राहिली.
मी विचारलं, आइस्क्रिम खाल्यामुळे?
तो म्हणाला, नाही, कारण तिने कधीच दुसऱ्याच्या कामामध्ये नाक खुपसले नाही!

वेगळं काही

परदेशात ताणतणावाने ग्रस्त लोक कुत्रे भाड्याने आणतात. ताण कमी होईपर्यंत या कुत्र्यांसोबत वेळ घालवतात. लवकरच भारतातही हा प्रकार प्रचलित होण्याची शक्यता आहे. जयपूरचे श्वान व्यवहार तज्ज्ञ वीरेन शर्मा देशभरातल्या महानगरांमध्ये १०० 'मॅड अबाउट डॉग्ज' केंद्रे उघडत आहेत. इथे विविध प्रजातींचे कुत्रे आणि इतर सोयीसुविधाही उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. मुंबई, दिल्ली, बंगळूरूसारख्या शहरांमध्ये डॉग डे आउटसारखी सुविधाही मिळणार आहे. कुत्रे पाळून त्यांची देखभाल करण्याइतका वेळ लोकांकडे नसतो. अनेक जण इच्छा असूनही प्राणी पाळू शकत नाहीत, अशांना कुत्रे भाड्याने घेऊन आपली हौस भागवता येईल.

स्मार्ट टिप्स

## देखभाल भरजरी साड्यांची...

विविध प्रसंगांसाठी आपण साड्या खरेदी करतो. अगदी हौसेने नेसतो. जरीच्या, वर्कवाल्या साड्यांसाठी मोठी रक्कमही मोजतो. अशा साड्या विशिष्ट प्रसंगीच नेसल्या जातात. त्यामुळे अशा महागाईच्या, भरजरी साड्यांची विशेष देखभाल करायला हवी. या साड्यांची देखभाल कशी करायची, याविषयी...



* भरजरी सिल्कच्या साड्यांना अधूनमधून ऊन दाखवावं लागतं. यासाठी या साड्या काही तास कोवळ्या उन्हात ठेवा. मात्र कडक ऊन टाळा. साड्यांना ऊन लागल्यामुळे बुरशी लागत नाही. तसंच बराच काळ बंदिस्त राहिल्याने लागलेला वासही निघून जातो. साड्या पुन्हा जागेवर ठेवताना घडी बदला. यामुळे जर खराब होत नाही.

* आवडीच्या जरीच्या साडीची चमक कमी होत असेल तर घाबरून जाऊ नका. ही चमक तुम्ही घरच्या घरी परत मिळवू शकता. यासाठी बादलीभर पाण्यात पाव कप व्हिनेगर घाला. यात साडी भिजवून ठेवा. काही वेळाने साडी साध्या पाण्याने नीट धुवा. यामुळे साडीची चमक टिकून राहील.

## सुडोकू २७


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ५ | | | ९ | | ८ | | |
| ३ | ९ | | | | | | ५ | |
| | ८ | ७ | | | ४ | | | |
| ४ | | | ७ | | ८ | | | ५ |
| | ७ | ८ | | ५ | | १ | ६ | |
| १ | | | ९ | | २ | | | ८ |
| | | | ३ | | | ५ | २ | |
| | १ | | | | | | ९ | ६ |
| | | ६ | | ४ | | | ८ | ७ |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू २६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ४ | ७ | ५ | २ | ५ | ८ | ३ | १ |
| १ | ५ | ३ | ८ | ४ | ९ | ७ | २ | ६ |
| २ | ८ | ६ | ३ | ७ | १ | ४ | ५ | ९ |
| ४ | ९ | ८ | १ | ३ | ७ | २ | ६ | ५ |
| ५ | ७ | २ | ९ | ६ | ४ | ३ | १ | ८ |
| ६ | ३ | १ | २ | ५ | ८ | ९ | ४ | ७ |
| ८ | ६ | ५ | ४ | ९ | ३ | १ | ७ | २ |
| ३ | २ | ९ | ७ | १ | ५ | ६ | ८ | ४ |
| ७ | १ | ४ | ६ | ८ | २ | ५ | ९ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक २७



**आडवे शब्द :-**
१) मुक्तता
३) मुलांच्या गोष्टीतील शर्यतीत भाग घेणारे दोन प्राणी
६) अडथळा, प्रतिबंध
८) पायाचे गुडघ्याखालचे उभे हाड
९) झेंडा
१०) उन्हाळ्यात पिकणारे एक वेलवर्गीय फळ
१२) नाजूक भरतकाम
१३) काही काळापुरता हंगामी
१६) पटुत्व, कसब
१७) घोडे बांधण्याची जागा
१८) हवेचा दाब मोजण्याचे यंत्र
२१) इंद्रिय, गात्र, घटक
२२) फणसातील मगज
२३) टवटवीत
२५) शर्त, परंतु
२६) जमीन
२६अ) भयानक
२९) सगळा, अवघा
३०) सरस्वती
३१) मत्स्य
३३) बातमीपत्र
३५) अन्नमार्ग, घसा
३७) फार परिश्रमाने, महत्प्रयासाने
४०) हिंदुस्थान
४२) गर्दभ, खर
४३) उत्कर्षाचा काळ
४४) नवरा
४७) हत्ती
४९) पाणी
५१) तापापूर्वीचे अंग मोडून येणे
५४) जिवलग मित्र
५५) पाहिजे, वायू
५६) शत्रुच्या नाशाचे मंत्र तंत्र
५७) उगाच
५८) अथवा, किंवा

**उभे शब्द :-**
१) डोंगराचे उभे टोक
२) कर्नाटकी भाषा
३) प्रभात
४) ** बुद्धी नाठी
५) शंकराचे एक नाव
६) आतापर्यंत
७) बांगड्यांचा व्यवसाय करणारा
११) सध्याचे चालू युग
१२) त्रासदायक बडबड
१४) रात्रीचे आकाश
१५) मयूर
१६) पातक
१७) एक चतुर्थांश भागाचा पाढा
१९) पुष्कळ
२०) नशा आणणारा
२१) इंद्राची नगरी
२४) कशा प्रकारचा
२५) दुसऱ्याचे उपकार
२७) ह्या वर्षी
२८) लक्ष्मीचे एक नाव
३०) विद्यालय
३२) वर्षानुवर्षे
३४) शोध, तपास
३५) ऐटीत चालणारी स्त्री
३६) खाटीक
३७) दक्ष
३८) रोज, सदोदित
३९) धान्य साठवण्याची जागा
४०) हमाल
४१) युवक
४५) एक कालवण
४६) चाकर
४८) कणीदार पीठ
५०) सुट्टी
५२) पूर्ण भरतीची वेळ
५३) उत्सव

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# एमसीएत निवडणुकीत पवार गटाचे वर्चस्व

## उपाध्यक्षपदी जितेंद्र आव्हाडांची बाजी, कार्यकारिणी सदस्यपदी मिलिंद नार्वेकरांची निवड

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या कार्यकारी समितीची त्रैवार्षिक निवडणूक बुधवार (दि.१२) पार रोजी पडली. या निवडणूकीत मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या उपाध्यक्ष पदी जितेंद्र आव्हाड यांची निवड झाली आहे. आव्हाड यांनी नवीन शेट्टी यांचा मोठ्या फरकाने पराभव केला. तर एमसीएच्या कार्यकारिणी सदस्यपदी मिलिंद नार्वेकर यांची नियक्ती झाली आहे. एमसीएच्या सचिव पदी उमेश खानविलकर यांची वर्णी लागली आहे, तर संयुक्त सचिवपदी निलेश भोसले आणि खजीनदार पदी अरमान मलिक निवडून आले आहेत.




मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीसाठी बुधवारी मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या ३७८ मतदारांपैकी ३६२ मतदारांनी आपला हक्क बजावला होता. तर शिवसेना उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मतदान केले नसल्याची माहिती मिळाली होती. हे मतदान पार पडल्यानंतर लगेचच मतमोजणी घेण्यात आली होती.

मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) अध्यक्षपदी अजिंक्य नाईक यांची बिनविरोध निवड झाली आहे. यानंतर आज (बुधवारी) ॲपेक्स कौन्सिल आणि टी-२० मुंबई गव्हर्निंग कौन्सिलच्या निवडणुकीचे मतदान पार पडले. उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार तसेच अन्य पदासाठी हे मतदान पार पडले.

एमसीएच्या निवडणुकीत राजकीय नेत्यांचा सहभाग घेतल्याने रंगत वाढल्याचे चित्र दिसून आले. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांचे चिरंजीव विहंग सरनाईक, भाजपाचे आ. प्रसाद लाड, राष्ट्रवादी काँग्रेस (शप) आ. जितेंद्र आव्हाड आणि शिवसेना (ठाकरे) मिलिंद नार्वेकर या राजकीय नेत्यांनी निवडणुकीत प्रत्यक्ष सहभाग घेतला. अध्यक्षपदाची निवडणूक बिनविरोध झाली असली तरी बाकीच्या पदांसाठी निवडणुकीत कोण बाजी मारणार? याची उत्सुकता होती. पण अखेर यात अजिंक्य नाईक त्यांच्या पॅनेलचे १२ उमेदवार विजयी झाले आहेत. तर जितेंद्र आव्हाड हे उपाध्यक्षपदी विजयी झाले आहेत.

### अनेक दिग्गजांनी केले मतदान

बुधवारी दुपारी ३.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत मतदान पार पडले. तर या निवडणुकीत एकूण ३७८ मतदार होते. यामध्ये माजी खेळाडू ५२ आहेत. यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार, रामदास आठवले, आ. जितेंद्र आव्हाड, मिलिंद नार्वेकर, प्रसाद लाड, नाना पटोले, अदिती तटकरे, आशिष शेलार, माजी क्रिकेटपटू सुनील गावस्कर, संजय मांजरेकर, वसीम जाफर आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरे आदी दिग्गजांनी मतदान केलं. तसंच एकूण ३३० पेक्षा अधिक सभासदांनी मतदान केले. दरम्यान, मतदान पार पडल्यानंतर साधारण सायंकाळी ६.३० ते ७ वाजल्यानंतर मतमोजणीस सुरुवात झाली.

> आमच्या मैदान क्लब्स, सचिव आणि प्रत्येक महिला व पुरुष क्रिकेटपटूंच्या एकत्रित परिश्रमांची विजयगाथा आहे. हा विजय संपूर्ण मुंबई क्रिकेट परिवाराचा आहे. आपल्या शहराच्या क्रिकेट परंपरेचा अभिमान आहे.
>
> – अध्यक्ष अजिंक्य नाईक

### मुख्य पदाधिकारांसाठी निवडणूक निकाल

१) अध्यक्ष – अजिंक्य नाईक – बिनविरोध

२) उपाध्यक्ष – जितेंद्र आव्हाड विरुद्ध नवीन शेट्टी. यात जितेंद्र आव्हाड एकूण २०१ मते मिळवून विजयी तर नवीन शेट्टी यांना १५५ मते मिळाली.

३) सचिव – शाह आलम शेख विरुद्ध उन्मेष खानविलकर लढत. यात उन्मेष खानविलकर हे विजयी झाले. त्यांना २२७ मते मिळाली तर शाह आलम शेख यांना १२९ मते मिळाली.

४) सहसचिव – गौरव पयाडे विरुद्ध निलेश भोसले लढत होती. यात निलेश भोसले यांचा विजय झाला.

५) खजिनदार – अर्मान मलिक विरुद्ध सुरेंद्र शेवाळे यांच्यात लढत होती. यात अर्मान मलिक यांचा विजय झाला.

---

# निवडक

## पनवेलच्या पार्थकडून सुवर्णवेध

**पनवेल :** पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात विज्ञान शाखेत शिकणाऱ्या पार्थ मानेने मुंबई विद्यापीठातील थलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. मुंबईतील मातब्बर खेळाडूंना टक्कर देत पार्थने मिळवलेल्या यशाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. पार्थच्या सुवर्ण कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी कौतुक केले आहे. त्याच्या जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर लहान वयातच खूप मोठ्या यशाला गवसणी घातली आहे. त्याच्या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन बाळाराम पाटील, महेंद्र घरत, तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर यांनी विशेष कौतुक केले आहे.



## प्रिषा गोविलकरची राज्यस्तरावर निवड

**माणगाव :** माणगाव शहरातील माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ संचालित मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील इयत्ता चौथीतील विद्यार्थीनी प्रिषा गोविलकर हिने 'वुशु' या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक पटकावत आपल्या शाळेचे आणि माणगावचे नाव राज्यस्तरावर झळकावले आहे. रोहा येथील क्रीडा संकुलात नुकत्याच झालेल्या वुशु स्पर्धेत तब्बल ५६ खेळाडूंमध्ये प्रिषा हिने उल्लेखनीय वर्चस्व गाजवत सुवर्णपदक जिंकले. तिला मंदार चवरकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या कुशल प्रशिक्षणाखाली प्रिषाने आपले कौशल्य अधिक प्रगल्भ केले. ति यशाबद्दल अरुण पवार यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे संचालक, प्राचार्या, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांनी प्रिषाचे मनःपूर्वक अभिनंदन करत तिच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी संस्थेच्या प्राचार्या निशिगंधा मयेकर, शिक्षकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

## आयडियल चषक १५ नोव्हेंबरपासून

**मुंबई :** बाल दिनानिमित्त आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे एलआयसी पुरस्कृत एलआयसी-आयडियल चषक १४ वर्षांखालील



बुद्धिबळ स्पर्धा १५ नोव्हेंबरला आणि सर्वांसाठी खुली बुद्धिबळ स्पर्धा १६ नोव्हेंबर रोजी परळ येथील आरएमएमएस सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. १४ वर्षांखालील मुलामुलींच्या बुद्धिबळ स्पर्धेसाठी एकूण १२० पुरस्कार असून खुल्या बुद्धिबळ स्पर्धेसाठी एकूण २५ रोख पुरस्कारांसह प्रथम पुरस्कार रोख रुपये पाच हजारांसह आकर्षक एलआयसी-आयडियल चषक आहे. तसेच खुल्या स्पर्धेतसुद्धा १३ वर्षांखालील विविध वयोगटासाठी विशेष बक्षिसे दिली जाणार आहेत. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी राजाबाबू गजेंगी (९३२४७ १९२९९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## श्रीलंकेचा मायदेशी परतण्याचा निर्णय

**नवी दिल्ली :** श्रीलंका संघ तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी पाकिस्तान दौऱ्यावर आला आहे. या दौऱ्यातला पहिला वनडे सामना हा मंगळवारी पार पडला होता. या सामन्यात पाकिस्तानने ६ विकेटने सामना जिंकला होता. यानंतर पाकिस्तानच्या



इस्लामाबादमध्ये बॉम्बस्फोटाची घटना घडली आहे. या घटनेत १२ जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेने श्रीलंकन संघ प्रचंड घाबरलेला आहे आणि संघातील ८ खेळाडूंनी स्पर्धा अर्ध्यावर सोडून मायदेशी परतण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पाकिस्तानला मोठा धक्का बसला त्यांची नाचक्की झाली आहे. श्रीलंका आणि पाकिस्तान यांच्या वनडे मालिका सूरू असताना इस्लामाबदमध्ये बॉम्बस्फोटाची घटना घडली होती. या घटनेत १२ जणांचा मृत्यू झाला होता, तर अनेकजण जखमी झाली होती. या हल्ल्यानंतर श्रीलंकन संघात एकच घाबरगुंडी उडाली आहे. त्यामुळे श्रीलंकेच्या क्रिकेट संघातील आठ खेळाडू गुरुवारी मायदेशी परतण्याचा निर्णय घेतला आहे.



## भारताची विजयी सलामी

**नवी दिल्ली :** नवी दिल्ली येथे अंध महिला टि-२० विश्वचषकाची सुरवात झाली आहे. या पहिल्या अंध महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने श्रीलंका संघाला १० गडी राखून पराभूत करत विजयी सुरुवात केली आहे. या सामन्यात सोलापूरच्या गंगा कदम हिने गोलंदाजी, क्षेत्ररक्षणात जोरदार खेळाचे प्रदर्शन करत सामन्यातील सामनावीराचा पुरस्कार पटकावला. सुरू असलेल्या पहिल्या वहिल्या अंध महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेतील पहिल्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना श्रीलंका संघ १३.३ षटकांत सर्वबाद केवळ ४१ धावा करू शकला. यामध्ये गंगा कदम हिने १ षटकांत केवळ १ धाव देत १ बळी मिळवला. गंगाच्या उत्कृष्ट क्षेत्ररक्षणामुळे श्रीलंकेचे ५ खेळाडू धावबाद झाले. भारतीय फलंदाजांनी अवघ्या तीन षटकात ४३ धावा करत विजयश्री प्राप्त केली. यामध्ये कर्णधार दीपिका हिने ४ चौकारांच्या मदतीने २६ धावा केल्या, तिला अनिता ठाकूर हिने ६ चेंडूत ३ चौकारांसह नाबाद १५ धावा करत चांगली साथ दिली. उत्कृष्ट गोलंदाजी आणि अप्रतिम क्षेत्ररक्षणामुळे गंगा कदम हिला सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

---

### मजगावच्या शिवभक्त मित्र मंडळाच्या

# किल्ले बांधणी स्पर्धेचा निकाल जाहीर

**। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील मजगांवच्या श्री शिवभक्त मित्र मंडळाने विद्यार्थ्यांसाठी दिवाळीच्या सुट्टीत तालुकास्तरीय किल्ले बांधणी स्पर्धा आयोजित केली होती. या किल्ले बांधणी स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा मजगावच्या विठ्ठल मंदिरात नुकताच पार पडला. या कार्यक्रमास विघ्नेश माळी, ऋषीकांत डोंगरीकर, यशवंत पाटील, जयेंद्र काबूकर, केतन नाक्ती इतर मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेतील विजेते पुढील प्रमाणे छोटा गट -प्रथम क्रमांक-पार्थव भेर्ले किल्ले पन्हाळा (वडघर )

द्वितीय क्रमांक -अर्णव



काटकर- किल्ले -प्रतापगड (वळके) तृतीय क्रमांक- अर्चित ठाकूर -किल्ले पद्मदुर्ग (खारिकवाडा) उत्तेजनार्थ-हिमांशू पाटील - सिंधुदुर्ग (आदाड ) कुशल गुंड- पद्मदुर्ग (आदाड) मोठा गट-प्रथम क्रमांक- शौर्य मोकल - किल्ले रायगड (खार आंबोली) द्वितीय क्रमांक- सोहम भेर्ले - पद्मदुर्ग (वडघर) तृतीय क्रमांक विभागून - आर्यन मसाल किल्ले पन्हाळा (मसाल गल्ली मुरुड)- वेदांत तळेकर - किल्ले राजगड ( कुंभार वाडा - यश पाटील किल्ले जंजिरा (साळाव) उत्तेजनार्थ- दर्शन कमाने राजगड ( खार आंबोली) कुलाबकर किल्ले पद्मदुर्ग (मुरुड कोळीवाडा)

मुरुड पोलिसांनी आयोजित केलेल्या एकता मॅरेथॉन स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या सर्वेश काबुकर व हरियाणा व धुळे येथे झालेल्या कराटे स्पर्धेत रेश्मा भोईर व काव्या नाक्ती यांचा सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमास शिवभक्त मित्र मंडळाचे अध्यक्ष नाथाभाऊ गिरणेकर, सिध्देश बेडेकर, सुबोध पाटील, नितीन मानाजी, दिपेश पाटील, सार्थक शेडगे, शनिकेत भोईर व इतर सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशिष बुल्लु यांनी केले तर आभार नितीन मानाजी यांनी मानले.

# मानसी हांदेला सुवर्णपदक

**। लांजा । वृत्तसंस्था ।**

तालुक्यातील रिंगणे येथील मानसी हांदे हिने राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. महाराष्ट्र संघातर्फे ती या स्पर्धेत सहभागी झाली होती. ती सध्या मुंबईतील जोगेश्वरी येथील शामनगर येथे राहते.

मानसी झुनझुनवाला महाविद्यालयातून पदवी शिक्षण घेतले असून, कबड्डी हा तिचा आवडता खेळ आहे; मात्र कोरोना काळात कबड्डीचा सराव बंद झाला; मात्र तिने व्यायाम सुरू ठेवला. तिचा सराव पॉवरलिफ्टिंग खेळास उपयुक्त झाला. त्याच जोरावर तिने राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. अशाप्रकारे राष्ट्रीय पातळीवर सुवर्णपदक पटकावणाऱ्या मानसीचे कौतुक होत आहे.

मानसीच्या यशाबद्दल राजापूर-लांजा तालुका नागरिक संघाचे अध्यक्ष सुभाष लाड यांनी तिचे अभिनंदन केले आहे. या वेळी शांताराम पाटकर, गणेश चव्हाण व रमेश काटकर हे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच तिच्या मित्र-मैत्रीणीने अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

---

# लक्ष्य सेन-प्रणोयची विजयी सलामी



**। जपान । वृत्तसंस्था ।**

लक्ष्य सेन व एच. एस. प्रणोय या अनुभवी खेळाडूंनी प्रतिस्पर्धी खेळाडूंवर विजय साकारत जपान मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेतील पुरुष एकेरी विभागात पुढल्या फेरीत प्रवेश केला, मात्र भारताच्या इतर खेळाडूंना पराभवाचा सामना करावा लागला. त्यांचे आव्हान संपुष्टात आले. लक्ष्य सेन याच्यासमोर जपानच्या कोकी वातानाबे याचे आव्हान होते. लक्ष्य सेन याने कोकी वातानाबे याच्यावर २१-१२, २१-१६ असा सरळ दोन गेममध्ये पराभव केला. भारतीय खेळाडूने ३९ मिनिटांमध्ये विजयाला गवसणी घातली. एच. एस. प्रणोय आणि जुन हाओ लिओंग यांच्यामध्ये रोमहर्षक लढत पार पडली. जुन हाओ लिओंग याने पहिला गेम २१-१६ असा आपल्या नावावर करीत १-० अशी आघाडी घेतली. एच. एस. प्रणोय याने मात्र झोकात पुनरागमन करताना पुढील दोन्ही गेममध्ये बाजी मारली. त्याने दुसरा गेम २१-१३ असा जिंकला.

# महावितरणाच्या क्रिकेट सामन्यात मुख्यालय संघाचा रोमहर्षक विजय

**। अमरावती । प्रतिनिधी ।**

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रीडासंकुलात सुरु असलेल्या महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रदर्शनी क्रिकेट सामन्यात बुधवारी (दि.१२) मुंबई मुख्यालय संघाने १२ षटकांमध्ये ९६ धावांचे आव्हान देत नागपूर प्रादेशिक संघाला ९० धावांवर रोखत या सामन्यात सहा धावांनी विजय मिळवला.

मुंबई मुख्यालयाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी स्वीकारली. १२ षटकांमध्ये ६ बाद ९६ धावा केल्या. यात प्रसाद रेशमे (१३



धावा), वैभव थोरात (१८ धावा) व प्रमोद खुळे (१७ धावा) यांनी धावसंख्येला आकार दिला. मात्र नागपूर प्रादेशिक संघाने १८ धावा अतिरिक्त दिल्याने मुख्यालय संघाची सामन्यावरील पकड मजबूत झाली.

नागपूर प्रादेशिक संघाने आव्हान स्विकारून सावध पवित्रा घेत फलंदाजी सुरू केली. यात संजय वाकडे (१८ धावा) तर प्रफुल लांडे (१५ धावा) यांनी चांगली भागिदारी करीत लक्ष्याकडे वाटचाल सुरू केली. अमरावतीचे अशोक साळुंके यांनी ७ धावांचे योगदान देत संघाला विजयाकडे नेले. नागपूर प्रादेशिक संघ शेवटच्या षटकात केवळ पाच धावा करू शकला आणि मुख्यालय संघाने सहा धावांनी विजय मिळवला.

याप्रसंगी राजेंद्र पांडे, सुनील पावरा व माणिक गवळी, बजरंग सुर्यवंशी, सुमेध कोलते सुहास रंगारी, दिलीप दोडके, राजेश नाईक रूपेश देशमुख आदीं उपस्थित होते.

## सन्मित कोथमिरेचे झुंजार द्विशतक


**ठाणे :** सन्मित कोथमिरेचे झुंजार द्विशतक आणि दोन बहुमोल भागीदाऱ्यांमुळे युनियन क्रिकेट अकॅडमीने पहिल्या डावात क्लब कमिटी आयोजित तिसऱ्या शताब्दी चषक १४ वर्षांखालील एमसीए निवड चाचणी स्पर्धेत विजेतेपदाची हॅटट्रिक साधली. युनायटेड क्रिकेट क्लब असोसिएशन विरुद्धच्या अंतिम सामन्यात बिनबाद एक धावेवरून पुढे खेळताना सन्मितने आपली छाप पाडली. सन्मितने ३४ चौकारांसह नाबाद २१९ धावा करत संघाला मोठी आघाडी मिळवून देण्यात मोलाचे योगदान दिले.

### एमसीए आयोजित क्रिकेट स्पर्धा

# आरव, देवची दमदार शतके

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चौदा वर्षाखालील आंतरजिल्हा दोन दिवसीय निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा सलामीचा तंत्रसुद्धा फलंदाज आरव बरळ व अष्टपैलू खेळाडू देव सिंग यांनी दमदार फलंदाजी करत स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात शतके झळकावत संघाला मोठा विजय मिळवून दिला आहे. पुणे येथील सी. पी मैदानावर रायगड विरुद्ध दक्षिण विभागाचा ग्रुपमधील पहिला सामना खेळण्यात आला.






त्यामध्ये रायगडच्या संघाने दमदार खेळाचे प्रदर्शन करत एक डाव व १५७ धावाने दक्षिण विभागाच्या संघावार विजय मिळवला आहे. रायगडच्या संघाने नाणेफेकीचा कौल जिंकत प्रथम फलंदाजी करताना ८ गडी गमावत ३३० धावसंख्या उभारली, सलामीवीर फलंदाज आरव यांनी २१ चौकार व २ षटकार ठोकत १५५ धावा काढल्या तर देव सिंग यांनी १६ चौकराच्या साहाय्याने १०२ धावा केल्या. ३३० धावसंखेवर रायगडच्या संघाने डाव घोषित केला. प्रतिउत्तर देतांना दक्षिण विभागाच्या संघांचा डाव ११३ धावसंखेवर आटोपला,

**■ रायगडच्या संघांचा मोठा विजय**

रायगडकडून अर्शद अली, विराज थोरात, प्रज्वल गोवारी यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले. फोलोऑन घेऊन पुनः फलंदाजीला आलेल्या दक्षिण विभागाचा संघ दुसऱ्या डावात अवघ्या ६० धावसंखेवर गारद झाला, देव सिंग यांनी सर्वाधिक ५ विराज थोरात यांनी ३ तर अर्शद अली यांनी २ फलंदाजाना तांबूत धाडले. संघांनी केलेल्या सुरेख कामगिरीवर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने अभिनंदन केले आहे.

# मुंबई शहर निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

शिवमुद्रा, शिवशक्ती, शिवनेरी, नवोदित, गुड मॉर्निंग यांनी मुंबई शहर कबड्डी असो. ने आयोजित केलेल्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत पूर्व विभाग कुमार गटात तिसरी फेरी गाठली. मुंबईतील भारतीय क्रीडा मंदिराच्या पटांगणावर सुरु असलेल्या कुमारांच्या दुसऱ्या फेरीत शिवमुद्रा प्रतिष्ठानने पूर्वार्धातील पिछाडीवरून समर्थ स्पोर्ट्स्चे आव्हान ४२-३७ असे संपविले. अर्णव हातणकर, ओमकार कुळे, स्वयंम बेंडले यांच्या उत्तरार्धातील चतुरस्त्र खेळाला या विजयाचे श्रेय जाते. समर्थच्या श्रेयस होडगे, देव परब यांचा पूर्वार्धातील जोश उत्तरार्धात कमी पडला. शिवशक्ती मंडळाने साई चौगुले, अभिषेक किटे यांच्या झंझावाती खेळाने दादोजी कोंडदेवचा ४८-१५ असा पाडाव केला.

शिवनेरी सेवा मंडळाने वीर स्पोर्टस्ला ४६-३७ असे नमवीत आगेकूच केली. यश चोरगे, सुचित राणे शिवनेरीकडून, तर हर्ष बबडू, मंगेश कदम वीर स्पोर्टस्कडून उत्कृष्ट खेळले.

**■ शिवमुद्रा, शिवशक्ती, शिवनेरी, नवोदित, गुड मॉर्निंग तिसऱ्या फेरीत**

नवोदित संघाने दुर्गामाता स्पोर्टस्ला ४०-३८ असे चकवीत आपली धोडदौड सुरूच ठेवली. अर्जुन कोकरे, प्रथमेश चव्हाण यांच्या चढाई पकडीच्या उत्कृष्ट खेळाने नवोदितने विश्रांतीला २५-१८ अशी आघाडी घेतली होती. विश्रांतीनंतर सुरु सापडलेल्या तनिष चव्हाण, निलेश मोरे यांनी चुरशीचे लढत देत सामना रंगतदार अवस्थेत आणला. पण संघाला विजयी करण्यात ते कमी पडले. गुड मॉर्निंग स्पोर्टस्ने गौरीदत्त संघाला ५२-२२ असे सहज पराभूत केले. आशिष पवार, दिनेश गवाटी, आर्यन पवार यांच्या तुफानी खेळाला या मोठ्या विजयाचे श्रेय जाते. गौरीदत्तचा सुंदरम गुप्ता चांगला खेळला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)

कमी केले. फिटनेसच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी